म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू. प्रवास
सं. क्र. ८७१

# सचित्र पंढरपूर



REFBK-0017304
REFBK-0017304

# सचित्र पंढरपूर

भाविकांची श्रद्धास्थाने

भाग पहिला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ५००३० वि: प्रप्रवास
क्रमांक ७०१ नोंद दि: २५।१२।६०

# सचित्र पंढरपूर

दा. क्र. १७२०४
संदर्भ शाखा

— लेखक —

यशवंत रामकृष्ण

REFBK-0017304

भारतीय प्रकाशनमंदिर, गिरगांव, मुंबई ४.

प्र का श क
मो. शां. कुलकर्णी
भारतीय प्रकाशन
मंदिर गिरगांव,
मुं ब ई ४.

मु द्र ण स्थ ळ
मोहन प्रिन्टरी
फोर्ट, मुंबई.

मु ख पृ ष्ठ
मोहन वाघ

प्र का श न स्थ ळ
भारतीय प्रकाशन
मं दि र
गिरगाव मुंबई ४.

किं म त
चार रुपये

जुलै १९६८

# अर्पण

ज्यानी माझ्यावर अलोट प्रेम केले
त्या माझ्या असंख्य स्नेहीमंडळीस

आणि

ते प्रेम संपादन करण्याचे गुण
ज्यांच्यामुळे मला लाभले त्या
माझ्या आईवडिलांच्या पवित्र
स्मृतीस......

# म नो ग त

११ मे १९५७ साली 'भाविकांची श्रद्धास्थाने' या आकर्षक व सौंदर्ययुक्त लेखमालेचा जन्म 'नवशक्ति' दैनिकात झाला तो अपूर्व असा! त्या लेखमालेने वाचकांना दोन वर्षे अक्षरशः वेडे केले. 'रविवार कधी उजाडतो व 'नवशक्ति' दैनिकात प्रसिद्ध होणाऱ्या या लेखमालेतील मंदिराचे चित्र कधी एकदा आपण आपल्या नजरेसमोर उभे करतो अशी आमची या लेखमालेबद्दल ओढ आहे," अशा आशयाची कितीतरी पत्रे त्यावेळी या लेखमालेच्या लेखकास येत. आस्तिक व नास्तिक या दोघानाही ही दर्जेदार लेखमाला सारखीच प्रिय होती हा या लेखनाचा दृष्टीस पडलेला विशेष गुण!

१९५९ साली या लेखमालेचे १०० लेख पुरे होताच ही लेखमाला बंद करण्याचे जाहीर केले गेले तेव्हा अनेकजण हळहळले! तद-

नंतर ही लेखमाला अशीच पुढेचालू ठेवण्याचा वाचकांचा तगादा चालूच होता. लेखमालेची ही लोकप्रियता पाहून नवशक्तिचे त्या-वेळचे संपादक श्रीकांत पालेकर यानी ही लेखमाला अशीच पुढे चालू करण्याचा लेखकाकडे आग्रह धरला परतु त्यावेळी तशाच काही अडचणी निर्माण झाल्या. तसेच एका दैनिकात एकाच लेखमालेचे शंभर लेख ओळीनं प्रसिद्ध होणं हा एक वेगळा विक्रम होता. इतके लेख प्रसिद्ध झाल्यानंतर तीच लेखमाला चालू ठेवणे योग्य नव्हते म्हणून हे लेखन तेथेच स्थगित झाले. हे सारे लेखन पुस्तकांत बंदिस्त व्हावे अशा पुढे विनंत्या होऊ लागल्या. आतां ६८ साल उजाडले आहे. ती लेखमाला बंद होऊन वर्षे लोटली आहेत. तरीही अधून मधून या लेखमालेचे पुस्तक प्रसिद्ध व्हावे हा लोकांचा आग्रह पाहिला की या लेखमालेत येवढे मोठे कोणते सामर्थ्य असावे याचे उत्तर खोल विचार करूनही सापडत नाही. वाचकांची या लेखाबद्दल ही ओढ ध्यानी घेऊन लेखकाने त्या लेखमालेतील ते सारे लेख पुन्हा अवलोकन केले व पुस्तकासाठी पुन्हा त्याचे लेखन केले. ' सचित्र पंढरपूर ' हा त्यातला पहिला भाग आहे.

" भाविकांची श्रद्धास्थाने ' या वाचकाना वेडे करणाऱ्या लेखमालेच्या साहित्यासाठी लेखकाने त्याकाळी संपूर्ण महाराष्ट्र अगदी वेड्यासारखा पायदळी तुडविला. तुफान गतीने शेंकडो पुस्तकाचे वाचन केले. लेखकाने या लेखमालेत फक्त शंभरच मंदिरे लिहीली ! परंतु प्रत्यक्ष पाहिली दीड हजाराहून अधिक मंदिरे ! मंदिर या विषयाने या लेखकाला त्यावेळी इतके नादिष्ट बनविले होते की मंदीर आणि मंदिरविषयक पुस्तके या व्यतिरिक्त अन्य गोष्टीला त्याच्या अंतःकरणात स्थान नव्हते. केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारत वर्षातील मंदिरांचे दर्शन वाचकाना आपण घडवावे अशी महत्त्वाकांक्षा त्याच्या मनांत निर्माण झाली होती त्यामुळे लेखमाला स्थगित झाल्यानंतरही या विषयाचे लेखन, टिपण आणि वाचन त्यानी चालूच ठेवले होते; त्यातून पुढे गोमंतकातील मंदिराची स्वतंत्र लेखमाला लिहिण्याचे ठरविले परंतु त्यास प्रारंभ होऊ शकला नाही. या कार्यात पुढे खंड पडला आणि हाती घेतलेल्या एका चांगल्या विषयावरचे हे लेखन तसेच पडून राहते की काय अशी भीतीही वाटू लागली. योग्य योगायोग जुळून आल्याशिवाय कार्य पूर्णत्वास जाणे अशक्य असते. याच कारणास्तव पूर्ण लेखन हाती असूनही या लेखमालेतील साहित्याचे पुस्तक प्रसिद्ध होण्याचे कार्य

घडू शकलें नाही. यावेळी अचानकपणे या लेखमालेतील पहिले पुस्तक-सचित्र पंढरपूर प्रसिद्ध होत आहे 'भाविकांची श्रद्धास्थाने' या पुस्तक-मालेच्या या पहिल्या भागांत पंढरपूर क्षेत्रातील प्रमुख मंदिराचे स्थळवर्णन व पूर्व इतिहास सांगण्यात आला आहे. श्रीक्षेत्र पंढरपूरा-संबधी अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत परंतु तेथील प्रमुख अशा मंदिरांची तसेच वारकरी पंथांतील प्रमुख दैवतांच्या स्थळांची एकत्र माहिती असलेले असे हे एकच पुस्तक असल्यामुळे त्यांचे महत्त्व स्वतंत्र आहे. त्या त्या स्थळाची माहिती देताना तेथल्या दुर्मिळ चित्रांचीही यात प्रसिद्धी करण्यात आली आहे. एक गोष्ट इथे मुद्दाम नमूद करावयाची ती हीच की या पुस्तकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक स्थळाची लेखकाने यात्रा केली आहे. प्रत्येक स्थळाची माहिती लिहिताना त्यासंबंधी प्रसिद्ध–अप्रसिद्ध साहित्य नजरेखालून घातले आहे. स्वतंत्र माहितीही पुरविण्याचा यत्न केला आहे. त्यामुळे अभ्यासू अशा व्यक्तींना हे पुस्तक खूपसे मार्गदर्शक ठरणार आहे यांत शंकाच नको !

—यशवंत रामकृष्ण

११।२१ गांवदेवी, मुंबई–७

१ मे १९६८.

ग्रंथालय ठाणे
दा. क्र.

# पंढरपूर क्षेत्र प्रवास मार्गदर्शन

भागवत सांप्रदायाचे स्फूर्तिस्थान असलेल्या पंढरपूरला ' दक्षिण काशी ' असे म्हटले जात असले तरी या स्थळी केवळ दक्षिण भागातलेच भक्तगण येतात असे नव्हे तर चोहोकडून या जागी यात्रेकरुंचा लोंढा यात्रेव्यतिरिक्त इतर दिनीही यात्रेसारखा लोटत असतो. महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यात गणले गेलेले पंढरपूर सोलापूर जिल्ह्याच्या सुमारे साडेसतरा उत्तर अक्षांश व साडेपचाहत्तर पूर्व अंशावर आहे. रेल्वे मार्गाने जाणाऱ्या प्रवाशांना येथले मुख्य जंक्शन म्हणजे कुर्डूवाडी स्टेशन. येथून पंढरपूरला जो स्वतंत्र रेल्वेचा फाटा जातो त्यास पूर्वी बार्शी लाईट रेल्वे असे नाव होते. आता हा फाटा दक्षिणमध्य रेल्वेने ताब्यात घेतला आहे. या मार्गाने सुमारे ३२ मैलावर पंढरपूर स्टेशन लागते. हा प्रवास साधारणतः दोन तासांचा असतो. मुंबई, पुणे, कऱ्हाड, खानदेश, मराठवाडा, विदर्भ, कर्नाटक, म्हैसूर, आंध्रप्रदेश, उत्तर भारत येथून पंढरपूर येथे येणाऱ्या साऱ्याच भक्तगणांचा लोंढा कुर्डुवाडी जंक्शनवर जमा होतो. त्यामुळे खूपदा पुढल्या प्रवासाला छोटया रेल्वे-

मुळे त्रास होतो. कित्येकदा गाड्याअभावी थांबणे भाग पडते. आषाढी-कार्तिकी सारख्या महायात्रेला जादा गाड्या सुटतात पण तुफान गर्दीमुळे खूपच गैरसोय होते.

या क्षेत्री येण्याचा दुसरा रेल्वे मार्ग पुणे–बंगलोर ( सदर्न रेल्वे ) येथून मिरज जंक्शन गाठून मग मिरज ते पंढरपूर मार्गाने जाणे. हा प्रवास सहा साडेसहा तासांचा आहे. परंतु खरे पहाता यात्रेचा काळ टाळूनच पंढरपूर दर्शन घेणे रेल्वे अडचणीमुळे त्यातल्या त्यात सोयीचे असते.

## एस. टी. चा मार्ग

रेल्वेपेक्षा एस. टी.नें पंढरपूरचा प्रवास करण्याची खूपशी चांगली सोय आढळते. प्रथम म्हणजे पंढरपूरला येणाऱ्या बऱ्याच प्रवाशांची कुर्डुवाडी जंक्शनला जी बरीच गैरसोय होते ती कुर्डुवाडीवरून सुटणाऱ्या एस. टी. गाड्याने सहज टाळता येते. यात्रेच्या वेळी येथून एस. टी. च्या जास्तीत जास्त गाड्या सोडल्या जातात. मिरज–पंढरपूर, पंढरपूर–सोलापूर. त्याचप्रमाणें पुणें, सातारा, कोयनानगर, कोल्हापूर, फलटण, सांगली, बार्शी, अहमदनगर, उस्मानाबाद, मंगळवेढे आदी ठिकाणाहून एस. टी गाड्या सारख्या सुटत असतात. त्या मार्गाने पंढरपूरला जाणे बरेच सोयीचे असते. एस. टी. चे सर्व साधारणमार्ग असे– (१) पंढरपूर, मोहोळ, सोलापूर, (२) पंढरपूर, उस्मानाबाद. व्हाया मोहोळ, सोलापुर. (३) पंढरपूर, बार्शी, व्हाया कुर्डुवाडी, बार्शी, (४) पंढरपूर, अहमदनगर, व्हाया करकंब, पोरेते, टेंभुर्णी, वांगी, करमाळा, (५) पंढरपूर, पुणें, व्हाया सोलापूर, अकलूज, इंदापूर. (६) पंढरपूर, पुणे व्हाया श्रीरामपूर, अकलूज, माळशिरस, नातेपुते, फलटण, दिवेघाट, सास-

वड. (७) पंढरपूर, कोयनानगर व्हाया माळवणी, पिलीव, म्हसवड, सातारा, कोरेगांव. (८) पंढरपूर आटपाडी, विटे व्हाया महूद, खानापूर. (९) पंढरपूर, कोल्हापूर व्हाया, मिरज, सांगली. (१०) पंढरपूर, जत व्हाया सांगोला, महूंकाळ, कवठे. (११) पंढरपूर, विजापूर व्हाया मंगळवेढे—याशिवाय निरनिराळ्या नजिकच्या मार्गाने एस. टी. च्या स्वतंत्र गाड्या असतात.

## रहाण्यासाठी असलेल्या धर्मशाळा

पंढरपूर क्षेत्रात राहण्याची तशी कुठेच गैरसोय दृष्टीस पडत नाही. उलट सोयीची इतकी विपुल ठिकाणे आहेत कीं त्यातून पटकन जास्त सोयीस्कर ठिकाण लक्षात येणे अवघड आहे. धर्मशाळा, मठ, मंदिरातील वाडे, शिवाय भक्तांसाठी उपाध्यायपण स्वीकारणाऱ्या बडव्यांच्या घरीदेखील रहाण्याची सोय असते. पंढरपूरच्या धर्मशाळेत सर्व दृष्टीने सोयीची जागा म्हणजे श्री. संत गाडगे महाराजांची मराठा धर्मशाळा. मंदिरात रहाण्याचे उत्तम स्थळ म्हणजे नामदेव मंदिर. बडव्याच्या घरी रहाताना पूजा, अर्चा लवकर व्यवस्था होते. मठात रहाण्याच्या जागा आहेत. परंतु धर्मशाळेत रहाणे जास्त चांगले असते. कांहीं धर्मशाळांची नांवे अशीं : कराड धर्मशाळा, मराठा धर्मशाळा, तनपुरे मंडप, मायाबाई मंडप, वंजारी धर्मशाळा, लक्ष्मण बाग, जाधवजी जेठाबाई धर्मशाळा, केशरूभाई धर्मशाळा, समस्त कुरुड धर्मशाळा, मुरारजी काजी धर्मशाळा, क्षत्रिय तांबट धर्मशाळा, कपोल धर्मशाळा, अलिबागकरची धर्मशाळा, खर्डेकर धर्मशाळा, वडार समाज धर्मशाळा, समस्त लोणारी धर्मशाळा, बांगड धर्मशाळा, संगमनेरकर धर्मशाळा, पुणेकर धर्मशाळा, पद्मशाली धर्मशाळा, नागानंद धर्मशाळा, कित्ते

भंडारी समाज धर्मशाळा, क्षत्रिय धनगर समाज धर्मशाळा, धर्मशाळा, काशी कापडे धर्मशाळा, भोईराज समाज धर्मशाळा चोखामेळा धर्मशाळा, इत्यादि.

## लहान मोठे यात्रादिन

पंढरपूरच्या प्रमुख चार यात्रा

१) चैत्र वारी शु. १ ते वद्य षष्टीपर्यंत (एकवीस दिवस.)

२) आषाढी वारी शु. १ ते वद्य नवमीपर्यंत (चोवीस दिवस.)

३) कार्तिकी वारी शु. १ ते वद्य नवमी (चोवीस दिवस.)

४) माघ वारी शु. ९ ते वद्य तृतीया (दहा दिवस.)

या प्रमुख यात्रेशिवाय दर शुद्ध एकादशीस यात्रा असते. गुढीपाडवा, अक्षय तृतीया, दशाहार, नागपंचमी, गोकुळ अष्टमी, नवरात्र दसरा, दिवाळी, संक्रांत, महाशिवरात्र, तुकाराम बीज, नाथषष्टी या प्रमुख यात्रा असते.

## शेवटच्या सूचना

कुठल्याहि क्षेत्राच्या प्रवासास निघताना तेथून लगेच निघण्याच्या तयारीने निघू नये. कारण क्षेत्रदर्शनाचा योग अनेक वर्षाच्या विचाराने ठरविला जातो तेव्हा तेथून महत्वाच्या स्थळांचे दर्शन एका फेरीत घेणे जरूरीचे असते. घाईच्या प्रवासाने क्षेत्राचे उडते दर्शन घेतल्याने जे हवे ते समाधान लाभणे अशक्य असते. पंढरपूरला जाताना त्या स्थळी जास्तीतजास्त एक आठवडा राहणे बरे. कमीत कमी तीन दिवस तरी रहावे. क्षेत्रस्थळी पोहचल्यावर ज्या स्थळी जावयाचे त्याची योजना आधी आखावी. प्रथम पंढरपूर मंदिराचे दर्शन, त्या बाजूची स्थळे; त्यानंतर चंद्रभागा व आजू-

बाजूचे घाट, नंतर गोपाळपुरा व तेथली स्थळे असा क्रम असणे बरे. पंढरपूर क्षेत्री उतरताच बडवे मंडळी स्वागतास हजर असतात. ही मडळी सर्व व्यवस्था करण्याची आश्वासने देऊन यात्रेकरूस स्वगृही नेतात. अशा या मंडळीत बरेच बडवे चाणाक्ष असतात. त्याच्या सहकार्याचा प्रवाशाना फायदा असतो. पण या बाबतीत पूर्ण विचार करून घाईने निर्णय न घेणे चांगले असते. प्रवासात ज्या अनेक अडचणी येतात त्यासाठी पंढरपूर पोलीस स्टेशनचे बहुमोल सहाय्य मिळू शकते. त्याचप्रमाणें प्रमुख धर्मशाळा त्यातही संत तनपुरे महाराज धर्मशाळेत तसेच संत गाडगे महाराज धर्मशाळेत प्रेमळपणाने मार्गदर्शनाचे सहाय्य लाभू शकते.



पढरपूरात विठ्ठलाच द[illegible]न घडते तं असे

# १

महाराष्ट्राच्या श्रद्धापरंपरेवर परमेश्वर एकदा बेहद संतुष्ट झाले आणि त्यांनी तेथील एका भूभागाला एक अलौकिक अलंकार अर्पण केला. अर्पण करण्यात आलेल्या त्या अलंकाराचे नाव-तीर्थ चंद्रभागा! आणि ज्या भूभागाला तो अर्पण करण्यात आला त्या भूमिक्षेत्राचे नाव पंढरपूर.

पंढरपूरला कुणी 'भूवैकुंठ' म्हणतात. कुणी 'महाराष्ट्राची दक्षिण काशी' म्हणतात. कुणी 'दक्षिण द्वारका' म्हणतात. तर कुणी 'संताचे माहेर घर' संबोधितात. पंढरपूर या नामाचा महिमाच न्यारा आहे. पांडुरंगाच्या पंढरपूरला जो प्रत्यक्ष डोळे भरून पहातो, त्यास या भक्ति नगरीला काय म्हणू आणि काय न म्हणू, हे सूचतच नाही.

पंढरीनाथाचे पंढरपूर क्षेत्र हे सोलापूरच्या सोळा गावांतील एक. सोलापूरचे पूर्वीचे नाव 'सोन्नलगी.' नंतर सोन्नलगीचे झाले 'सोनलापूर.' आणि पुढे सोन्नलपूर म्हणता म्हणता लोकांच्या तोंडात 'सोलापूर' शब्द बसला; तोच पुढें प्रचारात ठसला. पंढरपूर हे सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख असे तालुक्याचे ठिकाण. हा भाग जिल्ह्याच्या मध्यभागी पश्चिमेस ४० मैलांवर. इथली लोकसंख्या ४५ हजार. पंढरपूर हे मुंबई राज्यातील सर्वात मोठे असे यात्रेचे तीर्थक्षेत्र की जिथें वर्षभरात सुमारे पाच लक्षांहून अधिक यात्रेकरू येतात. त्यातले सारेच विठोबाच्या चरणस्पर्शास आतुर असतात.

### ● सोलापूर जिल्ह्याची विविधता

पंढरपूर क्षेत्र ज्या सोलापूर जिल्ह्यात आहे, त्याचे क्षेत्रफळ ५८,१३५ चौरस मैल म्हणजे ३७ लाख एकर इतके आहे. लोकसंख्या १५ लक्ष आहे. सिद्धेश्वर, वडवळचे नागनाथ, अक्कलकोटचे स्वामी महाराज, मंगळवेढ्याचे दामाजीपंत, चोखोबा, कान्होपात्रा, अरणचे सावतामाळी ही संतस्थळे सोलापूरातीलच. इथल्याच बिजातून लोकशाहीर रामजोशी जन्मले आणि डॉक्टर कोटणीस अवतरले.

भीमा, सीना, माण आणि नीरा या इथल्या नद्या. त्यांनी इथली सुपीकता वाढविली ! आणि सौंदर्यशोभा द्विगुणित केली ! इथल्या भुरक्या-तांबुस जमिनीचा मुख्य गुण कसदारपणा. भीमाकाठची म्हणजेच चंद्रभागेच्या किनाऱ्याची काळी जमीन तर संत साहित्याला अति पोषक ! ज्या ज्या संतशेतकऱ्यांनी इथे साहित्य पिकाची पेरणी केली, त्या त्या पिकांनी महाराष्ट्राचे ग्रंथ कोठार इतके अपूर्व भरले की, ते कधी संपूर्ण संपलेच नाही.

भीमा नदी पंढरपूरातून जाताना चंद्राकार धारण करते. म्हणजेच ती आकाराने चंद्राप्रमाणे दिसते. म्हणूनच तीला 'चंद्रभागा' म्हणतात. ह्याच चंद्रभागेच्या वाळवंटात ज्ञानेश्वराने ज्ञानकण वेचले. नामदेवाने कीर्तन चक्रे फिरविली. तुकाराम भजन दंग होऊन नाचले आणि जनाबाई सहज कंठातून गाइली.

### ● पूज्य साने गुरुजी व संत विनोबांचे पंढरपुरातील कार्य

पंढरपूर ही संतसांप्रदायाची कर्मभूमी ! येथील पांडुरंगाचे देवस्थान हे वारकरी पंथाचे उपासक दैवत, जर पंढरपूरचे हे वैष्णव धर्माचे राष्ट्र कल्पिले, तर इथला राज्य प्रमुख पांडुरंग होय !

या राज्यात वंशभेद नाहीत; प्रांतिक भेद नाहीत; जातिय भेद नाहीत; आणि आता तर राष्ट्रीय व धर्मभेदही उरलेला नाही.

पांडुरंग हा जनमत मानणारा राज्य प्रमुख मानावा लागेल. कारण हरीजनांनी मंदिरात येऊन राज्य प्रमुखाला भेटू नये असे जे एकेकाळी भक्तजनाचे मत होते, ते कित्येक वर्षे स्वइच्छेला मुरड घालून; पांडुरंगाने मानले होते. पांडुरंगाचे ते दुःख स्वर्गवासी पूज्य साने गुरुजींनी जाणले. त्यांना ते असह्य वाटले. म्हणून सत्याग्रही उपोषणाचे शस्त्र हाती घेऊन त्यांनी इथल्या विठोबा मंदिरापाशी हक्क युद्ध पुकारले व अखेर देवालयाचे दार हरीजनांना कायमचे उघडले गेले. इथला आंतरजातीय भेद हा असा नष्ट झाला आहे.

उरला होता तो धार्मिक भेद व राष्ट्रभेद. त्या भेदभंगाची जाणीव संत विनोबा भावेंनी करून दिली. भक्तजनांनी ती लक्षात घेतली आणि आता पंढरीनाथाच्या पादस्पर्शाच्या सुख-अनुभवाचा मार्ग, अखिल जगताला खुला झाला आहे.

### ● पंढरपूर नगराची रचना

'रोकडोबा,' 'महाद्वार,' 'काळा मारुति,' आणि 'चौफाळा,' या पंढरपूर नगराच्या चार वेशी. चार दिशेला असलेल्या या चार वेशीला चार मारुति आहेत. गांवकरी त्यांना फार मानतात. आणि त्यांची नियमित पूजा अर्चाही करतात. या वेशीच्या सीमेवर असलेल्या द्वारात पूर्वी सांजसकाळ नगारेही झडत आणि तुताऱ्याही निनादीत. यातील मुख्य वेशीतून नगरात पाऊल टाकले की पावलो पावली जुने भव्य वाडे दृष्टीस पडतात. त्यातल्या काहीत आता मठ आहेत.

काहींत समाध्या आहेत आणि काहींत धर्मशाळा आहेत. ही सर्व स्थाने भाविकांच्या सेवेत सदा मग्न दिसतात !

पंढरपूर हे धर्मशाळेचे मोठेच आगर आहे. संत गाडगे महाराजांची इथली मराठा धर्मशाळा, संत तनपुरे महाराजांचा चारो-धाम मंडप, कपोल धर्मशाळा, आदींच्या भव्य इमारती व त्यांचे सेवेचे कार्य पाहिले की मति कुंठित व्हावी. ज्ञानेश्वर महाराज, वेंकट स्वामी, कृष्णाजी महाराज, महीपति महाराज आदींचे इथल्या भव्य मठातली भक्तिकार्ये पहाताना मन उल्हासित व्हावे. मठ, धर्मशाळा आणि समाध्या यांच्या संख्येच्या बाबतीत तीर्थात पंढरपूर प्रथमांकात सहज बसावे. यात्रेकरुंच्या सेवेसाठी सदा सज्ज असलेली अशी ही स्थळे इथे इतकी आहेत की, एकाचे नाव लक्षात ठेवताना दुसऱ्याचा सहज विसर पडावा. इथली ही स्थळे १५० हून अधिक.

पंढरपूरच्या पूर्व बाजूच्या वेशीने नगरात यावे तर प्रथम चंद्रभागेचे दर्शन घडते. समोर दिसणारी ती शांत प्रशांत गंगामाता पहाताना मन लवते, नमते ! आपल्या स्थिर चित्ताला ही चंद्रभागा बोलावित तर नाही ना ! असा भास होतो. मग पाऊले पुढे पडू लागतात आणि चंद्रभागेच्या तीर्थ प्राशनासाठी जीव कसा कासाविस होतो. चंद्रभागेच्या वाळवंटात आलेला भाविक माणूस, चंद्रभागेच्या स्पर्शाशिवाय तेथून जाऊच शकत नाही. दिवटे, खिस्ते, कबिर, उद्धव, दत्त, कुंभार, अहिल्याबाई, महाद्वार, कासार, विप्र, अमळनेर मढे, विष्णूपद आणि खाक चौक, असे चंद्रभागेला चौदा घाट आहेत. अहिल्याबाई होळकर घाट आणि महाद्वार घाट यांच्या मधला भाग मोठाच आकर्षक आहे. कारण त्या जागी आलेल्या पुंडलिक

मंदिराच्या सुशोभित शिखराने तेथली शोभा वाढविली, द्विगुणित केली आहे. आजूबाजूला अमळनेरकर, चोपडकर, देहूकर, लक्ष्मण, कृष्णाजी अशा प्रमुख-संत महंत महाराजांच्या आकर्षक अशा समाध्या आहेत. सामान्य माणसांना त्या त्या संतांची माहिती नसल्यामुळे, या समाध्यांचे तितकेसे महत्व वाटत नाही. पण यात्रेत याच समाधि-स्थानावर भाविकांकडून श्रद्धेचा पाऊस पडतो.

चंद्रभागेतील पुंडलीकाच्या देवळापासून महाद्वार घाट चढून वर आल्यावर दृष्टीस पडतो 'अहिल्याबाईचा राम.' हे वैभवशाली राम मंदिर अहिल्याबाईच्या धर्मप्रेमाचा अपूर्व परिचय करून देते. पुढे लागते शिंदे सरकारचे मुरलीधर मंदिर. शिंदे सरकारच्या मंदिरा-लगतचे ते भव्य वाडे पहाताना, मराठेशाहीच्या त्या काळाची आठवण होते. आणि मग समोरच 'विठ्ठल मंदिराकडे जाण्याचा रस्ता' अशी पाटीवरील मराठी अक्षरे नजरेत भरली की, सारा विचार स्थिर होतो. 'विठ्ठल मंदिराकडे जाण्याचा रस्ता हाच, पण मंदिर फार तर दूर नाही ना!' असा प्रश्न आपणच आपणाला विचारून जातो. झपझप पाऊले टाकून मंदिर गाठावे असे उत्कटतेने वाटते, पण तसे घडत नाही. दृष्टीस पडणाऱ्या पाटीपासून मंदिर फार लांब असावे अशी आपली कल्पना होते; पण ती कल्पना मनाला खो देते आणि चालता चालता झटकन् मंदिराचा दर्शनी भाग दृष्टीस पडतो. प्रथमदर्शनीच तो आकर्षून टाकतो. आत गेले की मोठाच अचंबा वाटतो. मंदिराची भव्यता तर डोळ्यात मावत नाहीच, पण त्यावरील शिल्पही पटकन टिपता येत नाही. आतल्या विठ्ठलाच्या दर्शनाची आतुरता सारखी वाढतच असते, परंतु तासभर तरी प्रत्यक्ष मूर्तीचे दर्शन घडत नाही!

**• एकत्र जमणाऱ्या तीस पालख्या**

पंढरपूरला आषाढ महिन्यात विविध पालख्या येतात. पालखी हे देखील पंढरपुरच्या यात्रा उत्सवाचे एक वैशिष्ट्य आहे. इथे येणाऱ्या अनेक पालख्यात आळंदीच्या ज्ञानेश्वराची पालखी ही प्रमुख. या पालखीचे थोरपण पेशवे सुद्धा मानीत. पालखीला ते हात लावित आणि मग ती निघे. पूर्वी या पालखीसाठी दांडगा खर्च केला जाई. पेशवे सरकारच तो करीत. मध्यंतरीच्या काळात औंध महाराजांचीही या पालखीकडे दृष्टी वळली. ते मग पालखी सोबत हत्ती, घोडे शिपाई असा संस्थानिकाचा लवाजमा रवाना करू लागले. पेशव्यांनी मान्यता दिलेली अशी ही पालखी, त्यामुळे पेशवाई नंतर कित्येक वर्षांपर्यंत ब्रिटीश सरकारचे या पालखीला सहाय्य लाभले. सन १८५२ पासून हा सारा कारभार पंचकमिटीच्या हाती गेला. हल्ली तेच व्यवस्था पाहतात.

एकोणिसाव्या शतकापर्यंत ज्ञानेश्वर व तुकाराम ह्या दोनच पालख्या पंढरपूराकडे येत असत. आता सोलापूर, कोल्हापूर, सातारा, पुणे, नगर, नाशिक, खानदेश, नागपूर, वऱ्हाड, बंगलोर, कर्नाटक, त्रिचनापल्ली इत्यादी तीस स्थळांच्या या पालख्या एकाच दिवशी पायी मिरवीत पंढरपूरास आणतात. सरासरी महिना भर तरी या पालख्यांची ही पदयात्रा चालू असते. या पालख्यात निवृत्तनाथ (त्रिंबकेश्वर), सोपानदेव (सासवड), तुकाराम (देहू), एकनाथ (पैठण), निळोबा (पिंपळनेर) इत्यादींचे विशेष महत्त्व मानले जाते. या साऱ्या पालख्यांचा आषाढातील नवमीला पंढरपुरापासून पाच मैल अंतरावर असलेल्या 'वाखरी' स्थळी संगम होतो. तेथून दशमीला हा पालखी संगम

पंढरपूर स्थळी नाचत नाचत अवतीर्ण होतो. तीस-बत्तीस हजारांच्या या मेळाव्यात दोन घोडे, तंबू, डॉक्टरी पथके, पाण्याचे हंडे, बैलगाड्या असा भरगच्च संच दृष्टीस पडतो. पालखीच्या सामुदायाचे पाय पंढरपूर नगरीत पडले की, भागिरथेचे पात्र फुलून निघते. अशा वेळी किर्तन अभंगाचे शब्दस्वर ऐकून वाऱ्याला वाचा फुटते. वीणेच्या तंतुस्वराने नभ संगीतमय बनते. आणि मृदुंगाच्या बोलाने काळ्या दगांना धडकी भरते. त्या रात्री वारकरी टाळ वाजवितच झोपतात आणि टाळ वाजवितच उठतात.

**● संत हैबतराव बाबा**

पालख्यांच्या सोबत आलेल्या वारकऱ्यांचा मुक्काम, बहुधा पाच दिवस असतो. त्या पाच दिवसात पंढरपूर क्षेत्र गजबजून उठते. प्रत्येक ज्ञातीची येथील धर्मशाळा, विविध मंदीराचे भव्य सभामंडप, प्रचंड वाड्यातील मठ, बडव्यांची यात्रेकरूंना उतरवून घेण्याची घरे यात अग्राइतकीही जागा शिल्लक नसते. केव्हा केव्हा तर रोगराईचे इतके भय निर्माण होते की, सरकारी दवाखान्याची व्यवस्थाही कार्य करण्यास कमकुवत ठरते.

चौथ्या दिवशी पौर्णिमेला पालख्या सोबतचे सर्व वारकरी, विठोबा मंदिरापासून एक मैल अंतरावर असलेल्या "गोपाळपूर" या येथल्या प्रसिद्ध श्रीकृष्ण स्थानी दह्याने भरलेली हंडी फोडून 'गोपाळ काला' चा उत्सव साजरा करतात. पाचव्या दिवशी पुन्हा विठ्ठल मंदिराच्या पहिल्या नामदेव पायरीच्या श्रद्धास्थानी 'महाद्वार काला' पार पाडला जातो व मग हळुहळु ज्या त्या पालख्या गावोगावी परतु लागतात. पालख्या परतण्यास मोकळीक झाल्यावरही पालखी सोबतचे सर्वच

वारकरी कांही मागे परतत नाहीत. पालख्या गेल्या नंतरही त्यातील अर्धी मंडळी चातुर्मासाचे चारही महिने पंढरीतच वास्तव्य करून असते. त्यामुळे ह्या चारही महिन्यात इथले यात्रा स्वरूप हे कायमच असते.

पंढरपूरच्या या यात्रेचे स्वरूप खरे म्हणजे इथे येणाऱ्या पालख्यांनीच वाढविले आहे आणि त्याबाबतीतील बरेचसे श्रेय जाते समाधीस्थ हैबतराव बाबा आळंदीकर यांच्याकडे. ज्ञानेश्वर माऊलीच्या पादुका दिंड्या भजनाच्या सोहळ्यासह पालखीतून मिरवत आणाव्यात ही कल्पना त्यांचीच. त्यापूर्वी मुख्याच्या गळ्यात ज्ञानेश्वराच्या पादुका चढवून पालखी मिरवणूक निघत असे. परंतु हैबतराव आळंदीकरांनी या पालखीचे सारे स्वरूपच बदलले. लोकात उत्साह वाढेल, आकर्षता येईल व पालखी तत्त्वाची प्रखरता भाविकात कशा प्रकारे निर्माण होईल, याचा त्यांनी खोल विचार केला आणि या नव्या प्रयोगाने या पालखीचे कार्य त्यांनीं चांगले प्रभावीत केले. हैबतरावबाबा आळंदीकर हे मूळ सरदार घराण्यातले. एकदा ग्वाल्हेरहून ते एका गावी जात असता, वाटेत चोरांनी त्यांना लुटून बंदीस्त केले. बंदिस्त स्थितीत त्यांनी ज्ञानोबाचा धावा केला. योगायोग असा की, त्याचवेळी चोरांच्या नायकाला मूल झाले आणि त्या आनंदात त्यांनी समाधीस्थ हैबतरावांना सोडून दिले. बाबा तेथून आळंदीच्या ज्ञानेश्वरीच्या स्थानी गेले आणि मग ते तेथेच राहिले. स्वतःचे घर ते विसरले. आळंदीलाच त्यांनी घर मानले. आळंदीच्या वास्तव्यात त्यांनी ज्ञानाचा कणकण वेचून कित्येक ग्रंथांची पानेच्या पाने भरून काढली. ज्ञानोबाच्या सेवेत पुढे पुढे त्यांचे मन अति रमले. ज्ञानोबाच्या पालखीची वेगळी कल्पना काढून वारकरी सांप्रदायाचा एक मोठा संगम त्यांनी कायम तयार

केला. वारकरी संघटणेच्या बळावर पांडुरंगाच्या भागवत धर्माच्या पंथाचे मूळ पंढरपुरात घट्ट करण्यास, बाबा हैबतराव आळंदीकर यांनी केलेले कार्य हे इतिहास नमूद आहे. या थोर पुरुषाची समाधि आपणाला पुण्यात, नारायण पेठेतील विठोबा मंदिरात पहावयास मिळते.

पंढरीनाथाची पंढरपूर नगरी, हे एक वेगळच नगर आहे. ते एक सुंदर असे भक्ति नगर आहे. भाव आणि भक्ति हेच इथले कार्य आणि हाच या नगराचा पंचप्राण आहे. हे सुंदर श्रद्धा नगर निर्मिले तरी कोणी ? पांडुरंगाने की त्याच्या भक्ताने ? पंढरपूर नगर हे निर्माण केले एका श्रेष्ठ भक्तानेच ! त्या भक्ताचे नाव पुंडलीक.

### ● पुंडलीक आणि पांडुरंग

पुंडलिकाची जी कथा सांगतात ती अशी : पुंडलिक प्रथम स्त्रीलंपट होते. आई बापापेक्षा त्याचे बायकोवर अधिक प्रेम. बायकोचे लाड करताना ते जन्मदात्या माता पित्याकडे जरासुद्धा पहात नसत. त्याचे आईबाप हे धार्मिक वृत्तिचे. आपणास तीर्थयात्रेला न्यावे म्हणून त्यांनी पुंडलिकाला वारंवार विनंती केली, पण आई-वडिलांची इच्छा पुंडलिकाने केव्हाच तृप्त केली नाही. बायकोच्या आग्रहावरून एकदा स्वारी काशी यात्रेला निघाली असता, त्याच्या आईबापांनी आपणास तेथे नेण्याची विनंती केली. प्रथम पुंडलिकांनी त्यांचे शब्द वाऱ्यावरच सोडून दिले. परंतु पुढे त्याच्या मनातला विचार एकाएकी बदलला. त्यानी आईबापाच्या डोक्यावर ओझे लादले व स्वतःच्या खांद्यावर बायकोला चढवून ते सर्वच यात्रेला निघाले. वाटेत त्यांनी कुक्कुटस्वामीच्या आश्रमापाशी मुक्काम केला.

प्रातःकाळी पुंडलिकाने उठून पाहिले तो, स्वामींच्या मठात तीन काळ्याकुट्ट गलिच्छ स्त्रिया जात होत्या. त्या परत आल्या तेव्हा त्यांचे रूप पालटले होते. त्या स्वच्छ झाल्या होत्याच परंतु त्यांचे तेजही वाढले होते. आश्चर्याने थक्क होऊन पुंडलिकाने त्या स्त्रियांना विचारले 'आपण कोण?' त्या स्त्रिया म्हणाल्या 'वास्तविक तुझ्यासारख्या पापी माणसापुढे शब्द उच्चारणे हे महापाप आहे, तरी ऐक! आमचे नाव; गंगा, यमुना, सरस्वती.' पुंडलिक त्यांच्याकडे पहातच राहिले. तेव्हा त्या म्हणाल्या, 'तुझ्यासारखे महापापी आम्हाला भेटतात तेव्हा त्यांच्या सावलीनेही आम्हाला विटाळ होतो. मग आमच्या पात्रात ते स्नान करीत असताना, आम्ही किती पापमय होत असू! व किती काळे ठिक्कर पडत असू!" आणि त्या गेल्या.

पुंडलिकाच्या मनाला ते शब्द लागले. पापांनी काळ्या ठिक्कर झालेल्या नद्यांचे रोज पाप साफ करण्याचे सामर्थ्य असणारी महान् व्यक्ती आत आश्रमात आहे तरी कोण? व त्यांनी आपल्या पदरी एवढे पुण्य तरी जोडले आहे कसे? ते पहाण्यासाठी पुंडलीक आश्रमात गेले. त्यावेळी स्वामीजी, आई वडिलांना पाळण्यात घालून झोके देत होते. स्वामींना पुंडलीक म्हणाले, 'स्वामी, आपण कोणकोणत्या यात्रेला जाऊन हे पुण्य जोडलेत.' स्वामी म्हणाले, 'माझे पुण्यक्षेत्र ते पहा.' आणि त्यांनी समोरच्या पाळण्यात असलेल्या आई बापाकडे बोट दाखविले. "ह्यांची सेवा हेच मी पुण्यकार्य समजतो." असे ते म्हणाले.

नंतर पुंडलीक आईवडिलांना खांद्यावर घेऊन घरी आले व पुढे ते आपल्या मातापित्यांच्या सेवेत इतके दंग झाले की, प्रत्यक्ष परमेश्वर

त्यांच्या भेटीस आले असताही ते जागचे हलके नाहीत. परमेश्वर म्हणाले, ' पुंडलिका आता सेवा पुरे, मी तुझ्या भेटीसाठी केव्हापासून चंद्रभागेच्या वाळवंटात तिष्ठत उभा आहे. मला बसण्यास आसन तरी दे.' तेव्हा पुंडलीकाने बाजूची विट परमेश्वरापाशी फेकली पण ते सेवेतून कांहीं उठले नाहीत. त्या विटेवर परमेश्वर उभे राहीले ते राहीले. ते तेथेच विटेवर कायम आहेत. पंढपूरच्या विठ्ठल मूर्तिची जी ही लोककथा आहे, ती कथा झाली पुराणातील. परंतु प्रत्यक्ष या मूर्तिबद्दल इतिहास आहे तरी काय? ही मूर्ति कुठली! कुणी कोरली की आपोआप निर्माण झाली! ही मूर्ति ज्या मंदिरात आहे, ते मंदिर तरी आहे कसे! त्याची रचना, शिल्प मांडणी ही कोठल्या काळातली आणि कसे आहे! त्यात कोणकोणती दैवते आहेत? त्याच्या आख्याईका काय आहेत? या संबंधीचा विचार आपण पुढील लेखात करुया.

● ●

श्री

विट्ठल



पंढरपूरची मूळ विठ्ठलमूर्ति ही अशी आहे

२

नैसर्गिक चमत्कारसुद्धा कसे असतात पहा! नकळत निसर्गाकडून एखादी घटना घडते आणि ती अघटीत ठरते, अमर बनते आणि अखेर अजरामर होते! पंढरपूरची उत्पत्ति ही अशाच एखाद्या चमत्कारातून झाली असावी! परंतु कोणता चमत्कार कधी घडला आणि पंढरपूर केव्हा कसे निर्माण झाले; हे निश्चित सांगणे मात्र महाकठीण!

संतांचा सागर आणि भक्तीचा आगर ठरलेले पंढरी नगर, पूर्वी छोटे होते. पण आता तर सर्वच दृष्टीने इतके विस्तीर्ण झाले आहे की, त्याचे संकीर्ण संशोधन करणे हे शक्तीबाहेरचे आहे. सर्व शक्ति एकवटून या क्षेत्रात संशोधन कार्य कित्येक काळपर्यंत केले गेले व कित्येक करीत आहेत, परंतु कोणत्या काळी, कोणत्या इसमाने का व कशासाठी त्यात कोणती मूर्ति कधी, कशी स्थापन केली, हे मात्र महान संशोधकसुद्धा अद्यापपावेतो सिद्ध करू शकले नाहीत.

जुनी कागदपत्रे, शिलालेख, ताम्रपट आणि या विठ्ठल मूर्तिला जुळणारे जुने शिल्प, यावरून तर्कवितर्क लढवून पूर्वीपासून विविध विचारवंत आपले जे विचार प्रगट करीत आले आहेत; त्यातले काहींचे संशोधनाचे पक्के विचार पटतात. पण पुरावे जुळत नाहीत. काहींचे विचार जुळतात परंतु ते अपक्व वाटतात. तेव्हा पंढरपूरच्या इतिहास संशोधनाची ही वादविवादाची बाजू क्षणभर दूर सारली, तर पंढरपूरचा मूळ निर्माता निसर्गच होय! निसर्गाने भीमा नदीच्या हस्ते

पंढरपूरच्या भूमीवर चंद्रभागेचे लेणे खोदले म्हणूनच त्या भूमिला सौंदर्य स्वरूप प्राप्त झाले आणि अखेर चंद्रभागेला तीर्थाचे रूप आले, म्हणूनच या भू-भागाला क्षेत्राचे स्वरूप प्राप्त झाले; हेच खरे सत्य !

### ● विठ्ठल मूर्तीची निर्मिती

पुंडलीकामुळे पांडुरंग अवतरला आणि पांडुरंगामुळे पुढे पंढरपुरचा महिमा वाढला या विचारातही सहसा दुमत होणारे नाही. तरीही या दाखल्यास 'पुंडलीक व पांडुरंगाची' पौराणिक कथा बाजूस सारूनही ह्याच गोष्टीचा ऐतिहासिक भागही नजरेसमोर ठेवावा लागेल. तो भाग असा :–

पूर्वीचे होयसळ नावाचे राजवंश हे विठ्ठल भक्त होते. त्याच घराण्यातील विष्णुवर्धक नामक एका राजपुत्राने रामानुजाच्या उपदेशावरून जैन सांप्रदायाचा त्याग करून वैष्णव सांप्रदायात प्रवेश केला होता. त्याचा भाऊ वीर बल्लाळ ह्यांनी होयसाळच्या राज्याची मर्यादा भीमा नदीपर्यंत आणून सोडली होती. तेव्हा तेथील मुनी पुंडलीक याची व विष्णुवर्धनाची गाठ पडली असता, पुंडलीकाच्या विनंतीवरून विठ्ठलाचे देऊळ पंढरपुरात बांधले गेले असावे; असा एक तर्क भारत इतिहास संशोधक मंडळाचे चिटणीस श्री. गणेश हरी खरे यांचा आहे.

हा हकिगतीचा काळ इ. स. १११७ ते ३७ असल्यामुळे तो जर मान्य केला, तर ह्या मूर्तिच्या स्थापनेचा काळ अंदाजे आठशे एकवीस वर्षाइतकाच होऊ शकतो. इतर दाखले पहाता ही विठ्ठलाची मूर्ति विष्णुवर्धनानी स्थापली असावी हे पटते. परंतु मंदिर हे मात्र त्यापूर्वीच येथे असावे असे वाटते. आणि त्यावेळी इतर संशोधकांच्या

म्हणण्याप्रमाणे या मंदीरात श्री शंकराची पिंडी असणे संभवनीय आहे, असेही मत बनते.

"पांडुरंग" असे महादेवाचे एक नाव मद्रासकडे प्रचारात आहे. स्थापित दैवतांना माणसांची नावे देण्याचा जो प्रघात पडला त्यावरून महादेवाला पांडुरंग हे नाव दिले गेले असावे. एका जुन्या ताम्रपटाच्या संशोधनावरून एका ब्राह्मणास 'पांडुरंगपल्ली' हे गाव दान करण्यात आले होते. हेच दान ९ व्या शतकात राष्ट्रकूट शर्वरस यांनी कायम केले होते. त्याच संशोधनात येथील महादेव डोंगराचा एक उल्लेख असून, त्याच शिवस्थानावरून पंढरपुरास 'पांडुरंगपल्ली' हे नाव पूर्वी पडले असावे; असे काहींचे म्हणणे आहे. ह्या दोन गोष्टींवरून ह्या मंदीरात पूर्वी शंकराचे स्थान असावे. पुढे विष्णूवर्धनांनी वैष्णव धर्माचा मार्ग स्वीकारल्यानंतर, एका नव्या कल्पनेनेच ही विठ्ठलमूर्ति बनवून, तिची स्थापना ह्याच मूळच्या शंकराच्या मंदिरात त्यानेच केली असावी. ह्या विठ्ठलमूर्तीची घडण घडविताना त्यांत इथल्या मूळ शिवस्थानाशी समावेश व्हावा, तसेच जैन काळाची साक्ष रहावी आणि चालू इथले शिल्पही दिसावे, अशी योजना करण्यात आली असण्याचाही संभव आहे. कारण मूर्तीचे निरीक्षण करता कमरेखालचा भाग व मुख हे जैन कलाकृतीची झाक देणारे असून, मधला भाग हा अलिकडच्या शिल्पाचा नमुना आहे. व मूर्तीच्या डोक्यावर मूळची शिवपिंडीही आहे. पांडुरंगाच्या मूळ मूर्तीसारखी दुसरी मूर्ति कुठेच दृष्टीस पडत नाही; हेही एक या मूर्तीतले ठसठशीत वैशिष्ट्य आहे. मूर्तीच्या शिल्पातली काही शिल्पाकृतीचा भाग हा मात्र श्री जोगेश्वरी, वेरुळ आणि

चित्तूर येथील तिरुपतिच्या शिल्पाप्रमाणे थोडाबहुत समसमान असा वाटतो. पंढरपूरच्या विठ्ठल मूर्तिबद्दल कैक तज्ञ संशोधकांनी आप-आपल्या परीने निरनिराळी मते व्यक्त केली आहेत. ह्या सर्व संशोध-नाच्या सुरावरून साधारणतः हजाराहून अधिक काळापर्यंत पंढरपूर हे महान् तीर्थक्षेत्र म्हणून गाजत असावे.

### ● जुनी हकिगत व हक्कदार

या तीर्थासंबंधी तेथील वयोवृद्ध जी हकिगत सांगतात, त्यावरून जी माहिती मिळते ती अशी—पूर्वी जे पंढरपूर क्षेत्र मानले जात होते, ते वनमय स्थितीत होते. भीमा नदीच्या काठी फार पुरातन काळा-पासून भाविक स्नानास येत असत. या यात्रेकरूंना रामोशी लुटत. तेव्हा त्या काळातील शालीवान राजाच्या कानी त्याबद्दल तक्रारी येऊ लागल्यावर त्यांनी आपले सरदार कै. रामचंद्र सदाशिव पांचाळ (सोनार) ह्यांच्या हाती अभंगराव, मेहपतराव, उद्धटराव, झुंझारराव ह्या चार कोळी सैनिकास सैन्य देऊन, या क्षेत्री बंदोबस्तास पाठविले. तेव्हा म्हणे एका जीर्ण मंदिरातील आत साचलेल्या मातीच्या ढिगात झाकलेली अशी त्यांना एक मूर्ति सापडली. ते स्थान राजानें त्या चार सैनिकांच्या स्वाधीन केलें. राजाने सैनिकांना जे मंदिर दिले, तेच हे विठ्ठलाचे मूळ मंदिर. त्याचीच पुढे वाढ करण्यात आली.

मंदिर हाती आल्यावर त्या नगराची लोकांनी साफसफाई केली, जंगले तोडली, लुटारूंना हाकलविले. कोळयांनी नदीत नावा सोडून पंढरपूरला नगराचे स्वरूप दिले. प्रथम या इथे वस्ती करणाऱ्या कोळी–सोनार लोकांचा हे गाव सुधारण्यात व मंदिराची देखभाल करण्यात कांहीच कोणताच स्वार्थ नव्हता. निस्वार्थीवृत्तीने, व मानवी

कर्तव्य म्हणून ते कार्य करीत होते. त्यांनी देवळाची व्यवस्था देवळापासून नऊ कोसावर असलेल्या पुळज गावाच्या कुंट्यांकडे सोपविली होती. कुंट्यांना मूलबाळ नव्हते. तेव्हा कर्नाटकातील कोन्हेळे येथील तानबा, तिम्मना, मल्हाळ, शामराज या चार बंधूंकडून देवस्थानाची संपूर्ण व्यवस्था बडव्यांच्या हाती आल्यावर त्यांनी मंदिराच्या उत्पन्नात वाढ केली. व या क्षेत्रास महत्त्वहि प्राप्त करून दिले.

उत्पन्नवाढीमुळे पुढे हक्काचा प्रश्न उपटला. मंदिर कुणाचे ? या संबंधीच्या मालकीबाबतचा खटला कोर्टात उभा राहिला आणि त्यावर न्यायालयाने न्याय दिला तो असा की, 'पंढरपुरातील सर्व शिवस्थानांची देखभाल कोळ्यांनी करावी आणि विठ्ठल व अन्य शेंदूर लावण्यात आलेली दैवते बडव्यांनी पहावीत,' याच न्यायाप्रमाणे सध्या या देवस्थानाचे बडवे हेच श्रेष्ठ अधिकारी समजण्यात येतात.

पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील देवीच्या सेवेसाठी सात सेवेकरी आहेत व त्या त्या हक्काप्रमाणे ते ते कार्य करीत आहेत. देवीची चार वेळा विविधपूर्ण आरती होते. बुधवार व रविवार या दिवशी मूर्तीला अभ्यंगस्नान घातले जाते. आषाढी—कार्तिकीत फार गर्दी असल्यामुळे सर्व विधि बंद असतात. यात्रेनंतर 'प्रक्षाळ पूजा' म्हणून एक विधी होऊन देऊळ स्वच्छ धुतले जाते. मूर्तीला निरनिराळी स्नाने घातली जातात व मग नेहमीप्रमाणे दरदिनीचा कार्यक्रम चालू होतो.

इथल्या लहान लहान देवस्थानांचा, महिन्या दोन महिन्यातून लिलाव होतो. विठ्ठल मंदिराचा मात्र दररोज लिलाव पुकारण्यात येतो.

ह्या लिलावात बडव्यांनाच मंदिर मिळते. यात्रेत ह्या लिलावाचा आकडा खूप वाढतो दरदिनी तो हजाराच्या वरती सहज जात असावा असा तर्क आहे.

## राजेरजवाड्यांच्या कारकिर्दीत

पूर्व कालात ह्या मंदिराचा व विठ्ठल मूर्तीचा फार मोठमोठ्या राजघराण्यांशी संबंध आला आहे. याबाबत मंदिरात शके ११९५ सालातील एक चौऱ्याऐंशीचा शिलालेख प्रसिद्ध आहे. शिवाय अलिकडच्या काळात छत्रपति राजाराम (इ. १६९४ ते १७०९), बाळाजी बाजीराव (इ. १७५३), शाहू छत्रपति (इ १७५४), थोरले माधवराव (इ. १७७०), सवाई माधवराव (इ. १७९०), दुसरे बाजीराव (इ. १७९८), साताऱ्याचे महाराज (इ. १८३७ ते ३८) इत्यादी कैक मोठ्या मंडळींचे निरनिराळ्या कारणास्तव देवस्थानाशी पत्रव्यवहार व प्रत्यक्ष येणेही झाले आहे. काही वेळा या मंडळींनी देवस्थानाला मोठमोठ्या देणग्या दिल्या आहेत. देवाच्या दागिन्यांचे जे एक कोठार आहे, ती मिळकत १॥ लाखावरती सहज होईल. त्यातील किंमती हार हे ह्याच राजघराण्यातील लोकांनी स्वतःच्या गळ्यातून काढून विठ्ठलाच्या अंगावर चढविले आहेत. मोगलाईत या मूर्तीचे कैकदा स्थलांतर करावे लागले. त्यात देवाला बरीच वर्षे भूमिगतही रहावे लागले. विशेषतः पंढरपूरानजीक बेगमपूर म्हणजे पूर्वीचे ब्रह्मपुरी म्हणून जे स्थळ आहे तेथे वारंवार औरंगजेबाचा तळ पडत असे. त्यावेळी त्याची नजर ह्या मंदिरावर असावयाचीच. त्यामुळे विठ्ठलाला कित्येक वर्षे दडविले जाई. एकदा तर स्वतः औरंगजेबाने येथे हल्ला केला होता. पण मंदिरात मूर्ति दिसेना तेव्हा देवळाच्या

दारात हत्तीवर स्वार असलेल्या मूर्तींना दैवते समजून त्या त्यांनी छिन्नभिन्न केल्या.

एका प्रसंगी मात्र विजयनगरच्या कृष्णराव राजाच्या कारकीर्दीत त्याने ही मूर्ति पळविली होती. परंतु पुढे एकनाथाचे पणजोबा संत भानूदास ह्यांनी ही मूर्ति परत आणली असा उल्लेख आहे. भानुदासाचा काळ हा शके १३७० ते १४३५ पर्यंतचा आहे.

मूर्तींच्या ह्या सर्व हालचालींमुळे जुनी मूर्ति ती ही नसावी असेही काहींचे म्हणणे आहे. कदाचित जुनी मूर्ति भंग पावल्यावर कमरे-खालची शाबूत असलेल्या अवयवावरून तो भाग मूळ मूर्तीतल्या शिल्पाप्रमाणे तसाच बनविला गेला असावा व वरचा वेगळा तयार करण्यात आला असावा आणि त्यामुळे विठ्ठलाच्या कमरेखालचा भाग हा जुन्या शिल्पाशी जुळत असावा व वरच्या भागाचा शोध लागणे कठीण पडत असावे, असा माझा तर्क आहे.

पंढरपुरास विठ्ठलाच्या दर्शनास येणारे यात्रेकरू प्रथम चंद्रभागेत स्नान करतात. तेथून पुंडलिकाचे दर्शन घेतात व महाद्वार घाटावरून चालत विठ्ठल मंदिराकडे येतात. चंद्रभागेच्या किनारी अनेक नौका व कैक समाध्या ह्यांचे दर्शन घडते. महाद्वार घाटावरून चालत येत असता दुतर्फा विविध दुकाने दिसतात. काही अंतरावर प्रथम किल्ल्याच्या दरवाजाप्रमाणे भव्य द्वार दिसते. त्यावर विशिष्ट प्रसंगी चौघडा झडत असतो. त्या दारातून बरेच चालून गेल्यावर मंदिराचा भाग दिसून सुरवातीलाच पहिल्या पायरीवर नामदेवाचे दर्शन होते. प्रथम द्वारापासून मंदिराच्या पायरीपर्यंतच्या भागात मध्यंतरी एक शंकराचे जुने

देऊळ आहे. त्या मंदिरात अंधार आहे. ह्या स्थानावरून पूर्वीच्या मंदिराची पूर्ण कल्पना येते.

सध्या पंढरपूरचे मंदिर ज्या स्वरुपात दृष्टीस पडते ते इतके भव्य आहे की, मंदिरात एकदाच प्रवेश केल्याने त्याची रचना चटकन आपल्या लक्षात भरणे कठीण जाते. मुख्य मंदिराच्या भोवती किल्ल्या-सारखा तट आहे. पाचशे पंच्याहत्तर पावलांइतका त्याचा गोलाकार आहे. पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर असे या मंदिराच्या तटाचे चार दरवाजे आहेत. त्यांना दिशांची नावे दिली आहेत. आत जे मुख्य मंदिर आहे, त्याचे तीन भाग पडतात. पहिला 'मुक्ती मंडप' मग 'भव्य चौक' आणि नंतर मंदिर !

आत जे मुख्य मंदिर आहे, त्यात आणखी चार भाग आहेत. पहिला ओटा, दुसरा 'सोळा खांबी मंडप,' तिसरा 'चौखांबी' मंडप आणि नंतर 'देव्हारा'. ह्या मंदिरातून विठ्ठलापर्यंत पोचण्यास आतल्या पाच दरवाज्यातून प्रवेश करावा लागतो. याशिवाय आजूबाजूला जे दरवाजे आहेत, तेथून विठ्ठल मंदिरातील बाहेरच्या अंगाला असलेल्या इतर देवस्थानात जाण्यास वेगवेगळे मार्ग आहेत.

मंदिराच्या समोर येताच प्रथम बारा पायऱ्या लागतात. त्यातील पहिल्याच पायरीखाली संत नामदेवाने समाधी घेतली असल्याचे सांगतात. ही पायरी 'नामदेव पायरी' नावाने ओळखली जाते. ती पितळी आहे. त्याच्या वरच्या अंगाला चौदा मनुष्याकृती आहेत. ते नाम-देवाचे नातलग. नामदेवांनी समाधी घेताच, त्याच्या कुटुंबियांनी चंद्र-भागेत उड्या टाकल्या, असे म्हणतात. ह्याच पायरीवर एका कोपऱ्यात नामदेवाचा पितळी मुखवटा बसविला गेला आहे. मूर्तींची वेषभूषा

मराठे पद्धतीची आहे. भाविक वर चढतात त्या मूर्तीस नमस्कार करतात तेव्हा त्यांच्याकडे पुजारी दक्षिणेची याचना करतात. 'नामदेव पायरीवर पाय देऊ नका' असे सारखे ते ओरडत असतात. वास्तविक पहाता विठ्ठलाच्या दर्शनास येणाऱ्या प्रत्येक भक्ताचे चरण आपल्या मस्तकावर पडून आपला उद्धार व्हावा, ह्या उद्देशाने नामदेवाने हे स्थान समाधीस निवडले होते, असे कथेत आहे. पण पुजाऱ्यांच्या ओरडण्याने मात्र त्या पायरीवर कुणीच पाय ठेवीत नाही आणि त्यामुळे बिचाऱ्या पुंडलिकाची इच्छा काही फलद्रुप होत नाही. पायऱ्यांसमोरच चोखोबाची समाधी आहे. सरदार नाईक निंबाळकर ह्यांनी त्या स्थानाचा नुकताच जीर्णोद्धार केल्याने तेथल्या पुजाऱ्याचे उत्पन्नाचे साधन वाढले आहे. पायऱ्या चढून वर आल्यावर, डाव्या बाजूला तेहतीस कोटी देवाचे देवघर दिसते. तेथे पितळी मूर्ति दृष्टीस पडतात. त्याच जागी एक जुना वाडा आहे. वट-पौर्णिमेला या स्थळी बऱ्याच महिला जमतात.

इथले मुक्ती मंडप म्हणजे देवळाकडे एक जाणारा लहानसा बोगदाच. तेथे गणपतीचे एक आकर्षक स्थान आहे. तेथून पुढे 'भव्य चौक दिसतो. चौकात दोन उंच दिपमाळी दिसतात. एका दीपमाळे-शेजारी एक दगडी रांजण आहे. ते बोधले बुवांचे रांजण. पूर्वी दुष्काल्यात त्याचा उपयोग केला जाई.

चौकात गरुड व मारुतीचे जुने देवस्थान आहे. चौकाच्या दोन्ही बाजूस ओळीने ओवऱ्या (गाळे) आहेत. त्यातील एकात दीड पुरुष उंचीची मारुति–मूर्ति आहे. ती श्रीसमर्थ रामदासांनी स्थापिली असे सांगतात. ह्या येथे संत कन्हैय्या, हरीदास व साधु गुंडोजीबुवा ह्यांची

समाधी आहे. पूर्वी ह्याच जागी बेदरच्या बादशहाचे एक समाधीस्थळ होते असे म्हणतात. पण त्यासंबंधी सध्या येथे काहीच नावनिशाणी राहिलेली नाही. ह्या प्रचंड चौकात पूर्वी किर्तने होत. ती ऐकण्यास सरदार जमत. त्यांच्यासाठी वरती जी खास जागा असे, ते गाळे अजूनही दिसतात. हा चौक पेशव्यांनी बांधला असे म्हटले जाते, पण ते खरे नव्हे. सरदारांच्या आदरातिथ्यास्तव दुसऱ्या बाजीरावाच्या वेळी भक्ताच्या सहाय्याने बडव्यांनी तो उभारला आहे. हा चौक इतका मोठा आहे की तो उलटा केला तर प्रचंड बोट दिसावी. त्याचे क्षेत्र १२०×६० फूट इतके आहे. या जागी फुलवाले बसलेले असतात. तेथूनच पायऱ्या चढून आपण ओव्यांवर गेलों की, सोळा खांबी मंडपाचे तीन दरवाजे लागतात. या ओव्याच्या दोन बाजूला जय–विजयाची शिल्पयुक्त मूर्ति दिसते. ओटीवर एका कोनाड्यात गणपति व दुसरीत सरस्वती आहे. आत सोळा दगडी खांबाचा मंडप आहे, त्यास्तव त्यास 'सोळा खांबी' हे नाव पडले आहे. ह्या मंडपाचा आकार ४१॥×४५॥ इतका आहे. हा सुमारे १५० वर्षांपूर्वी दौंडकरानी बांधला ह्या खांबावर पौराणिक कथेतील बारीक चित्रे चितारलेली आहेत. ह्या 'सोळा खांबा'त एक खांब चांदीच्या पत्र्याने मढविलेला आहे. त्यास 'गरूड खांब' असे नाव आहे. भाविक त्यास आलिंगन देतात व तेथल्या थाळीत पैसा टाकतात. पैशाने थाळी भरावी म्हणून पुजारी पटापट भोळ्या भाविकांना सारखे उत्तेजित करीत असतो.

मंडपात पूर्वी फार काळोख होता तेव्हा आत खिसे कातरले जात असत. आता प्रकाश आत यावा म्हणून वर गवाक्ष करण्याचा सरकारने हुकूम देऊन उजेडाची सोय केली आहे. बडव्यांनी या हुकूमाला


विरोध केला होता असे सांगतात. बाहेर पडण्यास मंडपाच्या दोन्ही अंगाला मार्ग आहेत. सोळा खांबात एक कठडा आहे, तेथून चौखांबी मंडपात प्रवेश केला की ज्या विठ्ठलाची आपण आतुरतेने वाट पहात असतो त्याचे पुढेच दर्शन घडते. ही मूर्ती ३॥ फूट उंचीची आहे. ती पूर्ण सजविलेली असते त्यामुळे मूळ मूर्ति दिसत नाही. मूर्ति चांदीच्या मखरात आहे. भक्त सन १८७२ पूर्वी या मूर्तीस कवटाळीत. परंतु, पुढे एका साधूने मूर्तीच्या पायावर धोंडा मारला. त्यावेळी ही मूर्ती खालीच कोसळावयाची, इतक्यात कै. तात्या पुजारीने ती सावरली. त्या धक्क्याने ते पुढे वेडे झाले असे सांगतात. आता मूर्तीला धीरा म्हणजे आधार दिला आहे. चौखांबी मंडपात एका बाजूला चांदीचा बंद दरवाजा दिसतो. ते देवाचे शेजघर आहे. त्यात चांदीच्या पलंगावर किंमती वस्त्राची शय्या आहे. सोळा खांबी मंडपाबाहेर जो ओटा आहे तेथेही काही स्तंभ आहेत, त्यावर 'कृष्णलीला' व रामायणातील जुनी शिल्पकला दिसते. ह्याच जागी हत्तीदरवाजा दिसतो. त्याच हत्तीवरच्या इथल्या एका शिल्पाला औरंगजेबाने प्रमुख मूर्ति समजून तोडले होते. मंदिराचा पाठचा भाग पहाताना 'दिव्यदेश' शिल्पकलेच्या नमुन्याची कल्पना येते. हे विठ्ठल मंदिर हेमाडी पंथी, दिव्यदेश शिल्परचनेप्रमाणे उभारलेले आहे. ते हेमाड पंथानेच बांधले असावे. मुंबईतील व्यंकटेश मंदिर (फणसवाडी) व हे विठ्ठल मंदीर ह्याची रचना एक आहे. आता आपणाला मंदिराच्या पूर्वीच्या दगडी कळसाच्या जागी नवीन कळस दिसतो. हा २२० वर्षांच्या काळातला असावा. त्यावर छोटे मोठे ९९ कळस व ४२ मूर्ति आहेत. तो भोरच्या संस्थानिकाने इ. १७३८ मध्ये बांधला. यात्रेत देवळात फार गर्दी होते तेव्हां, भाविक या कळसाचे दर्शन घेऊन परतात

आणि मग मूर्तीचे सावकाश दर्शन घेतात. या कळसाला इतके महत्व आहे.

पंढरपूर आणि तिथला विठ्ठल याबद्दल लिहावे तितके थोडे आहे. हे मंदिर जर बारकाईने पहावयाचे झाले तर तीन चार तास सुद्धा अपुरे पडतात. एका दिवसात तर सर्व गोष्टी ध्यानात येणेही अशक्य होते. पंढरपूरच्या विठ्ठल–मंदिरात विठोबाची मूर्ती पहाताना आपणाला एक प्रश्न पडतो तो असा की, इथे विठ्ठल आहे; पण तो एकटाच कसा? विठ्ठलाचे दर्शन आपणाला घडले खरे, पण त्याच्या रुक्मीणीचे? ती कुठे आहे? पंढरपूरच्या विठ्ठलाची रुक्मीणी त्याच्या सोबतच आहे पण याच्या शेजारी नव्हे. ती याच मंदिराच्या आवारात आहे. विठ्ठल–मंदिराच्या बाजूलाच रुक्मीणीचे स्वतंत्र मंदीर आहे ते कसे आहे ते आपण पुढील लेखांत पाहूं.

ॐ ●

# देवी रुक्मिणी



पंढरपुरांतील देवी रुक्मिणीच्या मूळ मूर्तीचे छायाचित्र

# ३

पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराचे आवार मूळात प्रशस्त; त्यामुळे त्याच्या प्रत्येक कोनात वेगळे असे देवस्थान नसते तरच नवल! विशेष म्हणजे इथल्या प्रत्येक देवस्थानाला स्वतंत्र आख्याइका आहे. ह्यातली कांही श्रद्धास्थाने मूळची आहेत. कांही नव्याने निर्माण झाली आहेत. येथले रुक्मिणी मंदिर हे विठ्ठल मंदिराच्या आवारातलेच, पण रचना आहे स्वतंत्र, व्यवस्था आहे वेगळी. विठ्ठल मंदिराच्या चार द्वारात महाद्वाराच्या जोडीला पाठच्या अंगाला दक्षिणद्वार आहे. या दक्षिणद्वाराचे दुसरे नाव 'रुक्मिणीद्वार.' या द्वाराला हे नाव पडण्याचे कारण हे की, या द्वारासमोर जे मंदिर लागते तेच रुक्मिणीचे.

कुठल्याही विठ्ठल मंदिरात विठोबाच्या शेजारी रुक्मिणीचे दर्शन घडते. पण प्रत्यक्ष पंढरपूरातील विठ्ठल मंदिरात विठ्ठलाशेजारी रुक्मिणी न दिसता जी दृष्टीस पडते ती आपल्या स्वतंत्र मंदिरात इतरत्र विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्ति एकत्र आहेत त्या भक्तांच्या सोयीस्तव. पण पंढरपुरात तसे नाही. इथे निर्माण झाला प्रथम पंढरी. मग मागून आली रुक्मिणी. ही दोन्ही मंदिरे जवळ खरी; पण त्यांच्या स्थापनेत अंतर किती तरी! परंतु हे अंतर भक्तांना कुठ जाणवते? प्रथम तो दर्शन घेतो विठ्ठलाचे आणि त्याच भक्तिभावाने नंतर रुक्मिणीचे!

**• उत्सवातील उत्साही वातावरण**

या दोन्ही मंदिराच्या रचनेत मोठीच मौज आहे. दिसण्यात सारखेपणा, पण तो तसा नाही हे त्याचे वैशिष्ट्य! आषाढी कार्ति-

कीला पंढरपुरात मोठी यात्रा भरते, तेव्हा भजनाने मंदिर दुमदुमून निघते ते विठ्ठलाचे, पण स्त्याने निनादून निघते रुक्मिणी मंदीर. या यात्रेला दोन्ही ठिकाणाची गर्दी अपूर्व ! ही गर्दी तर अडविण्यासाठी जाडजूड साखळदंड योजावे लागतात. लोक बाहेर येत नाहीत. स्वयंसेवकांनी खेचले तरी ते बाहेर निघत नाहीत, मग कुणी अडखळतो, घसरतो, मूर्च्छीत पडतो, प्रसंगी मृत्यूलाही कवटाळतो. मंदिर असते अशा वेळी चोवीस तास उघडे. पण जनसागराच्या भरतीचे प्रमाण ओसरण्याऐवजी सारखे वाढतेच. यात्रेत सरकारी पहारा असतो पण तो रात्री दहापर्यंत. मग सारी जबाबदारी येऊन पडते ती मंदिराच्या हक्कदारावर.

विठ्ठलाच्या हक्कदाराना म्हणतात बडवे ! आणि रुक्मिणीचे हक्कदार ते उत्पाद ! इथले बडवे वस्ताद म्हणजे हुशार तितकेच कर्तृत्वान ! मेहनती ! उत्पाद हे थंड, नमणारे, उत्पन्नाची अधिक अभिलाशा न धरणारे. 'बडव्यां'च्या जोडीची पंढरपूरात दृष्टीस पडणारी एक जात म्हणजे क्षेत्रोपाध्ये. स्टेशनावरून यात्रेकरू बाहेर पडला रे पडला की त्याला गराडा घालतो तो क्षेत्रोपाध्याय. ठराविक दक्षिणा घेऊन यजमानाला विठ्ठलापर्यंत पोहचविणे हेच त्याचे काम. पण तो तेवढ्यावरच थांबत नाही. तुमची रहाण्याची सोयही आपल्या घरी तो करून देतो. यात्रा असो किंवा कोणता आड दिवस असो, क्षेत्रोपाध्याला एकदा दक्षिणा देवून बांधून ठेवला की, पंढरपूरच्या विठ्ठलापर्यंत जाण्यास एरव्हीइतके प्रयास पडत नाहीत. दहानंतर विठ्ठल मंदिर उघडे असते ते या क्षेत्रोपाध्याच्या यजमानासाठीच. या लोकांची पंढरपूरात किती तरी घरे ! कित्येक

धनिकांनी ती त्यांना पूर्वीच्या काळात दान केलेली आहे. एरव्ही या घराला भाड्याचे उत्पन्न नाही. पण यजमानाला भोजनासह घरात ठेऊन या क्षेत्रोपाध्याने त्यातून उत्पन्न उभे केले आहे. क्षेत्राच्या क्षेत्रपाळाबद्दल बहुधा नेहमीच वाईट उद्गार निघतात. पंढरपूरनेही त्याबाबत नाव केले आहे. पण ते पूर्वी. आता येथले सारेच वातावरण बदललेले आहे. तरीही इथले जे काही जन्मजात गुण आहेत ते कसे जाणार? विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात यात्रेकरूंचा बाजार मोठा. जागोजागी दक्षिणा टेकलीत तरच तुम्ही 'भाऊसाहेब!'। एरव्ही तुम्हाला गर्दीत विचारतो कोण! खिसा भरलात तर ओळीतून पुढे सरकता. खिसा रिकामा असला तर तासन् तास निकामी जातात. रांग काही हटत नाही आणि पुढे जाणे काही जमत नाही.

### • नवरात्रातील वैभव

आषाढी यात्रा ही मूलतः पंढरीनाथाची. पण त्याने रुक्मिणी मंदिराचे तेज वाढते. हे तेज जे वाढते ते विठ्ठल मंदिरामुळे. परंतु रुक्मिणी मंदिर स्वतंत्ररीत्या तेजस्वी दिसते ते नवरात्रोत्सवात. तेव्हा देवी दागिन्यांने मढून निघते आणि तेजाने किती तळपते! रुक्मिणीचा खराखुरा शृंगार पहावा तो नवरात्रातलाच. मूळात लक्ष्मीनी हेवा करावा इतके या विठ्ठलाच्या रुक्मिणीचे अलंकार! किती पाणीदार मोती आणि किती हिरे! सोन्याच्या अलंकाराला तर गणतीच नाही. महाराष्ट्रात जे जे श्रीमंत म्हणून वावरले त्यांचे केव्हा ना केव्हा तरी पंढरपूर क्षेत्री पाय लागलेच. ते जेव्हा गेले तेव्हा त्यांनी अंगावरचे सारे सोने या दैवतापुढे ठेवले. श्रीमंतांच्या गृहिणीने तर त्यावर वरचढ केली. आपल्या अलंकारांना रुक्मिणींच्या गळ्यात

जागा देऊन त्या थांबल्या नाहीत, तर घरी येताच त्यांनी घरातल्या किती दागिन्यांची रुक्मिणीकडे रवानगी केली त्याची तर गणतीच नाही. ह्यातल्या बऱ्याच अलंकारांचे आपल्याला दर्शन घडते ते या नवरात्रोत्सवात. म्हणूनच की काय नकळे, पण पंढरपुरच्या साऱ्या स्त्रिया या उत्सवप्रसंगी चार चारदा मंदिरात येतात व घरात बोलत बसल्या की चार चार तास रुक्मिणीवर चर्चा करतात. हा उत्सव एकतीस दिवसांचा असतो तो अलोट उत्साहाने साजरा होतो.

**● दसरा उत्सव**

रुक्मिणीचे सुवर्ण तेज निरीक्षण्याचा दुसरा इथला महत्त्वाचा दिवस म्हणजे दसरा ! एकाधा तज्ञ सोनारालाही ओळखू येऊ नयेत, अशा सुवर्ण अलंकारांनी यावेळी रुक्मिणी नटते. मोत्या हिऱ्याचे हार तर त्यात कैक, की जे पहाता गर्विष्ठ श्रीमंतानेही हार खावी. ही अलंकारांची यादी किती मोठी व मोहक! गोट, पाटल्या, तोडे, पैंजण, साखळ सरी, कंठा, चंद्रहार, मोहरा पुतळी, चौकट पेटीची माळा, तानवडी, कर्णफुले, मंगळसूत्र इ. झाले सुवर्ण अलंकार! जडावाचे अलंकार म्हणजे कमरपट्टा, पाचू हार, (की ज्यात आहेत पाणीदार मोत्याचे लोंबते सर) तशीच मोत्या पाचूंची ठुबी, बिंदी, बिजवरा, बाजूबंद, मुकुट, कर्णमत्स्य, तन्मणी कर्णफुले इ. मोत्याचे अलंकार, पेठ्या, कंठे, पाटल्या, जव पोत, पोतपाटल्या, बांगड्या बाजूबंद, मोती बिंडी, माती बिजवरा, काप पुतळी, नथ इ. आहेत. राजवाडी अलंकाराचे, (की जे देवीला अर्पण केले गेले आहे ते राजेरजवाड्याकडून) नक्षीकाम तर अपूर्वच आहे. पण या नक्षीची ठेवण निरीक्षण्यात त्याचे दिवसेदिवस अपुरे पडावेत अशी आहे. त्यातील सौंदर्यात अपूर्वता

आहे! त्यात दडले आहे महाराष्ट्राचे जुने वैभव! मराठेशाहीच्या उदारतेचा बाणा! छे! हा अलंकार फक्त आपण हाती घ्यावयाचा! तो हाती घेतला की वाटते आपण स्वतंत्र खरे पण यंत्रयुक्त असे! आपल्यात आता राहिले आहे कुठे ते तेज की ज्यायोगे त्या अलंकाराचे तेज आपण पारखावे! जे देणारे थोर होते त्यांनीच ते द्यावेत आणि त्याचे मूल्य त्यांनीच पारखावे! आपण तो लांबूनच पहावा आणि फक्त उसासा सोडावा!

### ● जुनी रुक्मिणी व तिची कथा

रुक्मिणीची पंढरपुरात एक मजेदार कथा प्रचलित आहे ती अशी : एकदा राधेला इच्छा झाली कृष्णाला भेटण्याची. रहावेचना म्हणून अखेर ती त्याच्यापाशी धावतच गेली. कृष्णच तो! तशात राधा आपणहून जवळ आलेली. मग तो थोडाच शांत बसणार! त्याला आले प्रेमाचे भरते आणि त्याने राधेला म्हटले, "अग माझ्याजवळ तर आलीस, मग आता अशी दूर का?" राधेलासुद्धा तेच हवे होते. तिने इथे तिथे चोरट्या नजरेने पाहिले आणि पटकन् कृष्णाच्या मांडीवर बस्तान ठोकले. पाठीमागे होती रुक्मिणी. तिने हे पाहिले. स्त्रीच ती! तशात कृष्णाची प्रिया! ती हे मुकाट्याने सहन करणार? ती खूप चिडली! आणि रुसून फुगून ती जी तेथून निघाली ती पंढरपूरच्या दिंडीकारण्यात! (हा भाग अजून अस्तित्वात आहे. पंढरपूरच्या जवळच हे स्थान आहे.) रुक्मिणीचा रुसवा कृष्णाच्या चांगल्या परिचयाचा; म्हणूनच वेळ न दवडता कृष्णही आले या वनात. ते रुक्मिणीला भेटले. पण रुसवा घालविण्यापूर्वीच त्याची दृष्टी गेली जवळच्याच चंद्रभागातटी पितभक्ति करीत असलेल्या

पुंडलीकावर ! परीक्षा घ्यावी म्हणून रुक्मिणीला त्या रुसलेल्या स्थितीतच ठेवून ते त्याच्याजवळच आले ! आणि मग तो चमत्कार घडला की ज्याने हाच कृष्ण विठ्ठलस्वरुपात पंढरपूरात वीटेवर कायमचा उभा राहिला ! अर्थात रुक्मिणीचे मंदिर आणि ही कथा याचा तसा काही संबंध नाही. पण रुक्मिणीच्या मंदिरात नव्याने पाऊल टाकणारा कुणीका यात्रेकरू असेना ! रुक्मिणी इथे कशी? असा कुणी तेथल्या परिचयकाला प्रश्न केला की तो नेमकी हीच कथा सांगतो. खरे म्हणजे या कथेचा संबंधच असला तर तो आहे दिंडकारण्यात असलेल्या रुक्मिणीच्या मूर्तीशी. दिंडीकारण्य आहे चंद्रभागेच्या पलिकडच्या तटावर. तेथेही एक रुक्मिणीची मूर्ति आहे रुसलेल्या स्वरुपात ! ही कथा आहे त्या मूर्तीची. आता ही कथा आधीची की मूर्ति आधीची हे मात्र न सुटणारे कोडे ! दिंडीकारण्यातली मूर्ति आणि रुक्मिणी मंदिरातील रुक्मिणीची मूर्ति यात पहिली मूर्ति मात्र दिंडीकारण्यातलीच. तीच पंढरपूरातली जुनी रुक्मिणीची मूर्ति !

### ● मंदिर व तेथला पुण्यशील कासव

तसे पाहू जाता विठ्ठल मंदिर आणि रुक्मिणी मंदिर ही दोन्ही जुनीच मंदिरे. अर्थात् त्यातही विठ्ठल मंदिर व रुक्मिणी मंदिरामधील बांधणीतले अंतर मोठे. हे मंदिर रुक्मिणीचे खरे पण ते रुक्मिणीस्तव बांधले गेले काय? छे! मूळ मंदिर आणि रुक्मिणी यांचा तसा संबंधाचा धागादोरा कुठेच जुळत नाही. वाटते की मंदिर असावे अन्य दैवताचे आणि नंतर ते झाले असावे रुक्मिणीचे. हा फरक कुणालाही जाणवतो पण तो केव्हा, तो या रुक्मिणीच्या मूर्ती शिल्पाचा ठसठशीतपणा नजरेत भरवून या मंदि-

राचे जेव्हा बारकाईने निरीक्षण करतो तेव्हा. मूर्तीच्या मानाने हे मूळ मंदिर वाटते म्हातारे. या मंदिराची रचना तशी छान आहे. बाहेर आत जाण्याला आहेत दोन दरवाजे. शिवाय यात असा एक दरवाजा आहे की जो भक्ताला क्षणात विठ्ठल मंदिरात; तर क्षणात रुक्मिणी मंदिरात नेतो. हा दरवाजा आहे विठ्ठल मंदिराच्या सोळा खांबी मंडपाजवळ. मंदीरासमोर भव्य पटांगण आहे. तेथे आहे मंडप. तो बांधला आहे हैदराबादच्या एका सरदाराने. त्याचे नाव सरदार चंदूलाल आणि जात पाठारे प्रभु. तेथे होतात कथा कीर्तने. तेथे आहे दीपमाळ ! पण ती आहे सध्या कोपऱ्यात. बरोबर, पूर्वी ती होती मध्यभागी. विचारवंतांना ती अडगळ वाटली. म्हणून त्यांनी तिला बसविली कोपऱ्यात. पण तसे करताना त्यांचे मन भ्याले. म्हणून त्यांनी त्या दीपमाळीच्या मूळ जागी कासव बसविला आहे. जाता येता भक्त त्यावर पुष्पे वहातात. खरं म्हणजे दीपमाळीने केला त्याग ! स्वत्वाचा व स्वतःच्या हक्काच्या जागेचा ! पण तेथे बसलेला कासव मात्र ठरला आहे उगाच पुण्यशील; लोकांनी पूजा बांधावी इतका पुण्यवान !

**● मंदिराचा कळस**

ह्या मंडपा पुढल्या दोन पायऱ्या चढल्या की दिसतात नक्षीदार खांब ! मग रुक्मिणीचे देवघर आणि मग रुक्मिणी ! ती असते अलंकारात मढलेली. मूळ मूर्ति दिसते दुर्मिळ. पण ज्याला ती पहावयाला मिळते तो खरा भाग्यवान. कारण ती मूर्ति मोठी रेखीव ! त्यावरच शिल्प आहे ठसठशीत. नजरेत पूर्ण ठासून रहावे इतके ! मंदीरात एक चांदीचा दरवाजा दृष्टीस पडतो की जो सदा बंद

असतो. ते रुक्मिणीचे शेजाघर. बाजूलाच दोन देवघरे आहेत, त्यातल्या एकात सत्यभामा व दुसरीत राही आहे.

रुक्मिणीच्या मंदीराचे प्रमुख शिल्प आकर्षण म्हणजे या मंदीरावरचा नटलेला कळस! एक भव्य कळस व आजूबाजूला छोटे छोटे कळस अशी या मंदिराच्या शिखराची मोहक रचना! हे छोटे कळस आहेत १००, शिवाय या भोवताली ३६ विविध मूर्ति आहेत. कै. बाळाजीपंत नातू ह्यांनी हा कळस बांधला व रुक्मिणी मंदिराच्या आकर्षकतेला एक आगळेपणाच प्राप्त झाला.

**● आवारातील दैवते**

रुक्मिणी देवालयाच्या एका अंगातून बाहेर पडले की समोर एक भव्यसा दगडी शिलालेख दृष्टीस पडतो. तोच पंढरपूरात प्रसिद्ध असा चौऱ्याऐंशीचा शिलालेख! एका काळी हा शिलालेख म्हणजे इथल्या भाविक लोकांचे केवढे मोठे जागृत दैवत! असे म्हणत की या शीलेला जो पाठ घासील त्याचे पाप नष्ट होऊन तो मोक्षाचा मार्ग धरील! मोक्षासाठीच तर पूर्वीच्या यात्रिकरूंची धडपड! तेव्हा विठ्ठलापाशी आलेला प्रत्येक यात्रेकरू या शिलेला पाठ लावल्याशिवाय थोडाच रहाणार! मग काय! त्यास्तव रांग लागे. लोकांची धडपड आणि गडबड कोणे माजे! त्यामुळे झाले काय? या शिलेवर इतक्या वर्षात इतक्या पाठी घासल्या गेल्या की त्याने या मूळ शिलालेखावरच महत्त्वाचा लेखच पुसला गेला. मुंबईचे पूर्वीचे पंतप्रधान बाळासाहेब खेर हे जेव्हा एकदा पंढरपूरला गेले तेव्हा ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. तेव्हा त्यांनी या महत्त्वाच्या शिलेला भक्ताच्या पाठी-

पासून मुक्त केले. हा शिलालेख आता सुरक्षित आहे. अर्थात भक्तांच्या पूर्वीच्या वर्तनाने त्याची बरीच हानी झाली आहे. शिलालेखाच्या बाजूलाच, एक नवग्रहाची पहाण्याजोगी शीळा आहे. मग बाजूला रांकेने कितीतरी ओवऱ्या आहेत. कै. कानबाबा बंडाळे यांनी त्या भक्ताच्या आरामास्तव बांधल्या पण आता त्यातल्या काहींवर विश्वनाथ, राम-लक्ष्मण, कुत्र्यावर आरुढ झालेला काळ भैरव, दत्तात्रय, रामेश्वर, लिंग, नरसोबा आदी दैवते बसवून उत्पन्नाचे साधन केले गेले आहे. ही सारी आहेत बाजारी स्वरुपाची दैवते. याच आवारात एक व्यंकटेश्वराचे मंदिर आहे. तेथली मूर्ति मात्र मोहक आहे. त्या समोर आहे लक्ष्मी मंदीर. हे मंदीर किती छान ! तर आतील मूर्तिचे नाव लक्ष्मी, पण देखणेपणात ती कितीतरी उणी! हे मंदिर मूळ काही लक्ष्मीचे नव्हे ! तेथे लक्ष्मी आली आहे नव्याने. केवळ उत्पन्नासाठी. विठ्ठल मंदिराच्या बाजूला एक महत्त्वाचे भक्तिघर आहे त्याला म्हणतात तरळाचे झार ! तेथे दृष्टीस पडतो एक चमत्कार ! तेथे दगडातून तरळाचा वृक्ष निर्माण झाला आहे. या वृक्षामागे एक कथा आहे. ती कथा आहे संत कान्होपात्राची.


### ● अद्‌भुत कथा

कान्होपात्राचे मूळ नाव कान्हू. ती मूळची देवांची दासी. देवदासींना पूर्वी पात्राही म्हणत. त्याचवरून तिचे नाव पडले कान्होपात्रा, ती मंगळवेढ्याची रूपवान सुंदरी ! शब्दाला गोड! गाणे पण म्हणे मिठास ! अशा या देवदासीची वार्ता गेली बादशहाच्या कानावर ! त्याने दिले कान्हूला निमंत्रण !

कान्हू घाबरली. भेदरली आणि पंढरपूराला पळाली. तिथे तिने धरले विठ्ठलाचे पाय, आणि मागणे मागितले एकच! देवा, मला मुक्त कर! बादशहाच तो! कान्हू मंगळवेढ्यात नाही हे कळताच त्याने तिचा केला तपास आणि विठ्ठल मंदिराकडे केला पाठलाग. पण कान्हू होती कुठे तिथे, पांडुरंगाने तिची करूणा ऐकून तिला केली होती गुप्त! तेथल्याच एका दगडात! ज्या दगडातून पुढे तरटीचे झाड निर्माण झाले; तोच तो पाषाण की ज्यात विठ्ठलाने कान्हूला गुप्त करून मुक्त केले. त्या वृक्षा सोबत एक छोटेसे जे मंदीर आहे ते कान्होपात्राचे. त्या तरटीच्या वृक्षाची कथा ही अशी.

पंढरपूर क्षेत्राचे एक मोठेच वैशिष्ठ्य आहे. तेथल्या कुठल्याही स्थानी या, तेथला पुजारी तुम्हाला कथा-आख्यायिका ही सांगणारच! काही काही वेळ तुम्ही कंटाळाल पण सांगणारा आपली तीच ती रेकॉर्ड लावण्याचा कंटाळा करणार नाही. या आख्यायिका आणि कथेमुळे तर महिलांना पंढरपूर प्रिय झाले आणि वृद्धाचे आवडते क्षेत्र बनले. आख्यायिकेचे आकर्षण वगळता मात्र महिलाचे पंढरपूरातले आवडते श्रद्धास्थान एकच! ते म्हणजे रुक्मिणी मंदीर!

# भक्त पुंडलिक



चंद्रभागेच्या वाळवंटात असलेल्या
पुंडलिक मंदिरातील पुंडलिक

# ४

सर्व सेवेत श्रेष्ठ सेवा म्हणजे मातृसेवा ! परंतु खरे म्हणजे त्याहीपेक्षा अधिक श्रेष्ठ पितृसेवा ! मातेची ममता सरसकट सर्वच जाणतात; परंतु पितृऋण ओळखणारे फारच थोडे ! पितृसेवेचे श्रेष्ठ प्रतिक म्हणजे पुंडलिकाची पितृसेवा ! संसारांत असामान्य सेवेचेच हे एक उदाहरण ! पुंडलिकाना मातृऋणाची जाणीव तर होतीच परंतु पितृऋणातून मुक्त होण्याची त्याची ओढ तर अपूर्वच !

प्रत्यक्ष परमेश्वर समोर यावा आणि पितृसेवेत मग्न झालेल्या पुंडलिकाला त्या सेवेपुढे परमेश्वरही तुच्छ वाटावा ? सेवेतली ही केवढी अपूर्वाई ! प्रत्यक्ष परमेश्वराने पुंडलिकाची परिक्षा घेण्यास यावे आणि परमेश्वरावरच परिक्षा देण्याचा प्रसंग गुदरावा ? केवढी अद्भूत घटना ही ! !

पितृभाक्तियुक्त सेवाशाक्तिने पुंडलिकाने प्रत्यक्ष परमेश्वराला स्तब्ध करावे ? पुंडलिकाच्या पितृभाक्तिपुढे ज्या भूमित परमेश्वराची परमशक्ति शरण गेली ते भूवैकुंठ पंढरपूर आणि ज्याने तिला शरणागती स्वीकारणे भाग पाडले तो भूपुत्र पुंडलिक ; हे दोन्हीही खरोखरच धन्य होत !

## • वैकुंठ दर्शन घडविणारी आषाढी यात्रा

पुंडलिक हा थोर पुरुष महाराष्ट्राला पितृसमान असलेल्या पंढरपूरसारख्या श्रद्धास्थानी जन्माला आला आणि महाराष्ट्र मातेसमान मानणाऱ्या चंद्रभागेच्या तीर्थतटी निद्रीस्त झाला. पुंडलीकाने

चंद्रभागेच्या वाळवंटात ज्या जागी समाधी घेतली; त्याच जागी सध्या पुंडलिकाचे आकर्षक मंदिर आहे. पितृसेवेचे महान कार्य पुंडलिकाकडून घडले ते ह्याच स्थानी. अर्थात तसा पुरावा नाहीच, परंतु पुराव्याचे महत्त्व संशोधकांना, चिकित्सकांना, तर्कवितर्क करणारांना येथे येणारे शुद्ध विचाराचे व भोळ्या मनाचे भक्त श्रेष्ठ मानतात श्रद्धा ! पुंडलिकाचे हे श्रद्धास्थान आहे इतके त्यांना कळले मात्र, की त्यांचे मन भक्तिने भरून येते. अंतःकरण कारुण्याने ओलावते आणि शीर आदराने झुकते. आषाढी कार्तिकेतील यात्रेत तर मंदीरातील पुंडलिकाची प्रतिमा पहाणें म्हणजे मोठेच दिव्य ! निश्चयी आणि निग्रही भाविक हेच काय ते यात यशस्वी व्हावयाचे ! इतर भाविकांची सेवा घडते ती दुरून ! लांबून नमस्कार करण्याइतपत.

पंढरपूरची आषाढी यात्रा सुरू झाली की तीन दिवसांनी पौर्णिमेला येथे दहीकाल्याचा उत्सव होतो. मग ही यात्रा पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे पूर्णाकार धारण करते. पौर्णिमेचे शुभ्र चांदणे एरव्ही सर्वत्रच सुखद वातावरण निर्माण करते. परंतु आषाढी पौर्णिमेला पंढरपूरास ते प्रत्यक्ष वैकुंठ दर्शन घडविते !

या आषाढी यात्रेत पंढरपुरांतील टाळ मृदुंग विश्रांती विसरतात ! पताका चैतन्य मूर्ति बनतात आणि भजन कीर्तनेही 'पुंडलीक वरदे' च्या गर्जनेने नभ गजबजून सोडतात.

### ● पंढरपूरचा वारकरी पंथ

पुंडलिकाने पांडुरंगाच्या हस्ते पंढरपूर निर्माण केले. ते पुढे वारकऱ्यांनी जागविले. वारकऱ्यांच्या स्वारीमुळेच पंढरपूर जागृत राहिले. हा वारकरी पंथ फार मोठा. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्रा बाहेरही तो

जागोजागी विखुरलेला. हा पंथ म्हणजे एका अर्थी सेनाच ! भगवा ध्वज हे या सेनेचे निशाण ! मोठी तुकडी म्हणजे 'फड' लहान तुकडी म्हणजे 'दिंडी' ! हा वारकरी सैनिक तसा मोठा विचित्र ! तो रोज युद्ध पुकारतो. स्वतःशी स्वतःच ! हे युद्ध असते भोवतालच्या षड्रिपूंचा नाश करण्यासाठी ! या सैनिकांचा नायक कोण ? तर तो पांडुरंग ! आणि उपास तपासाची व्रते ही या पंथाची शस्त्रे ! महिन्यातील पंधरवड्यात किंवा शुद्ध एकादशीला वारकरी सैनिक आपला नायक जो पांडुरंग त्याचे नियमित दर्शन घेतो.

'वारी' म्हणजे 'येरझाऱ्या' ! जे 'यात्रा' करणारे ते वारकरी ! परंतु वारंवार जे यात्रा करतात ते वारकरी असतातच असे नाही. 'वारकरी' पंथाचे पालन जो करतो तोच वारकरी. नुसती वारी करणारे वारकरी महाराष्ट्रात कैक ! काही जेजुरीच्या खंडोबाची वारी करतात. काही गाणगापूरच्या दत्ताची आणि काही शिर्डीच्या साईबाबाचीही !

महाराष्ट्राबाहेर गुजराथेतही वारकरी पंथ आहे. तो तेथल्या डाकोरजींची वारी करतो. आषाढी यात्रेला पंढरपूरला २॥ लाख वारकरी जमतात आणि सबंध वर्षभरात ती संख्या ५ लाखांपर्यंत पोचते. म्हणूनच वारकरी म्हणजे तो पंढरपूरचाच असा सर्वांचा समज ! महाराष्ट्राव्यतिरिक्त कर्नाटक, मद्रास, बंगलोर, इंदोर, गुजराथ आदि परप्रांतियांचीही पाऊले पंढरपूरच्या वारकऱ्यांच्या वारीत दरवर्षी पडतात हे या वारकरी पंथाचे खास वैशिष्ट्य !

## • वारकऱ्याचा पंथ आणि व्यासंग

पांडुरंग कृष्णरूप आहे. तेव्हा, पंढरपूरचा वारकरी पंथ कृष्ण भक्तीचा भोक्ता आहे हे ठरलेच. कृष्णास अतिप्रिय असलेली तुळशी

माळा ही वारकऱ्यांच्या गळ्यात दिसते ती यास्तवच ! वारकऱ्यांच्या गळ्यातील ही माळ असते १०८ मण्यांची. ही माळा घालणाऱ्या काही वारकऱ्यांना माळकरी म्हणतात.

वारकरी गळ्यात तुळशीमाळा घालतात, काही माळकरी पंथ, 'गाणपत्य' पोवळ्याची, 'शक्ति' हे कवड्याची आणि 'शैव' हे रुद्राक्षाची माळ घालतात. फरक इतकाच आहे की, वारकरी पंथ पंथाचे बंधन म्हणून माळ घालीत असतो, तर इतर जपासाठी माळा घालतात ! गुरुनी गोवून दंडाला बांधलेल्या गंड्याचे जसे एक महात्म्य आहे, तसेच वारकऱ्याच्या या माळेचे एक विशिष्ट व्रत आहे. ही माळ संताकडून गळ्यात चढविली जाते आणि तुटली तर पुन्हा घालताना शुद्धतेसाठी उपवासाचे व्रत स्विकारावे लागते. वारकरी पंथाचे कार्य म्हणजे भागवत धर्माचा प्रचार ! हरी कीर्तन हे या प्रचाराचे प्रमुख साधन !

गळ्यात तुळशी माळा, कपाळावर टिळा, ठरलेल्या दिवशी पंढरपूरची वारी, एरव्ही भजन व हरीनाम, हा वारकऱ्यांचा संकल्प ! वारकरी हा अत्यंत दृढ निश्चयी ! तो भिक्षूक नव्हे ! तो दिसेल साधा भोळा पण मोठा व्यासंगी ! संताच्या ओव्या आणि अभंगाच्या ओळी या सदा त्याच्या ओठावर नाचत्या ! अंतःकरणात ज्ञानेश्वराचे भाष्य तर खच्चून भरलेले ! वारकऱ्यात जातीभेद नाहीं. व्यवसाय-भेद नाही ! त्यात शेतकरी आहेत तसेच सधनही. त्यांच्यापुढे आदर्श एकच ! पितृसेवेचा ! पुंडलिकासारख्या पितृसेवाचा आदर्श पुढ्यात ठेवून पितातूल्य पंढरीनाथापुढे सदा मग्न रहाणे हेच त्याच्या जीवनातले उच्च ध्येय !

ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........


## मंदिराचे हक्कदार

पंढरपूरच्या पुंडलिक मंदिराचे हक्कदार आहेत तेथले कोळी. या देवळाची सर्व सूत्रे त्यांच्याच हाती. पंढरपूरच्या साऱ्या इतिहासात हा कोळी समाज तर अति महत्त्वाचा ! अभंगराव, अधटराव, नेहत्रराव, आणि झुंझारराव अशी चार कुळे राजाज्ञेवरून येथे आली. काही काळ त्यानी येथे राज्य केले म्हणूनच त्यांच्याच घराण्याकडे इथल्या शंकर स्थानांचा मालकी हक्क आहे ! त्यात पुंडलिक मंदीर प्रमुख !

पंढरपूरचा हा कोळी समाज हा मच्छीमारी कोळी ज्ञातीतला नव्हे. हा नावाडी समाज. हे मूळचे मराठेशाहीतील आरमारी सैन्यात शूरत्व गाजविणाऱ्यापैकी कोळी ! चंद्रभागेत ज्या ‘नावा’ दिसतात, त्यांचे हे मालक.

सन १९२६ पर्यंत रेल्वेचा फाटा जोपर्यंत पंढरपुरापर्यंत पोहोचला नव्हता, तोपर्यंत हा कोळी आपल्या नावेतून यात्रेकरूंना पुंडलिकाच्या मंदिरापर्यंत आणून सोडीत ! नदीवर पूल होऊन पंढरपूर स्टेशन झाल्यानंतर कोळ्यांचे हे उत्पन्न बुडाले. ब्रिटीशांनी त्यांना पंढरपुरातील जमिनी तोडून दिल्या. तेव्हांपासून हे नावाडी शेतकरीही झाले. ज्ञानाचा दीप दीर्घकाल न पाहिल्यामुळे अज्ञानाने त्यानी बरेच हक्क गमाविले. नाहीतर पंढरपूरच्या मूळ मालकांपैकीच ते एक !

या समाजातले श्री. गणेश सावळाराम अभंगराव ह्यांनी स्वकर्तृत्वावर आपल्या ज्ञातीला गेल्या पंचवीस वर्षांत मोठीच मानाची जागा मिळवून दिली आहे. सन १९२३ साली ते मॅट्रीक

झाले. इथल्या कोळी समाजातील ते पहिले मॅट्रीक. स्वराज्य चळवळीत त्यांनी तन मन धन वेचले. ज्या सुमारास ते पंढरपूरच्या नगरपालकेच्या अध्यक्षपदावर विराजमान झाले आणि मग पुंडलीकाच्या पंढरपूरचा हा कोळी हक्कदार समाज अशिक्षित म्हणून जो मागे हटविला जाई तो तितक्याच झपाट्याने पुढे आला.

**● मंदीराच्या बांधणीचे वैशिष्ट्य**

पुंडलिकाची मूळ समाधी कुणी बांधली याची नोंद मिळणे अवघड आहे. परंतु समाधीच्या स्थानी नंतर बांधण्यात आलेले छोटे मंदीर सन १७५० मध्ये होळकरांनी वाढविले. त्याचा जीर्णोद्धार सन १८५० मध्ये नंदराम नामक व्यक्तीने केला व श्रीधर कृष्ण माटे यांनी सन १८७८ मध्ये सभा मंडप उभारला.

चंद्रभागेच्या वाळवंटावर उभारण्यात आलेले हे मंदीर जुने ! पुरातन !! वाळवंटातच असलेले हे मंदीर ! तेंव्हा चंद्रभागेला केंव्हाही पूर आला की शिखरासह ते त्या पुरात बुडले जावे अशी त्याची अवस्था ! ते असे कित्येकदा पुरात डुबले ! चंद्रभागेच्या पुरात पंढरपुरातले कैक वाडे रसातळाला गेले पण हे वाळुतले मंदीर आहे मात्र कसे अजून ताठ ! पुरातही या देवळाला धक्का बसू नये हा भाविकांच्या दृष्टीने चमत्कार ! तर शास्त्रीय दृष्टया या शिल्पाच्या मजबूतीची प्रशंसा करण्यासारखीच गोष्ट !

"भीमा" ला इथे वारंवार पूर येतो. यातल्या काही पुरांनी तर पंढरपुरातील मजबूत वाड्यांना लाटेसरशी उडवून दिलेले. परंतु पुंडलिक मंदिराच्या अंगी केवढी मोठी ताकद ! स्वतःचा तोल सोडून थैमान

घालणाऱ्या चंद्रभागेला या मंदीराच्या बाहूंनी कैकदा जागच्या जागी थोपवून चकित केले आहे. पावसाळ्यांत चंद्रभागा तुडुंब भरते. मग फक्त याच कलायुक्त मंदिराच्या कळसाचा भाग पाण्यावर तरंगताना दिसतो. ते दृष्य मनोहारी वाटते.

अहिल्याबाई होळकर घाट व महाद्वार घाट यांच्या मध्येच पुंडलिक मंदिराने आपले जे स्थान निवडले आहे ती जागाच निसर्गतः सुंदर आहे. मध्ये उंच कळसाचे पुंडलीक मंदीर आणि आजु-बाजूला सर्वसंत अळनेकर महाराज, चोपडकर महाराज, देहुकर महाराज, लक्ष्मण महाराज, कृष्णाजी महाराज, भानुदास महाराज अशा थोर संतांच्या लहान मोठ्या समाध्या! या मंदीरात शंकर पिंडी आहे. त्यावर आकर्षक पुण्डलीकाचा मुखवटा आहे. पंढरपुरातील सर्वच संतांचे मुखवटे सारखे! नामदेव पहा, तुकाराम पहा, पुंडलिक पहा किंवा ज्ञानेश्वर पहा, सर्वच मुखवट्यांच्या मिशा एक जात एक सारख्या. फरक दिसतो तो फक्त मुखवट्याच्या लांबी रुंदीत, त्यामुळे देवस्थानात संताचे व्यक्तिदर्शन व्हावे तसे होत नाही.

पुंडलीकाच्या समोरच एक कुंड आहे. त्यास 'लोहदंड तीर्थ', म्हणतात. असे सांगतात की याच कुंडातून पांडुरंग बाहेर आले आणि ते ज्या होडीतून आले ती होडीही त्या कुंडाबाहेर दाखविण्यात येते. ही होडी आहे लांबीला एक फूट आणि उंचीला दोन इंच. ती आहे दगडाची. खर पहाता पाण्यावर तरंगते लाकूड. दगड तरंगणे कधी शक्य का आहे? पण ही दगडाची होडी पाण्या-वर तरंगते! आणि हेच तर आश्चर्य!!

या होडीतून म्हणे पांडुरंग आला. सांगणारे सांगतात आणि भाविक ऐकतात. होडी तर लहान आणि पांडुरंग तर केवढा मोठा ! एवढा मोठा पांडुरंग इवल्याशा होडीत उभा कसा हो राहिला? असा जर तेथल्या लोकांना प्रश्न केलात तर ते त्यावर चूप बसणार नाहीत. ते म्हणतील ‘ तुमचे डोके केवढे छोटे, पण त्यावर एवढे केस हो कसे ? करा हात पुढे ! ’ आपण त्यांच्या उत्तराने कौतुकाने हात पुढे करतो तोंच पुजारी आपल्या हातांत लोहदंडातील तीर्थ टाकतो. आणि ते तीर्थ प्राशन केले की दक्षिणेचा दंड आपल्याला आपोआपच भरावा लागतो.

प्रश्न दुसरा असा की, पुंडलिक जर याच जागी पित्याची सेवा करीत होता आणि त्यानी तेथेच वीट फेकली व त्यावर पांडुरंग अद्याप उभा आहे तर हे स्थान पुंडलिक मंदिराच्या आसपासच कुठे तरी असावयास हवे होते. पण ते तर आहे पुंडलिक मंदिरापासून केवढे दूर ! मग हे असे कसे ?

पण यावर इथले दैवत राखणदार उत्तर देताना म्हणतात, भाऊसाहेब आम्ही सांगतो तेच खरे आहे. “ पुंडलीकाने वीट फेकली ती तेथेच आहे. आणि त्यांवर उभा आहे तो विठ्ठलही तोच आहे आणि बरं का पुंडलिकाने वीट फेकली तीही तेथूनच !


“ अहो पण इतकी दूर कशी फेकली ? ” आपण आश्चर्याने विचाराल. त्यावर तो आपणाला एकदम प्रश्न करील, ‘भाऊसाहेब आपण कुठले ?’ आपण म्हणाल ‘मुंबईचे !’

त्यावर तो म्हणेल, "अहो पुंडलिकाच्या काळात आपण असता तर इथून मुंबईलासुद्धा वीट फेकली असती. अहो तो काळच वेगळा ! भाऊसाहेब विचार कसला करता ? करा हात पुढे !"

बोला ! काय बोलणार ? आहे यांवर उत्तर? मंडळी, पांडुरंगाचे पंढरपूर हे असे आहे. जितके आकर्षक; तितकेच अनेक कारणास्तव आठवणीत रहाणारे !

# ● संत दामाजी

५००३८
४०७
२८/४/८६



मंगळवेढें येथील संत दामाजी मंदीर आणि तेथली समाधि

## ५

महाराष्ट्रभूमी म्हणजे सौंदर्य आणि औदार्याची खाण ! तशीच एक मांगल्यमय नगरी ! मंगलतेचे व उदारवृत्तीचे झरे येथे सदोदित वहात रहाणारे ! मंगळवेढे हे इथले असे एक खेडे की जिथल्या एका संताचे नाव मुखी येताच औदार्याचा मूर्तिमंत आदर्श नजरेसमोर उभा रहावा.

### ● चिंतेत पडलेला पांडुरंग

सुमारे पाचशे वर्षापूर्वीची गोष्ट ! काळाची कठोर दृष्टी या भागाकडे वळली व त्यांनी आपल्या दुष्काळी सोंगट्या नेमक्या सोलापूरच्या सारीपटावर मांडल्या. जीवहत्तेचा तो जुगारी खेळ रंगांत यावा म्हणून की काय, मृत्यूने आपले फासे यमाच्या निष्ठूर घशात घोळून टाकण्यास प्रारंभ केला. सर्व प्राणी पाण्याविना मूर्च्छित पडू लागले ! नद्या कोरड्या झाल्या ! जीव-जीवात्मे तडफडू लागले ! चोहोकडे हाहाःकार माजला !

पंढरपूर हे केवढे प्रसिद्ध तीर्थाचे ठिकाण ! पण तिथलेही तीर्थ आटले ! काळाच्या छायेत चंद्रभागा तर काळी ठिक्कर पडलीच ! धनधान्य संपले ! आश्रयाचे आश्रय तुटले ! जल धुंडणारांचे डोळे निराश झाले ! अन्नाविना देह धरणीवर कोसळू लागले ! आत्म्याची सर्वत्रच पळापळ सुरू झाली. सारा सोलापूर जिल्हा दुष्काळाने पूर्ण ग्रासला गेला. फक्त सुरक्षित राहिले होते काय ते मंगळवेढे ! म्हणूनच साऱ्यांची धाव होती ती मंगळवेढ्याकडेच ! लोक येत होते.

मंगळवेढे त्यांच्या रक्षणाची शिकस्त करीत होते! काळाच्या जळजळीत तापाने जळून खाक होणाऱ्या जिवात्म्यांना त्या दुष्काळाच्या काळात त्यावेळी आधार होता फक्त मंगळवेढ्याचाच! आणि अल्प काळांत तोही तुटला! काळाने मंगळवेढ्यावरही झडप घातली. त्याचीही हिम्मत हरली. तेही काळाला शरण गेले.

विजयाच्या मदाने गर्विष्ठ झालेला काळ विकट हास्य करून खदखदा हंसत होता आणि सोलापुरच्या सोळा खेड्यातील खेडुतांना पुढे सरकण्यास आव्हान करीत होता. ते आव्हान कोण स्वीकारणार? हे खुद्द पांडुरंगालाही कळेना! पांडुरंगालाही काळाने पेचात टाकले. परंतु मंगळवेढ्यातील एका व्यक्तीने अचानक ते आव्हान स्वीकारले. त्या शक्तिशाली व्यक्तीचे नाव संत दामाजी.

### ● मंगळवेढे म्हणजे संत नगरीच

उदार अंतःकरणाचा असा हा महान संत दामाजी ज्या मंगळवेढयात जन्मला, ते खेडे अनेक दृष्टीने इतिहासात धन्य झाले. धान्यात ज्वारी बाजरीचे पीक पहावे ते मंगळवेढयातलेंच. इथला ज्वारीचा टप्पोरा दाणा म्हणजे तकाकते मोतीच! हे मोती हंगामात जेव्हा पंढरपूरच्या बाजारात येतात, तेव्हा त्यांना तोलणारा काटा सामान्य वजन स्वीकारूच शकत नाही. संतसेवेत तेराव्या शतकापासून मंगळवेढयाची नोंद पंढरपूरच्या विठ्ठलानें आपल्या नोंदवहीत सुवर्णाक्षरांनें लिहून ठेवण्यास सुरवात केली, त्यात संत चोखोबाला तेराव्या शतकाचे पृष्ठ लिहावे लागले ते संत कान्होपात्रामुळे. पंधराव्या शतकात संत दामाजीचे कार्य पाहून तर विठ्ठलाच्या नयनांतून प्रेमाश्रूंचा पूरच वाहू लागला.

मध्यंतरीच्या काळामध्यें मंगळवेढयाने विश्रांती घेतली पण पुढे एकाएकी एका वृक्ष ढोलीतून एक अद्भुत व्यक्ति अचानक बाहेर पडली. ती म्हणजे वैष्णव भक्तीचे महान टीकाचार्य श्री स्वामी समर्थ अक्कलकोट महाराज. संत मोहिनीबुवा, संत सीतारामबुवा, गोविंद-बुवा या सर्व मंगळवेढयाच्या कसदार ज्वारीवरच वाढलेल्या श्रेष्ठ व्यक्ति. सोलापूरने जन्म दिलेल्या सोळा भूपुत्रांत सर्वश्रेष्ठ संतपुत्र म्हणजे मंगळवेढे ! हा पंढरपूरचा धाकटा बन्धू ! त्याचा संसार आहे पंढर-पूरापासून चौदा मैलावर ! मंगळवेढ्याचे सर्वात मोठे ऐश्वर्य म्हणजे संत दामाजीची समाधि ! समाधीच्या जागी असलेले मंदीर हे इथे येणाऱ्या भाविकाचे आदरणीय स्थळ !

**● उत्सव व यात्रा**

जे पंढरपूरला येतात ते मंगळवेढ्याला वळतातच ! हा भाग तळपतो तो यात्रा आणि उत्सव प्रसंगी. एरव्ही इथ कस सार शांत ....शांत ! ना गोंगाट, ना धडपड ! जणू चोविस तास आकाश ढगाळलेले ! श्रावणात इथल्या उत्साही वातावरणास चालना मिळते ती गोकुळ अष्टमीच्या उत्सवाला. सामुदायिक भोजनाचा हा दिन असंख्य वारकरी एकत्र येऊन विशिष्ट जोमाने पार पाडतात ! श्रावणात मंगळ-वेढ्यात आलेले वारकरी भाद्रपदातहि तेथे जमतात ते ज्ञानेश्वरींच्या सामुदाईक पठणात नव्या ज्ञानात भर घालण्यासाठी. आश्विन महिन्यातला दसरा सोहळा हा असाच इथला एक आगळा उत्सव ! तेव्हां इथे महापूजा होते. पौर्णिमेपासून महिनाभर इथे घरोघरी दीप उजळतात. सायंकाळी प्रत्येकाच्या दारात नियमाने एक तरी पणती लागते. आणि मार्गशीर्षात साजरी होते गीता जयंती.

संत दामाजींच्या मंदिराभोवती अधिक उत्साहाचे वातावरण असते ते पौष महिन्यांत. तेव्हां असते यात्रा! ही यात्रा म्हणजे मंगळवेढ्यातील गुणावगुणाची पारख करणारी वार्षिक स्पर्धाच!! या स्पर्धेत पहिला मान मिळतो गुरांना! पाणीदार डोळ्याची आणि डौलदार चालीची कित्येक गुरें आपली मस्त शिंगें उडवित जेव्हा इथल्या प्रदर्शनात मानाचे पान हस्तगत करण्याकरता दिमाखाने प्रवेश करतात तेव्हाची त्यांची ती ऐट काय वर्णावी!

दुसरा सन्मान होतो तो बलशाली मल्लाचा! कुस्त्यांच्या फडातील विजयी वीरांना खांद्यावर चढवून मानाने नाचविले जाते. जे फड जिंकतात, त्यांच्या हाती बक्षिसाचे श्रीफळ पडते. पैसेही मिळतात. मग जागोजागी तुणतुणीं गुणगुणू लागतात आणि डफाच्या थापेवर शाहीरांचा पटका मोठ्या दिमाखाने डोलू लागतो. विरश्रीच्या वीर सुराने मंगळवेढा दणाणून जातो. संत दामाजींच्या मंदिरांत दर महिन्याला कांहींना कांहीं कार्यक्रम हा होतोच, परंतु ही जत्रा म्हणजे ह्या कार्यक्रमातला तळपता हिरक कळसच होय!

## ● जुनी शिल्पकलाकृती

मंगळवेढ्याचे मांगल्य अनेक दृष्टीने महत्त्वाचे! हे खेडे जुने पण टुमदार आहे. इथली छोटी छोटी बिनछपरांची, दोन दोन खोल्यांची विशिष्ट पद्धतीने बांधलेली घरे म्हणजे जुन्या मराठमोळ्या हाणीचे एक अपूर्व चित्रच!

हे खेडे लहानसे परंतु त्याचे स्वरूप आहे तालुक्यासारखे. हा तालुका पूर्वी सांगली संस्थानात समाविष्ट झालेला, परंतु सन १९४८ साली तो सोलापुरातील वेगळा तालुका बनला. तालुक्यामुळे इथे छोट्या

कचेऱ्या आहेत, न्यायालय आहे, शिक्षण देणारी शाळा आहे आणि लोकगृतीचा इषारा देणारे एक सुव्यवस्थित वाचनालयही आहे.

इथली जमीन मोठी सुपीक ! तशीच गर्भश्रीमंत. पूर्वी इथे असंख्य राजवाडे असावेत व तदनंतर गाडले गेले असावेत. कारण खणावें तेथे जुन्या शिल्पाचे धन सांपडते ! गांवात तुम्ही फिरकलात आणि येथील जुन्या पडक्या किल्ल्याच्या बाजूला वळलात, तर तुम्हाला जागोजागी अवशेष पहावयास मिळतील. कधी नजरेत न भरणाऱ्या जुन्या शिल्पाबद्दल सामान्य माणसांना फारच मोठे कुतुहल वाटते. परंतु रोजच्या रोज हे शिल्प सतत नजरेसमोर राहिल्याने मंगळवेढे-करांना त्यांची मुळी किंमतच झाली नसते. येथे पाय ठेवावा तेथे जुने शिल्प !

सरकारी कचेरीत झेंडा उभारण्याची एक जागा आहे. त्या जागेचे बांधकाम करतांना तेथल्या कल्पक लोकांनी या जुन्या अवशेषांचा उत्तम उपयोग केला आहे. झेंड्याच्या स्तंभाजवळ एक जुन्या शिल्पकलाकृतीतला मुखवटा बसवण्यात आला आहे. तो पाहतांना स्वराज्यासाठी रक्त सांडणाऱ्या हुतात्म्यांची कुणालाही आठवण व्हावी.

### ● जुना इतिहास आणि संत दामाजी

हा भाग १४५८ साली म्हणजे बरोबर पाचशे वर्षापूर्वी बेदर बादशहाच्या अंमलाखाली होता. त्यापूर्वी येथे यादवांची राजवट होती. यादवकाळात हेमाडपंताने येथे असंख्य देवालये उभारली. येथे जे दोन महाभयंकर दुष्काळ पडले ते सन १४५८ ते १४६० या साली बेदर बादशहाच्या कारकिर्दीतच. त्यावेळी या तालुक्याचे तहशीलदार

म्हणजेच मामलेदार दामाजीपंत होते. पंत हे पक्के वारकरी पंथाचे आणि विठ्ठलाचे महान् भक्त ! त्यांच्या अंगचा मोठा गुण म्हणजे दयाशील वृत्ती आणि उदारता ! मंगळवेढ्यांत ज्वारीचे पीक फार त्यामुळें साऱ्याच्या रूपाने जमणारी ज्वारी पंत सरकारी पेढ्यात म्हणजे कोठारात धान्य रूपाने जमा होणारा सारा म्हणून जमा करीत. संचीत धान्याच्या अशा अनेक कोठ्या इथे असत. त्यांना पेढ्याही म्हणत. या पेढ्यात खंडोगणती ज्वारी शिल्लक असे.

पंताचा दयाळू स्वभाव सर्वांना संपूर्ण ठाऊक ! तेव्हा कुणाचे काम अडलें तर तो धांवत दामाजीपंताच्या दारीं येई. ते त्याला भरल्या मुठीने धान्य देत. उपाशी पोटांना पंतांच्या घरात सदा आश्रय मिळे.

सुमारे चारशे अठ्याण्णव वर्षांपूर्वी दुष्काळाची दुष्ट छाया या इथल्या भागांवर जेव्हा पडली त्यावेळी पंतांनी आपल्या घराला धर्मशाळेचे स्वरूप दिले होते आणि बायकामुलांचे दागदागिनेही विकून जितक्या लोकांना पोसता येईल तितक्या लोकांना प्रामाणिकपणे पोसले होते. असा पण एक प्रसंग आला की, मध्यान्हीच्या सुमारास एक भिक्षुक पंताच्या वाड्यात शिरून दीन मुद्रेने अन्नाची याचना करू लागला. पंत जेवत होते पण ते भरल्या ताटावरून उठले आणि त्यांनी ताटातील सर्व अन्न दुष्काळ पीडीताच्या स्वाधीन केले. पण तो ते अन्न खाईना. मग पंतांना कळले की त्याची काही कच्ची बच्ची भूकबळी बनली होती आणि शिल्लक असलेल्यांच्या रक्षणार्थ त्याची अधिक अन्नासाठी याचना होती. पंतापुढे मोठाच पेच पडला. काय करावे. काही सुचेना. त्यांच्या डोळ्यांतून गंगा यमुना अवतरल्या ! बादशहाच्या कोठारात खच्चून धान्य होते. पण त्याला हात लावणे हा अप्रामाणिक-

पणा होता. परवानगी मागावी तर ती गोष्ट अशक्यच होती. कर्तव्यासाठी अप्रामाणिक बनणे म्हणजे प्राणाशी गाठ "स्वप्राणाचे रक्षण की स्वजनांचे रक्षण ?" हाच पंतांच्या पुढला महत्त्वाचा पेच प्रसंग ! सरकारी कोठार खुलें करून पंतानी डोक्यातील प्रश्नचिन्हाला हवेत भिरकावून दिले. त्या याचकाला ते सरकारी धान्य कोठार खुले करून दिले. त्याला एक पोतभर धान्य मिळताच तो संतुष्ट पंढरपूरास परतला.

## ● विठू महाराचा अवतार

जिथे धान्याचा बारीकसा कण मिळणे कठीण, तेथे एक गृहस्थाच्या पाठीवर धान्याचे पोते ! पंढरपूरचे लोक ते दृष्य पाहून चकीत व्हावेत हे सहाजिकच ! मग लोकांना कळले की धान्याच्या पोत्याची ही देणगी आहे मंगळवेढ्यातील दामाजीपंतांची ! झाले ! ! जो तो धावू लागला मंगळवेढ्याकडे ! दामाजीने सभोवार पाहिले तो ही गर्दी ! पाठीला पोट मिळालेली अशी ती सारीच जनता ! दामाजीला त्यांची हालत पहावेना. त्यांच्या डोळ्यात उभे राहिले पाणी आणि मग विचारात वेळ न घालविता त्यांनी ते सारेच्या सारे कोठार त्या दुष्काळ पिडीतांना खुले केले. हे सारे त्यानी केले ते स्वतःच्या मानेवर सुरी ठेवून !

दामाजीच्या या उदारतेमुळे संकटग्रस्त मंडळी वाचली खरी परंतु कोठार लुटीच्या या आरोपाचा जाब विचारण्यासाठी पंतांना बादशहाकडून बोलावणे आले. बेदर बादशहाची राजधानी मंगळवेढ्यापासून साठ मैलांवर ! हे साठ मैलांचे अंतर तोडले की पंतांच्या गळ्यात पडणार होता फास हे ठरलेलेच ! बाहेर निमंत्रण घेऊन

आलेले शिपाई होते व आत पंत अंगावर उपरणे चढवित होते. इतक्यात त्यांच्या मनांत विचार आला. ते तसेच बाहेर आले आणि म्हणाले. " बादशहाच्या दरबारात हजर होण्यापूर्वी मला एकदा पंढरपूरच्या पांडुरंगाचे दर्शन घडावे अशी इच्छा आहे." शिपायांनी ते मान्य केले. पंत विठ्ठल मंदिरात आले. त्यांनी फक्त पांचच मिनिटे पांडुरंगाची करूणा भाकली.

पंतांचा मृत्यू हा ठरलेलाच होता! त्याला कुठलाच पर्याय नव्हता! परंतु चांगल्या कृत्याबद्दल होणारी ही शिक्षा पंतांना मान्य होती. आपली इहलोकाची यात्रा संपली याच विचाराने ते बादशहापुढे उभे राहिले आणि काय आश्चर्य! बादशहाने त्यांना संपूर्ण मुक्त केल्याचा हुकूम फर्माविला. पंत बघतच राहिले. मग त्यांना कळले की कुणी 'विठू महार' नावाचा एक गृहस्थ त्यांच्या पूर्वीच बादशहाच्या पुढ्यात हजर झाला होता आणि त्यानी सरकारी गोदामातील त्या धान्याची सारीच्या सारी किंमत भरून पोच पावती देखील घेतली होती. नंतर बादशहाने पंताचा शिक्षे-ऐवजी सत्कार केला.

या चमत्कारात दामाजीच्या रक्षणार्थ प्रत्यक्ष पांडुरंगाने विठू महाराचे रूप घेतले अशी श्रद्धा आहे. पण कुणी सांगावे, दामाजी–पंतांची ती उदारता पाहून त्या काळातल्या कुणा 'महारा' ने वा एखाद्या 'श्रीमंता' ने आपले नाव कळू न देता 'विठू' या नावाने ती रक्कम भरणे शक्य आहे. दामाजींची सुटका होताच त्यांनी आपला पुढला काळ अभंग रचण्यात विठ्ठल चरणी खर्ची केला. अशा या दामाजींची वैशाख शुद्ध त्रयोदशी पासून पौर्णिमेपर्यंत इथे पुण्यतिथी साजरी होते.

## ● जाण्याचा मार्ग-पहाण्याजोगी स्थळे

पंढरपुराहून मंगळवेढ्यास एस. टी. जाते. बस जेथे थांबेत तेथूनच दामाजी मंदिराचा कळस नजरेस पडतो. मंदीर साधे आहे. सुमारे सत्तर वर्षांपूर्वी ते बांधले आणि नुकतेच छपन्न साली त्यांवर सध्याचे शिखर उभारण्यांत आले. शिखरावरचा कळस आहे चार तोळ्यांचा परंतु त्याची तकाकी आहे पंचविस तोळ्यांइतकी ! तो ह. भ. प. सोनोपंत दांडेकर यांच्या पवित्र हस्ते बसविण्यात आला आहे.

मंदिराच्या गाभाऱ्यात पूर्वी अंधार. होता सध्या दक्षिणेकडे खिडकी आहे. आत विठ्ठल रखुमाई व दामाजीची छोटीच मूर्ति आहे. त्यापुढे अखंड नंदादीप तेवत असतो.

सभा मंडप साधा असून त्याच्या वरच्या अंगाला येथल्या जुन्या दृष्टयाची काही मौलिक छायाचित्रे आहेत. बाहेरच्या अंगाला ओवऱ्या आहेत. 'गंगा–जमुना' नामक जी दोन कोठारे संत दामाजी यांनी याचकांना खुली करून दिली त्या स्थळाची जागा मंदिराच्या दाक्षिस बाजूस आहे. मंदीराच्या समोरच एक विहीर आहे. असे सांगतात की सन १९१८ साली मंगळवेढयांत दुष्काळ पडला. गावातल्या सर्व विहिरी कोरड्या पडल्या. त्या अधिक खणूनही त्याला पाणी लागेना. अखेर लोकांनी निराश होऊन संत दामाजीच्या आवारात नवी विहीर खणण्यास घेतली. पण त्यासही पाणी लागण्याची चिन्हे दिसेनात. तेव्हा अखेरचा यत्न म्हणून "दामाजी की जय" म्हणत पहारा मारताच तेथे चटकन् पाणी लागले. म्हणूनच या विहिरीला दामाजी विहिर असे नाव आहे.

### • शिवबांची भेट

संत दामाजींच्या आत्म्याचा या स्थळाला पूर्ण आशीर्वाद आहे. म्हणून हे समाधीस्थान जागृत स्थळ म्हणावे लागेल. कारण कुणा भक्तांनी आत्मतल्लीनतेनें नाम सप्ताहाचें व्रत या ठिकाणी स्वीकारले तर त्याला इच्छित फळ निश्चित लाभते हा इथला अनुभव; आणि पुराव्या- दाखल त्या त्या घराण्यांची सालवार नोंदहि आहे.

### • दामाजी विहीर

मंगळवेढ्यात वरचेवर दुष्काळ पडतो. तेव्हा पेरणीला पाऊस पडला नाही तर संत दामाजींची पालखी वेशीवर आणून नामसप्ताह सुरू केला की पाऊस पडतोच पडतो हा इथला अनुभविक चमत्कार ! या पालखीचे अशा अनेक कारणास्तव महत्त्व ! आषाढी यात्रेला ही पालखी वाजत गर्जत पंढरपूरला मोठ्या सन्मानाने आणली जाते.

शिवछत्रपति महाराजांच्या मनात संत दामाजीबद्दल नितांत आदर होता. औरंगजेबानें मराठ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सुमारें तीनशें त्र्याण्णव वर्षांपूर्वी राजा जयसिंग व दिलेरखान यांना दक्षिणेकडे पाठविले होते. त्यावेळी संपूर्ण विजापूर काबीज करावा असा त्यांच डाव परंतु ते शक्य झाले नाहीं. तेव्हा शिवबाशी वाटाघाटी करण्यासाठी निवांत स्थळ म्हणून याच मंगळवेढ्याची निवड केली होती. छत्रपती- बरोबर ही बोलणी जुन्या मंगळवेढ्याच्या किल्ल्यात झाली. परंतु ती करण्यापूर्वी शिवछत्रपति शिवाजी महाराजानी राजा जयसिंहसह या समाधीचे मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेतले. डिसेंबर १८ सन १६६५ ही या प्रसंगाची बखरतील तारीख !

यादव काळात हेमाडपंथीय कलेने मढलेले, पुढे संत दामाजींच्या औदार्याचे प्रतिक ठरलेले आणि नंतर श्री शिवबांच्या श्रद्धायुक्त पाव-

लानी पावन झालेले हे श्रद्धास्थळ म्हणजे महाराष्ट्राच्या पुण्याईचे एक अद्भूत कोठारच !

नामदेवाची गुणवता मोठी ! उदारता केवढी तरी ! महाराष्ट्राच्या मातीत अनेक उदार थोर दानशूर जन्माला आले पण नामदेव हे उदार वृत्तीचे एकमेव आणि आदर्श असे उदाहरण. उदार वृत्तीतली उदारता केव्हा आणि कुठे उदय पावते आणि ती कशासाठी कशा प्रकारे उपयोगात आणली तर तारक ठरते; हे दाखवून देण्यासाठीच पंढरीनाथाने दामाजीला जन्माला घातले की काय, हे न कळे ! इतके मात्र खरे की महाराष्ट्रातल्या संत परंपरेतला हा संत अगदी वेगळा आणि आगळा असा —

मानवी धर्माचा विकास व विचार वाढीस लागतो वा विकसीत पावतो तो देण्याघेण्याच्या वृत्तीने. पण हवे असणाराला आपल्याला हवे असणारे देणे हे दानातले थोर कार्य ! आणि प्रसंगी हवे असणाराला जे हवेच आहे ते आपले नसले तरी आवश्यक आहे म्हणून मिळवून देणं हे तर दानातले अद्भूत कार्य !

संत दामाजीने अद्भूत दानाचे जे अपूर्व दर्शन आपल्या जीवनातून प्रगट केले त्याची थोरवी थोर ती यास्तवच !

देशाला, समाजाला, संस्कृतीला कुठल्या दानाची कशी आवश्यकता पडते व त्यावेळी कायद्याच्या बंदीस्त कायद्याला दूर सारून मानवी मनाच्या जीव–रक्षणार्थ जीवावर उदार होऊन कोणत्या प्रकारची झेप घ्यावी लागते, ह्याचे उत्कृष्ट उदाहरण नामदेवाच्या कथेतून प्रत्ययास येते.

● ●

# संत नामदेव



संत नामदेवाचे एक अनमोल चित्र

# ६

सुमारे सहाशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रात एक महान महात्मा जन्माला आला आणि जन्मताच परमात्मा बनला ! नद्या नाले आनंदले ! नभोमंडळ प्रफुल्लीत झाले ! वायु सद्गदित झाला ! लता वृक्ष बहरले ! पशु-पक्षी भेद विसरले ! निसर्ग थय थय नाचू लागला !

प्रत्यक्ष भूवैकुंठ भूलोकांवर अवतीर्ण झालेले वर्तमान ऐकून पृथ्वी प्रत्यक्षात हर्षोन्मोदाने थरथरली ! आणि अशा वेळी चिंतनात गढून गेलेल्या परमेश्वराने डोळे उघडून नारदाला म्हटले, 'नारदा, कारे पृथ्वी आज अशी तालात नाचण्याचे विशेष कारण काय ?

नारदाने वीणेवरून बोटे फिरवित म्हटले, "देवा, पृथ्वी पोटी आज जन्मलेला प्राणी, हा आपलाच अंश आहे हे साऱ्यांनी या समयी ताडले आहे. का उगाच नामानिराळे रहाता ! " परमेश्वराने स्मित केले व ते पुन्हा चिंतनात मग्न झाले ! मग नारायणाचा ध्वनी घुमवित नारद भूलोकांवर आले. ते आले ते त्या आत्म्याजवळच. त्यांनी त्यास पुष्पहार घातला व ते परतू लागले. ते माघारी जात आहेत हे पाहून तो जीवात्मा म्हणाला, 'मुनीवर्य मला इथं सोडून आपण कुठे निघालात ?'

नारद म्हणाले, "मी चाललो आहे आता माझ्या पुढल्या कार्याला ! "

तेव्हा त्या जीवात्म्याने पुन्हा प्रश्न केला " आणि मी ? "—

नारदाने त्यावेळी आपल्या गळ्यातील वीणा काढून त्या जीवात्म्याच्या स्वाधीन केली आणि ते म्हणाले, 'नाम्या, आता तुझे कार्य इथूनच सुरू! भागवत धर्माच्या उद्धाराकरताच तर तुझा जन्म आहे.'

नारद ज्या जीवात्म्याशी बोलत होते त्या देहाचेच नाव नामदेव होय!

## ● नामदेव, ज्ञानदेव यांचे महान कार्य

महाराष्ट्रातील धार्मिक, सामाजिक आणि राजकारणी चळवळी-तील अनेक चमत्कारातली ही एक अशीच चमत्कारिक घटना आहे की महाराष्ट्राच्या एका महान संकटसमयी या भूमीवर नामदेव-ज्ञानदेवासारखे श्रेष्ठ संत एकाच वेळी जोडीने जन्मास आले!

नामदेव-ज्ञानदेव उदयास येण्यापूर्वी महाराष्ट्राची स्थिती दारुण! एकीकडे शत्रूने देशाला पुरे ग्रासलेले व दुसरीकडे स्वजन स्वतःलाच स्वतःच्या पायाखाली तुडवीत होते. जातीभेद, मत्सर, अज्ञान, अशि-क्षितपणा या रोगजंतूंनी तर त्यावेळी ही भूमी पुरी रोगिष्ट बनली होती. उल्हास, उत्साह व उत्तेजन देणारे दैवत तर कुठे तरी जांभया देत, आळस झाडीत बसले होते. एकीकडे उत्तरेकडील यौवनांनी महाराष्ट्राच्या मानेवर सुरी ठेवली होती, तर दुसरीकडे महाराष्ट्र संस्कृतीचा जीव क्षणाक्षणाला कासाविस होत राहिल्याने राष्ट्राची प्राणज्योत क्षणांत मालवते की काय याचे भय होते. अल्लाउद्दिन खिलजी, मलिक कपूर, महमद तघलक यांच्या हल्ल्यांनी देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य खिळ-खिळे करून टाकले होते. विजापुरात हरिहर बुक हे कानडी बंधू एकीकडे हिंदू राज्य रक्षणार्थ तलवारी उपसत होते व दुसरीकडे बहामनी राज्यकर्ते त्या तोडीत होते.

अशा या अवघड परिस्थितीत महाराष्ट्रात अज्ञानाचा चोहीकडे अंधःकार पसरत असल्यास नवल ते कोणते ? आणि बहुजन समाज अशावेळी कासाविस होऊन कसातरी चाचपडत जीवन मार्ग आक्रमित असल्यास आश्चर्य ते कोणते ?

प्रत्येक गोरगरीब दुःखाने पिडला होता. कुणाचे हाल कुणीच खुशीत नव्हता. ज्ञानी होते ते सावकार बनले होते व व्यवहारास लागणारे ज्ञान तिप्पट व्याजाने बहुजन समाजाला तोलून मापून विकत होते. ज्ञानीजनांचे सर्व व्यवहार संस्कृतमध्ये पडलेले; तेव्हा खरा खोटा हिशेब असंस्कृत बहुजन समाजाला कळायचा तरी कुठून ? जेथे कळणेच कठीण, तेथे ते ज्ञानी सावकार म्हणतील तेंच खरें प्रमाण होते. ही परिस्थिती देशाला दिवसेंदिवस अधोगतीच्या दरीत ढकलीत होती.

या परिस्थितीवर प्रथम प्रहार केला तो ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून. ज्ञानाचे सोपे कोष्टक त्यांनी ओव्यांच्या रूपाने ज्ञानेश्वरीत लिहिले आणि संस्कृत भाषेमुळे मर्यादित लोकांचा मक्ता होऊन बसलेले बंदीस्त धर्मग्रंथाचे भांडार सर्वांना मनमोकळेपणाने लुटण्यास खुले करून दिले. नामदेवाने आणखी पुढे पाऊल टाकले आणि अभंग-वाणीच्या अमृत सिंचनाने मृतवत स्थितीत असलेल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीत त्यांनी जिवंतपणा आणला.

देशातील दुःख-दारिद्र्य दूर करण्यासाठी नामदेव-ज्ञानोबा हातात हात घालून खेडोपाडी हिंडले. दुःखात सुलभतेने सुख निर्माण करणाऱ्या भक्तिपंथाचा पंथ त्यांनी या दुःखपीडीत जनतेला तन्मयतेने दर्शविला.

ज्ञानेश्वरांनी वयाच्या एकवीसाव्या वर्षी आत्म्याच्या आदेशाला होकार दिला आणि अंतरीच्या आज्ञेप्रमाणे ते समाधिष्ठ झाले.

ज्ञानदेवांनी ती पेटविलेली ज्ञानज्योत तदनंतर नामदेवाने वयाच्या ऐंशी वर्षांपर्यंत अखंड तेवत ठेवली व ती आता कदापि बुझणे शक्य नाही अशी पूरती खात्री करूनच मग त्यांनी आपली जीवन ज्योत मालविली.

### ● बाराही महिने उत्सव चालू

नामदेव ही अढळ निष्ठा व दृढ श्रद्धेची मूर्ति ! म्हणूनच पंढरपूरच्या विठ्ठल मंदीरात प्रवेश करावयाचा म्हणजे प्रथम आपले मस्तक नम्र करावे लागते ते त्या मंदिरावरच्या पहिल्या पायरीवर की जिथे नामदेवाचे भक्तिस्थान अढळ आहे.

या समाधिस्थळापासून नामदेव मंदिर फारसे दूर नाही. ते महाद्वार घाटाच्या शेजारच्याच घाटावर आहे. महायात्रेच्या प्रसंगी पंढरपूरास जो यात्रेकरूंचा सागर उसळतो त्यातून गगन चुंबण्याचा प्रयत्न करणाऱ्या वारकरी पंथाच्या हरिनाम गर्जनेच्या लाटा प्रथम धाव घेतात त्या नामदेव मंदिराकडेच. विठ्ठलाचे मुखावलोकन केल्यानंतर टाळ, मृदंग आणि वीणा या त्रिवाद्यांचे हरीनाम गुणगायन तर या मंदिरात अहोरात्र चालू असते. सर्वच सणांचे येथे सारख्या दर्जाने स्वागत होते. कीर्तन तर बहुधा बाराही मास होते. भजन मंडळीही आपली सेवा रोज रुजू करतात. आणि अन्नभोजनांचे समारंभही कैक होतात. ठळक दिवशी येथे उत्साही वातावरण असते. चैत्र महिन्यातील केशवराजाच्या महापूजेनिमित्त होणारा वसंतोत्सव, चैत्रातला श्री रामजन्मोत्सव व हनुमान जयंती, वैशाखातला वारकरी

भोजन समारंभ, ज्येष्ठातील बाखरी महाराजांची पुण्यतिथी. आषाढात निघणारी नामदेवरायाची पालखी, गोपाळपूरातला आणि महाद्वारातला काला उत्सव, श्रावणातील नामदेव पुण्यतिथी, श्रीयाळशेट उत्सव, भाद्रपदातील गणेश उत्सव, आश्विन महिन्यातला दीपोत्सव, कार्तिकातला गोपाळकाला, पौष मासातील पंढरीनाथ महाराज नामदास यांची पुण्यतिथी, माघातील शिवरात्र उत्सव आणि फाल्गुनांतील श्री नाथ अष्टमी, अशी असंख्य उत्सवाची नामावळी तर या नामदेव मंदीरच्या भिंतीवर, चारशे ऐंशी दिवस लटकावलेली असते.

## ● नामदेव टेकडीवरील संत संसार

देशोधडीस लागलेल्या देशबांधवांना धार्मिक विचारसरणीने सावरण्याचा यशस्वी प्रयत्न करणारा नामदेव हा पहिला आगळाच संत ! त्यांची जन्मकथा अशी : नामदेवाची माता गोणाबाई व पिता दामशेट यांना मध्य अवस्थेपर्यंत पुत्रसंतान नव्हते, ही जोडी सातारा जिल्ह्यातील कृष्णाकाठीं असलेल्या श्री नरसिंहाच्या मंदीराजवळच्या नरसिंगपूरची. नामदेवाचे मूळ कूळ नरसिंह भक्त परंतु संतानाची आशा तुटल्यावर त्यानी नवस केला पंढरपूरच्या पांडुरंगाला आणि त्या नवसाची पूर्ती करण्यासाठी व त्यांच्या सेवेत त्यातून कुठलीच कमतरता पडू नये म्हणून ते रहाण्यास आले पंढरपूराला ! त्यातून विठ्ठल भक्तीचे जे नामरूपी फळ त्याच्या पदरात पडले, तेच नामदेव होत. नामदेव हे खरे म्हणजे पांडुरंगाचेच पुत्र. म्हणून बालपणापासून त्यांची सारखी धाव विठ्ठल मंदिराकडे. पुढे तर त्यांचा हा ओढा अति वाढला व भजन कीर्तनादीविना पाच वर्षांचा हा ‘ नामा ’ बेचैन होऊ लागला.

नामदेवाचे घर विठ्ठल मंदीरापाठीच! जातीने ते शिंपी. शिलाईवर जे काही मिळेल त्यावर त्यांचे पिता घर चालवित! त्यामुळे नामदेवांचा वाढत जाणारा हा विठ्ठल दर्शनाचा छंद, त्यांच्या माता-पित्यांना कसा रुचावा? आईवडीलाची वारंवार बोलणी कानी पडू लागली तेव्हा नामदेवांची समाधी उतरू लागली. हाती घ्यावयाच्या कार्यात घरातली कटकट ही विघ्ने होत हे त्यांनी बालपणीच ताडले! ह्यातून लवकर मार्ग काढणे जरूर होते. झाले! त्यानी वेगळाच विचार केला व एक आगळा मार्ग शोधला. आपले सवंगडी गोळा केले व त्यांनी चंद्रभागेच्या तटी झोपडे बांधून स्वतःचा स्वतंत्र संसार थाटला.

नामदेव ज्या स्थळी येऊन राहिले ती एक लहानशी टेकडी! परंतु अल्प काळात ती हरिनामाने पावन झाली. पुढे त्याच टेकडीला 'नामदेव टेकडी' नाव पडले. सध्या नामदेव मंदिर आहे तीच ती जुनी नामदेवाची रहाती जागा. नामदेव याच जागी लहानाचे मोठे झाले. जनाबाईसारख्या कुणबिणीला जी संत दिक्षा मिळाली तीही नामदेवांच्या सहवासात याच जागी. वारकरी पंथाची सुरवातीची सर्व सूत्रे हलविली गेली तीसुद्धा याच स्थानी, आणि चोखोबा आदि कैक संतांचे बीज जे पंढरपूरात पेरले गेले त्याची मूळ पेरणी झाली तीही याच स्थळी!

श्री नामदेव हे जनाबाई धरून आपल्या चौदा मंडळींच्या कुटुंबासह सन १३५० मध्ये विठ्ठलाच्या महाद्वारी समाधिस्त झाले. खरे पहाता या समाधींत नामदेवाचे सारेच्या सारे कुटुंबच विलीन व्हायचे परंतु काळाच्या नोंदवहीत काळांनी वेगळीच नोंद केली होती. नामदेवाच्या थोरल्या मुलाचे नाव नारायण. त्याची पत्नी लाडाई ही होती गरोदर. ती प्रसूत होण्यासाठी माहेरी गेलेली म्हणून ती राहिली

मागे. तिला जो पुत्र झाला त्याचे नाव मुकुंद. या मुकुंदानेच नामदेवांचा वंश जिवंत ठेवला. नामदेवावरून या वंशाला 'नामदास' नाव पडले. नामदेवरावांच्या वंशातले पंधरावे पुरुष मी जे सन १९५८ साली प्रत्यक्ष पाहिले ते या मंदिराची त्यावेळी पूजाअर्चा करणारे पुजारी म्हणून ह. भ. प. नामदेवबुवा नामदास हे त्यांचे नाव.

### ● एक महान कार्य

मध्यंतरीच्या काळात या नामदेव स्मारक स्थानावर अनेक आपत्त्या ओढवल्या. कित्येक वेळा हे स्थान समूळ नष्ट होते की काय अशी भीतिही निर्माण झाली. कारण इतकेच होते की नामदेव वंश हा पुढे पुढे खालावत गेला. वंशाला उपजिविकेचे साधन नसल्यामुळे या स्थळाची ही जागा कर्जापायी कैकदा सावकारी जबड्यात गेली. परंतु पुण्यात रहात असलेल्या नामदेव शिंपी ज्ञातीतील एका थोर व्यक्तीचे लक्ष या परिस्थितीकडे शके १७०० म्हणजे सन १७७८ मध्ये वेधले. त्या व्यक्तिचे नाव मूळजी तात्या भूतकर. नामदेव घराण्याची बिकट परिस्थिती पाहून त्यांनी हे स्थळ राक्षिण्याची आपल्या ज्ञाती बांधवांना याचना केली. आणि इतर मंडळींनी जमविलेल्या रकमेत स्वतःचे वीस हजार रुपये उदार अंतःकरणाने ओतून तीनशे गाळ्यांच्या धर्मशाळेच्या प्रचंड इमारतीसह सध्यांचे मंदिर उभारले आणि नामदेव वंशातील नामदास बंधु लक्ष्मणबुवा व आबाजीबुवा यांच्या ते हवाली केले.

खरे पहाता हा स्वाधीनतेचा हक्क पुजारीपणाचाच होता. परंतु पुजारीपणाचे रूपांतर पुढे मालकी हक्कांत झाले. कर्जात पुन्हा ही मिळकत गहाण पडली आणि अखेर नामदेव शिंपी समाजाने मोठ्या कष्टाने सन १८७७ मध्ये त्या जागेचा पुनरुपी कब्जा काबीज

केला. स्थळ हाती आले परंतु त्यांच्या सान्निध्यातला अर्धा अधिक टापू कुणी कधी कसा विकला यांचा पत्ताच लागू शकला नाही. या स्थळाच्या वाट्याला आलेले हे दुर्दैव पुढे तसेच त्रास देत राहिले. त्यामुळे या स्थळाला वारंवार तडे जाऊ लागले.

मग १८ जानेवारी सन १८७८ रोजी एक सुवर्णदिन असा उगवला की, त्या दिवशी नामदेव ज्ञातीतर्फे श्री. केशवराज नावाची एक कायमची पक्की संघटना या स्थळ–रक्षणार्थ उभी करण्यात आली. या स्थळाचे तिनेच पुरेपूर रक्षण केले. सध्याच्या मंदिराचा कारभार तिच्याच हाती आहे. नामदेवी शिंपी समाजाच्या जागृत कार्यकर्त्यांच्या तळमळीमुळे हे मंदीर उभे राहिले. महाराष्ट्राच्या उत्तर भागातल्या सीमा रेषांवर वारकरी पंथाचा झेंडा रोवणारा संत महादेव म्हणजे केवढा मोठा क्रांतिकारक संत. नामदेव ज्ञाती आपल्या या कुलपुरुषा-कडे जर लक्षच केंद्रीत न करती तर हें नामदेवाचे मंदीर स्मारक उभे रहातेच ना !

## ● नामदेव मंदीर व अन्य स्थाने

चंद्रभागचे अग्रगण्य घाट म्हणजे महाद्वार घाट ! त्या घाटावरून आपण सरळ विठ्ठल मंदिराकडे जाण्यास निघालो की अल्पशा अंतरावरच एक आडवा रस्ता दृष्टीस पडतो. नामदेव मंदिराचा हा रस्ता अशी तेथे पाटीच आहे. त्या रस्त्यावरून आपण थोडेसे चालून जातो न जातो तोच या मंदिराचे स्थान येते. स्थान समोरच असते. परंतु चटकन् ते लक्षातच येत नाही. कारण मंदिराच्या धर्मशाळेची इमारत बाहेर उभी आहे आणि त्याच्या आत मंदिर आहे. तेव्हा दर्शनी धर्मशाळेवरून मंदिराची कल्पना ही कशी येणार ? श्रद्धास्थान म्हटले की ते थोडेसे स्वतंत्रच असावयाला

हवे. तशात संत नामदेवाचे मंदिर म्हटल्यानंतर मनात केवढी मोठी भव्य कल्पना उभी रहाते. पण धर्मशाळा व आत मंदिर अशी या स्थानाची रचनास्थिती पाहिली की मन खिन्न होते. आंतले मंदिर मात्र स्वछ आणि सुंदर आहे. संगमरवरी दगडाचीच ती बांधणी आहे. मजबूत आणि आकर्षक अशी ही बांधणी बांधली गेली ती सन १९४२–४३ च्या दरम्यान.

संत नामदेव ज्या केशवराज देवाच्या मूर्तीची स्वहस्ते पूजा करीत ती मूर्ति त्यांना विठ्ठल प्रसन्न झाले तेव्हा विठ्ठलांनी दिली अशी आख्यायिका आहे. त्या मूर्तीचे या स्थळी आपणाला दर्शन घडते. बाहेरच्या मुख्य चौकात दुसरे एक छानसे छोटे मंदिर आहे. हे मूळ संत जनाबाईचे मंदिर. परंतु १९३९ साली या मंदिराचा जीर्णोद्धार करताना तेथे एक शुभ्र पाषाणाची नामदेव मूर्ति बसविण्यात आली. आणि तेव्हापासून छोटे नामदेव मंदिर म्हणूनच या मंदिराला भाविक ओळखू लागले.

## ● संत महात्म्य

ज्ञानेश्वरांप्रमाणेच नामदेव एक की अनेक याबद्दल कैकदा वादाची वादळे उठली व चर्चेचा पाला-पाचोळा जनसागरात उडवून शांत झाली. या वादामुळे एक गोष्ट निःसंशय सिद्ध झाली ती हीच की, नामदेवानंतर जी नामदेव परंपरा निर्माण झाली त्यात असे अनेक संत जन्माला आले की त्याचे नाव नामदेव असले तरी ते नावापुरतेच नामदेव नव्हते. त्यानी रचलेल्या ग्रंथातल्या वाक्यपंक्ती या नामदेवाच्या तत्त्वज्ञानातल्याच व त्याच वळणातल्या होत्या. हे साम्य इतके एकरूप झाले होते की संशोधकांना मूळ नामदेवाचा बोध होणे कित्येक काळ अवघड होऊन बसले होते.

ज्ञानेश्वर–नामदेव हे दोघेही समकालीन संत! एक प्रभावी निर्माता, दुसरा प्रभावी प्रचारक! दोघेही युगपुरुष! युगेनुयुगे ज्याचे विस्मरण न व्हावे असे हे महान योगी एका युगात एकत्र अवतरावेत हे महाराष्ट्राचे केवढे थोर भाग्य!

ज्ञानेश्वर हा अवतारी पुरुष जन्मला तो जनतेला भाषा-ज्ञानाचा सोपा धडा देण्यासाठी आणि नामदेव ही महान व्यक्ति अवतरली ती तो धडा शिक्षणरुपाने जनतेकडून गिरवून घेण्यासाठी.

वारकरी पंथाचे मूळ प्रवर्तक जसे नामदेव तसेच सहज सुलभ शिक्षणासाठी कीर्तनाचे माध्यम उपलब्ध करून देणारे महान गुरुही नामदेवच! संत नामदेवाने संकीर्तनाच्या द्वारे महाराष्ट्रातील भक्तिरस-गंगा थेट गुजराथ–पंजाबपर्यंत पोहोचविली. नामदेवाने निर्माण केलेला हा कीर्तन प्रकार नाना प्रकाराने लोकांच्या मनात रुजला व अखेर संत कार्यात महान कार्य करण्या-इतका प्रभावी ठरला. संत नामदेव शिक्षण–द्रष्टे होते. मातृभाषेविना माणसाला शब्दाची माया जाणविणे अशक्य आहे हें त्यांनी त्या काळी जाणले होते. म्हणूनच या आपल्या विचारांना त्यांनी जेव्हा गुजराथच्या दिशेकडे वळविण्याचे ठरविले. तेव्हा सर्व प्रथम तेथली भाषा हस्तगत केली. गुजराथीच्या जोडीला हिंदी शब्दानाही त्यांनी आपलेसे केले व हिंदीतून मध्यभारतात कीर्तने केली. परंतु ते एवढ्या वरच थांबले नाहीत तर पंजाबच्या दौऱ्यावर निघण्यापूर्वी त्यांनी गुरुमुखी ही पंजाबी भाषा मुखात इतकी घोळविली की, संत नाम-देवांनी लिहिलेली पंजाबी भाषेतली काव्यरचनात गुरुनानकाच्या 'नानक साहेब' या प्रसिद्ध ग्रंथाच्या जोडीला 'नामदेवजीकी मुखबानी' नामाने शिखधर्मात विख्यात झाली.


नामदेव हा महाराष्ट्रातला एकच संत असा होऊन गेला की, ज्याची गुजराथ, पंजाब व पाकिस्तान ( भारतातील कांहीं भाग पाकिस्तानात गेल्यामुळे ) अशा परप्रातात एकंदर दीडशें मंदिरे आहेत. या मंदिरात नामदेवाची सुंदरशी मूर्ति आहे व त्या त्या ठिकाणी त्या त्या पद्धतीने नामदेव पुण्यतिथी थाटात साजरी केली जाते आहे. )

महाराष्ट्रात अनेक संत उदयास आले परंतु त्यांच्या कार्याची प्रकाश किरणे प्रकर्षाने प्रकाशित राहिली ती फक्त महाराष्ट्रात ! नामदेव हे उदयास आले महाराष्ट्रात परंतु अस्तास जाण्यापूर्वी या संताच्या वाणीने व्यापले ते केवळ महाराष्ट्राला नव्हे तर अखिल भारताला ! नामदेवांनी केवळ गुजराथच जिंकले असे नव्हे; तर मराठी भाषेपासून अगदी भिन्न असलेल्या पंजाबलाही हस्तगत केले.

ज्ञानेश्वर–तुकाराम यांचे कार्य फार मोठे ! सर्व संतात श्रेष्ठ असे ! परंतु नामदेवाची कार्यपद्धती या दोन्हीहून भिन्न; म्हणून जास्त श्रेष्ठ ! ज्ञानोबा, तुकाराम राबले ते केवळ महाराष्ट्राच्या उद्धारास्तव परंतु नामदेवांनी महाराष्ट्राच्या संत परंपरेच्या विचारसरणीचे विचार निनादीत ठेवले ते भारतभर !

कुठे पंजाब ! कुठे महाराष्ट्र !! पण ही दोन टोके नामदेवानी एक विचाराने व एक वाणीने सहजगत्या परंतु सुंदररित्या सांधून टाकली. ती इतकी एकजीव केली की पंजाबला नामदेव परकीय न वाटता स्वकीय वाटले. परप्रांतात प्रवेश करून तेथल्या लोकांतील परकेपणा दूर करण्यात नामदेवांनी हे जे कसब दाखविले ते अद्भूत व अपूर्व होय ! त्यातही महाराष्ट्राने नामदेवांना जितके मानले त्याहिपेक्षा पंजाबने अधिक मानले ही महाराष्ट्र संत कार्यपरंपरेतील सर्व श्रेष्ठ व अधिक अभिमानास्पद गोष्ट होय !

# गोपाळपूर



गोपाळपूर तीर्थस्थानाचे दृश्य

# ७

पंढरपूरला कुणी दक्षिणगोकुळ म्हणतात. दक्षिण गोकुळ या नावाची निशाणी म्हणजेच पंढरपूरच्या दक्षिणेस असलेलें रम्य स्थळ, गोपाळपूर! गोकुळ म्हटलें कीं यमुनेच्या तटी कटीवर घडा घेऊन लाजत-मुरडत जाणाऱ्या हंसऱ्या-भोळ्या मनमोहक गवळणींचें मन मोहीत करणारें गोड चित्र चक्षूंसमोर उभे रहातें. मग हळूच दृष्टीसमोर येतो त्यांना छेडून, त्यांच्या खोडसाळ खोड्या करणाऱ्या खट्याळ गोपाळांचा मेळावा. मग आठवतो. तो पेंद्या! ती राधा! आणि तो कृष्ण.

'गोकुळ' या शब्दात शृंगारिक मनाला गुदगुल्या करण्याचें विलक्षण सामर्थ्य आहे. गोपाळपूर या नामोच्चारांत ते तितकेसें नाहीं हें अगदीं सत्य आहे परंतु गोपाळपूर म्हटलें कीं रसिक यात्रेकरूंच्या नजरेसमोर चटकन् गोकुळाचें चित्र उभें रहातें हेही कांहीं अगदींच असत्य नव्हे. प्रत्यक्षात मात्र गोपाळपूर हे कवि-कल्पनेपेक्षा अति वेगळें आहे.

## ● दहिकाल्याचा उत्सव

गोपाळपुरात तीन श्रद्धास्थानें विशेष विख्यात आहेत. एक संत जनाबाईची गुहा आणि तिचा संसार. दुसरें भीमक राजाचें देऊळ आणि तिसरें गोपाल-कृष्ण मंदीर!

पंढरपूरच्या तीर्थस्थानात—विठोबा व गोपाळपूर यांचा आषाढी यात्रेच्या बाबतींत एक सलग्न संबंध आहे. याच संबंधाच्या बंधनामुळे गोपाळपूर स्थळाला विशिष्ट वेगळें महत्व प्राप्त झाले आहे.

हे यात्रा—नाते असे आहे की, आषाढी यात्रेला ज्या दिंड्या पंढरपुराला पायी चालून येतात, त्या पाच दिवस पंढरपुरात वास्तव्या करून पौर्णिमेला याच गोपाळपुरात दहीकाल्याचा उत्सव साजरा करतात. आणि मग माघारी जातात. या उत्सवाच्या निमित्ताने वर्षातून एकदाच का होईना, परंतु गोपाळपुराचें गोकुळांत रूपांतर होते. एका टेकडीवर चारी बाजूला किल्ल्यासारखी बांधलेली तटबंदी, मध्ये कृष्ण मंदीर व भोवताली उघडी भरपूर जागा. असे आहे या गोपाळपुराचे रम्य स्वरूप! मंदीरा सभोंवतालच्या याच उघड्या जागेत, दही-दुधाच्या मोठमोठ्या हंड्या टांगून येथें दहीकाल्याचा खेळ आषाढी पौर्णिमेला खेळला जातो तेव्हाचें दृश्य रमणीय असते.

### लाह्यांच्या गालीच्यानें शृंगारले जाणारे रस्ते

गोपाळपुरांतल्या दहीकाल्याचें महत्व फार! तेव्हा योग्य वेळी योग्य प्रकारें या उत्सवांत मनाजोगे सामील होता यावे, म्हणून भक्त मंडळीची कोण धडपड चालू असते. कांही दिंड्या प्रातःकाळीच गोपाळपुराकडे निघतात, तर कांहीं आदल्या रात्रीच तेथें मुक्काम ठोकतात. दिंड्या जातांना नाचतात तेव्हांचें दृश्य अपूर्व असते; टाळयांच्या मृदू-मधूर आवाजांत मिसळणारा भजनाचा सुस्वर बोल वारकऱ्यांचा लाडका मृदंग क्षणाक्षणाला झेलून, वाटेवाटेंतून हवेंत उधळून देत असतो. वातावरण मोठे संगीतमय असते. दिंड्यांच्या भोंवतीं बरीच भक्त मंडळी असतात ती अशी की भजनांत रंगून दंग झालेली! मुखांत हरीनाम आणि अंतःकरणांत हरीध्यान, अशी असते त्यावेळची वारकऱ्यांची अवस्था! मग ते दृश्य पहाणारा मोहीत झाला नाही तरच नवल! गोपाळपुराकडे धिम्या गतीनें जाणारा

१७२०४



यात्रेकरूवर्ग, वाटेंत दिंड्यांवर लाह्यांचा वर्षाव करतो. वर्षाव इतका होतो कीं विठ्ठल मंदिरापासून गोपाळपूरकडे जाणारा मुख्य रस्ता शुभ्र लाह्यांनी पूर्ण भरून जातो. असे वाटते की कृष्णाच्या खास स्वागतासाठीं गोपाळपुराकडे जाणारे हे प्रमुख रस्ते आज लाह्यांच्या गालीच्यांनी मुद्दामच शृंगारण्यांत तर आलेले नाहींत ना ? प्रत्यक्ष दहीकाल्याच्या प्रसंगी कृष्णभक्तीला कवटाळणाऱ्या वारकरी पंथाच्या रोमारोमांत कृष्ण संचारतो ! दही–दुधाचे पुंजकेच्या पुंजके मुखीं नेतांना, वारकऱ्याच्या मनीं कृष्णभक्तीचें भरतें येतें. पायांतील बंधाला संपूर्ण स्वातंत्र्य देऊन पाय तुटेपर्यंत या दिवशी ते नाचतो.

कुणी कीर्तनें करतात, कुणी भजनें म्हणतात, कुणी काल्याचे अभंग आळवितात. जे ते आपापली इच्छा अपापल्या परीने परिपूर्ण करतात. ह्या दहीकाल्याच्या प्रसंगानें सुमारे चाळीस हजार भाविकांना आपलें 'कृष्णप्रेम' ममतेनें व्यक्त करण्याचा मोठी गोड संधी मिळते. सहसा ही सुंदर संधी कुणी दवडीत नाहीत. हा काला उत्सव म्हणजे पंढरपुराच्या कपाळावर भक्तांकडून सामुदायीकरित्या गोपाळपुरांत लावण्यात येणारा एक बहुमानाचा 'टीळा' च होय ! एकदां तो लावला की मग आषाढी यात्रेचें बहुतेक कार्य जवळ जवळ संपतेच !

### ● संत जनाबाईचा संसार आणि अश्रू ढाळणाऱ्या स्त्रिया

गोपाळपुरचें दुसरें महत्व आहे तें संत जनाबाईमुळें. संत-वाङ्मयात सुटसुटीत ओव्यांची भर घालणारी संत जनाबाई ही इथलीच ! गोपाळपुरास या संत जनाबाईचा जुना संसार आहे. ज्या जात्यावर पीठ दळतां दळतां जनाबाईच्या ओठांतून ओव्यांच्या ओळी बाहेर पडल्या, तें जातेही त्या संसारांत आहे. हा सर्व संसार एका ओसरींत

आहे. गाडग्यावर गाडगी, बाजूला चूल आणि आजूबाजूला भाकरी असे हें जनाबाईच्या इथल्या संसाराचें दृश्य. तें संसारी दृश्य पहातांना भाविक स्त्रिया खूपदा श्रद्धेनें विरघळून जातात, कांहीच्या नेत्रांतून सारखें घळघळ पाणी वाहू लागते. स्त्रियांच्या डोळ्यांत पाणी यावयाला फारसा वेळ लागत नाहीं, ही कुणाही पुरुषाला अपरिचित गोष्ट नव्हे! स्त्रियांच्या डोळ्यांत पाणी केव्हांही येते. भावना डिवचल्यावर आणि भाविकता वाढल्यावर! आणि स्त्री एकदां का पूर्ण भाविक बनली म्हणजे तर अश्रू येणे हे स्त्रियांच्या स्वाधीन नसते. असें असलें तरी संत जनाबाईचा हा संसार पहातांना सर्वच स्त्रियांच्या डोळ्यांत एकाएकी अश्रू कां उभे रहावेत हें तज्ञ पुरुषांनाहि अचूक कळणें कठीणच! हा संसार पहातांना विधवा आणि वयातीत स्त्रियांचे डोळे पाणावतात त्याचें कारण कदाचित त्यांना आपल्या गत-सुखीसंसाराची स्मृति होत असावी. परंतु तरुणींनी तो संसार पाहून अश्रू कां ढाळावेत? कपाळावर व्यवस्थित बारीक कुंकु लावलेल्या व गोल पातळांत वावरणाऱ्या अशा आधुनिक तरुणींना देखील तो जनाबाईचा संसार पहातांना डोळ्याला पदर लावावासा वाटतो, तेव्हां मोठेच नवल वाटतें.

### ● पाषाणाची भांडीं आणि पाषाणाचीच गोवरी

संत जनाबाईच्या संसारीं वस्तु न्याहाळतांना मुख्य प्रश्न मनांत डोकावतो तो असा की, जनाबाई प्रत्यक्ष संसारांत पाषाणाची भांडीं वापरीत होती की, मातीची? समजा तिच्या घरांत पाषाणाची भांडीं होती, तरी गोवऱ्या पाषाणाच्या कशा? या बाबतींत येथील माहित-गाराला एका लेखकानें तसा प्रश्न विचारला असतां तो म्हणाला, "या

गोवऱ्या इतकीं वर्षे तशाच इथं पडून आहेत मग त्या पाषाणाच्या होणार नाहीत तर काय भाजलेल्या पीठाच्याच रहाणार ! पंढरपूरच्या विठोबाची वीट कांहीं काळानें दगडाची झालीच कीं नाहीं."

संत जनाबाईचा पाषाणाचा हा संसार वर्षानुवर्षे अशाच स्थितींत येथें आहे. आणि त्या संसाराचें कौतुक कुठलीच शंका न घेता भाविकांकडून कित्येक वर्षे केलें जात आहे. त्यामुळें या संसाराबद्दल अलिकडेच शंका-कुशंका का काढण्यांत याव्यात, याबद्दल इथल्या मराठा हक्कदारांना कमालीचें नवल वाटतें हेंहि सहाजिकच आहे. कारण साक्षरतेचा जरासुद्धां स्पर्श न झालेला असा इथला मराठमोळा वर्ग ! जो की महाराष्ट्रांतल्या खेडोपाडीं फार मोठ्या प्रमाणांत वावरत आहे त्यांतलाच हा एक. भक्त पुढ्यांत जे टाकतील तें पदरांत पाडून घ्यावयाचें हेंच त्यांचें दैनिक कर्तव्य. त्यांचे पूर्वज जें सांगत आले, तेंच ते इतरांना सांगणार. तुमची शंका-कुशंका ते समाधानकारक रीतीनें कशी काय सोडवणार ? भाविक मंडळींना हा पाषाणाचा खास संसार जनाबाईच्या नांवे फसविण्यासाठीं मुद्दाम जाणूनबुजून उभा करण्यांत आला आहे असेंहि नाहीं. कुणी सांगावें, कदाचित् एखाद्या शिल्पकार भक्तानें संत जनाबाईवरची आपली श्रद्धा व्यक्त करण्यासाठीं मोठ्या आपुलकीने हें दृश्य उभारलें असेल आणि तेंच पुढें इथल्या गरीब हक्कदाराच्या उपजिवीकेचें साधन झालें असेल ! कसेंहि असले तरी ज्याच्या डोक्यांतून ही संसार-योजकता प्रथम बाहेर पडली त्यांचें कौतुक केले पाहिजे. कारण या संसाराच्या प्रात्यक्षिक दृष्याचा पहाणाराच्या मनावर एक वेगळा परिणाम निश्चित होतो. हे दृष्य पहाताना संत जनाबाईचें जीवन चरित्र आपोआप

आठवू लागतेच आणि त्याचबरोबर एकदां तरी संत जनाबाईच्या जुन्या ओव्या चाळाव्यांत अशी मनाशी खूणगांठ बांधावीशी वाटते. या जनाबाईच्या पाषाण संसारांतील पाषाण वस्तूंत शिल्प असें कांहीच नाहीं. पण त्यांत भावना हेलावण्याचें केवढें बळकट सामर्थ्य आहे.

**● नावेतला प्रवास आणि कृष्ण मंदिर**

पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरापासून गोपाळपूर अंदाजें एक मैलांवर आहे. बरेच भाविक या स्थानीं पायीच जातात. पुंडलिकाच्या मंदिराकडून गोपाळपुरास जाण्याचा एक मार्ग आहे. तेथून नावेंतून जावें लागतें. गोपाळपूराला जातांना किंवा येतांना नावेतून प्रवास करावा कां तर त्यानें पुण्य पदरी लागते अशी श्रद्धा ! परंतु नावाडी तसा आग्रह मात्र मुळींच करीत नाहींत, नावेतून आपण जर गोपाळ-पूराकडे निघालों, तर वाटेत ' विष्णूपद ' नामक श्रद्धास्थान लागते. तेथूनच पुढें किल्ल्यासारखा जो भाग दिसतो, तेच गोपाळपूर. येथें वर जातांना पायऱ्या न चढतां बाजूची चढण चढून जाण्याचा एक जुना प्रघात आहे. वर जाण्यापूर्वी बाजूच्या एका पडवीत संत जनाबाईची गाणी ऐकूं येतात. भाविकांचे लक्ष वेधावे व त्यांनीं भक्तिभावानें त्यांना दान करावे हाच त्या पडवीत बसलेल्या बायकांचा हें अभंग म्हणण्यामागील हेतु. तेथेंच एक भले मोठे रांजण आहे. त्यांत फार मोठी अशी रवि आहे. ती घुसळणाऱ्याला संसारांत दहिदुधाचा तुटवडा पडत नाहीं असा एक पूर्वपारंपरिक चालून आलेला समज.

आपण रवि घुसळू लागलों कीं त्या बायका गोकुळाच्या कान्ह्याची गाणीं पुन्हां गाऊं लागतात. रवीला हात लावला कीं थाळीत कांहीं तरी टाकणें भागच पडते. ह्या स्थानी थांबून झालें की

मग आपण भाविक वर चढूं लागतो. तेथून जो दरवाजा लागतो तो गोपाळपूराच्या प्रवेशाचा पाठचा भाग. भाविक तेथूनच जातात. कारण चढणीचा मार्ग त्याच दरवाज्याला येऊन मिळतो. गोपाळपूरचा आंतला भाग एखाद्या जुन्या वाड्यासारखा आहे.

हा एक प्रचंड वाडाच होता की पूर्वी येथें किल्ला होता? बहुधा हा इथला जुना किल्लाच असावा. येथें तीन मंदिरें आहेत. मुख्य गोपाळ–कृष्णाचें मंदीर मोठें आकर्षक आहे. मूर्तीचे शिल्पहि निरीक्षण करण्याजोगे आहे. हें मंदिर सन १६६६ साली म्हणजे सुमारें सातशें आठ वर्षांपूर्वी कै. शामजी अनंत नांदिवरेकर यांनी बांधण्यास सुरवात केली. पण त्यांच्या नातलगांनी त्या मंदिरांत नंतर वाढ केली आणि पुढें मंदिराचा अर्धवट राहिलेला भाग कै. गजेंद्र यशवंत नामक एका दानशूरानें स्वखर्चानें पूर्ण केला.

### ❁ जनाबाईची गुहा व गोपाळपूरा तट

याच मंदिराच्या बाजूला दुसरे एक भव्य मंदिर आहे. त्यांत भीमक राजाचा मोठा आकर्षक मुखवटा आहे. या मंदिराच्या रचनेवरून एक सिद्ध होते. पूर्वी येथे वेगळेच दैवत असावे. येथे लक्ष्मीनारायणाचेसुद्धां एक मंदिर आहे. वाड्याच्या आंतल्या अंगाला गाळे आहेत. त्याला ओवऱ्या म्हणतात. संत जनाबाईचा संसार मांडला गेला आहे तो इथल्याच एका ओवरींत. तेथेच एक समाधि गुहा आहे. तिला संत जनाबाईची गुहा म्हणतात. गुहेंत प्रकाश जाण्यास जागा नाहीं. गुहेंत प्रवेश करायचा म्हणजे हातांत पणती घ्यावी लागते. आंत गेले की महत्त्वाचा फायदा होतो तो असा की संत घेत असलेल्या समाधीची जागा आंतून कशी बांधून काढली


जाई त्याची येथे पूर्ण कल्पना येते. येथे संत जनाबाईची एक छोटी मूर्ति आहे.

येथील मंदिराचा कळस आकर्षक आहेत. मंदिराची बांधणीही मजबूत. गोपाळपुराच्या भोवताली तट आहे. चांगला रूंद असा. तो चढण्यास चार दिशेला चार पायऱ्या आहेत. वर गेल्यावर सभोंवतालचे दृश्य एकाच वेळीं डोळयात चित्रित होते. त्यात चंद्रभागेच्या किनाऱ्याचे जे दृश्य दिसे ते किती तरी मोहक ! कितीही पहा ! संपूर्ण समाधान होतच नाही.

गोपाळपूरा हे स्थळ म्हणजे जणू या भागांतील भव्य पुराण पुरुषच ! ह्या स्थळाचा हा तट म्हणजे त्या पुराण पुरुषाचे मजबूत खांदे ! एकदा कां त्या खांद्यावर चढले कीं तेथून साचित्र पंढरपूराचे संपूर्ण दर्शन घडावे ! !

● ●

● क्षेत्र
नेवासे



क्षेत्र नेवासे येथील मोहिनीराज मंदिर

# ८

तीर्थयात्रा पर्यटनासारखे पुण्य नाही आणि कीर्तन श्रवणासारखे सौख्य नाही! म्हणतात की यात्रेत यात्रा करावी ती काशीची आणि कीर्तनात कीर्तन ऐकावे ते नाथाच्या एकनाथी भागवत आख्यानाचे! यात्रेच्या स्थळात अग्रस्थानीं असलेली काशी आणि कीर्तनाच्या आख्यानात अग्रणी असलेले नाथ, यांचा परस्परात फार निकटचा संबंध! त्या संबंधाच्या संगमानेच पैठण नगरीला एक वेगळेंच महत्व प्राप्त झाले आहे. या दोघांत जो निकटचा संबंध आहे तो असा कीं ज्याने नाथांचे प्रथम दर्शन घडविले त्या एकनाथी भागवत ग्रंथाचा जन्म झाला आहे तो काशी या पुण्यक्षेत्री आणि या ग्रंथाला जन्म देणारे जन्मदाते जे एकनाथ ते जन्मले आहेत पैठण नगरीत!

विद्या आणि व्यासंग यांत पैठण व काशी यांचे सख्ख्या भावंडाप्रमाणे नातें! त्यातहि काशीला वडीलकीचा मान आहे. पैठण धाकट्या बंधूप्रमाणें! म्हणूनच पैठणचे जे दुसरें नांव प्रसिद्ध आहे तें म्हणजे 'दक्षिण काशी.' ज्ञानेश्वरानंतर तीनशें वर्षांनी उदयास आलेल्या एकनाथ महाराजांनी पैठणाला लौकिकाच्या सुवर्ण पालखीतून मिरविलेंच परंतु या क्षेत्राचें नांव आपल्या पश्चातही सहस्र मुखांत घोळत ठेवले.

पैठणची कीर्ति पुरातन खरी, परंतु एकनाथानीं या नगरीची घडण वेगळ्या स्वरूपांत घडविली. म्हणूनच तर पैठणीला 'नाथांची पैठण' म्हणतात. गोदावरीच्या काठी विराजमान झालेल्या या सौंदर्य-युक्त श्रद्धास्थानाचे सध्याचे महत्व हेच आहे की, या तीर्थस्थळीं

जाण्याने काशीचे पुण्य पदरी जोडता येतेच परंतु त्याचबरोबर युगप्रवर्तक साहित्याचे पर्व निर्माण करणाऱ्या एका महान श्रेष्ठ संताच्या चरण कमलाला स्पर्श करण्याचे भाग्यही साधता येते.

**● नाथषष्ठीचा अपूर्व उत्सव**

नाथाच्या पैठणातील पुण्यशाली दिवस म्हणजे नाथषष्ठी. या दिवशीं या पुण्यनगरीच्या स्पर्शानें पवित्र होण्यासाठी लाखो भाविक गर्दी करतात. या उत्सवाचीं आहेत पंच अंगे! फाल्गुन वद्य षष्ठी या उत्सवाच्या दिनीच जनार्दन स्वामींचा जन्म झाला हे या उत्सवाचे पहिलें अंग. याच दिवशी त्यांना दत्तदर्शन घडले आणि याच दिवशी निर्याण झालें हीं दुसरी व तिसरी अंगे. नाथांना जनार्दन स्वामीकडून गुरुकृपा घडली ती याच दिवशी हे चौथे अंग आणि याच दिवशी नाथांनी समाधीची वाट धरली हे उत्सवाचे पांचवे अंग. पंच अंगाच्या प्रभावी पैलूने प्रकाशित असलेल्या या उत्सवाची किरणे मोठी तेजस्वी! ती गेली साडेतीनशें वर्षे या भूमिवर तेजोवलयाचे एक सुखद वातावरण निर्माण करून राहिली आहेत.

नाथषष्ठीचा उत्सव सोहळा द्वितीयेपासून अष्टमीपर्यंत सुरू असतो. दर दिनी उत्साह वाढतो. कैक दुकाने आपला पसारा वाढवितात. कार्यक्रम अहोरात्र चालू असतात. गोदावरीला तर क्षणाची उसंत मिळत नाहीं. एकीकडे ती यात्रिकरूंचे दुःख गिळत असते आणि दुसरीकडे त्या दुःखी अंतःकरणाना उर्गा करण्यासाठीं आपल्याच वाळवंटीच्या खांद्यावर कीर्तन प्रवचनाच्या सोहळ्यात त्याना रमवीत असते. द्वितीयेला नाथांच्या रांजण उघडा केला जातो. तेव्हा गोदावरीमातेच्या पात्रातील पवित्र पाण्याने भरलेल्या घागरी त्यात

ओतण्यासाठी भाविक एकच गर्दी करतात ह्या कार्यक्रमासमवेतच नाथ चरित्राच्या पठणाचा पाठ चालू असतो. षष्ठीला वाळवंटातून दिंडी निघते. हजारो वारकरी या सोहळ्याला हजर रहातात. ही दिंडी वाजत गाजत समाधिकडे जाते. अष्टमीला गोपाळकाल्याने या उत्सवाचा शेवट होतो. षष्ठीची पहिली रात्र म्हणजे पैठणीतल्या नव्या नव्या प्रवचनाला प्रारंभ करण्याचा मुहूर्त ! त्या सुमारास इथे सुरू होणारी कीर्तने अति श्रवणीय ! नव्या काव्यपंक्ती उत्स्फूर्तरित्या प्रगट होतात आणि रंगतीची रसोत्पती आपोआप साधून कीर्तनाला आपोआपच आगळा रंग चढतो. नाथषष्ठी हा एक महाराष्ट्रातला अपूर्व उत्सव ! या उत्सवानिमित्त थोडे थोडके नव्हेत तर लाख-दीड लाख वारकरी या स्थळी जमतात.

### ● नाथकालीन महाराष्ट्र

महाराष्ट्राला प्रगती पथावर न्यावे या तळमळीने इथल्या ज्या संतांनी आपला देह चंदनासारखा झिजविला त्याच मंगलमय वातावरणात नाथाचा उदय झाला. एकनाथानी दिनरात्र कष्ट उपसून जे कार्य साधले ते म्हणजे संत भंगतीची शास्त्रशुद्ध कार्याने पक्की बांधणी करण्याचे.

ऐतिहासिक दृष्टया नाथकालीन महाराष्ट्राचे जे दर्शन घडावयाचे ते असे. त्यावेळी सर्वत्र दुही माजली होती. स्वकियात आणि परकियातही. परंतु स्वकियापेक्षा परकियाच्या दुहीने इथे जास्त दुफळी झालेली. अर्थात त्याने शत्रू पक्षाच्या संघशाक्तित भेद पडली होती. याच भेदाभेदीतून बड्या स्वरूपात वावरणाऱ्या बहमनी राज्याच्या महाराष्ट्रावर लटकत्या तलवारीचे त्याचकाळी पाच तुकडे

झाले होते. त्या पाच तुकड्यांने निजामशाही, आदिलशाहीतील सुलतानशाहीला पुरा सुरुंग लागत चालल्यामुळे मराठ्यांच्यावर मुसलमानांचा पूर्वी इतका दाब राहिला नव्हता. मुसलमानांच्या तैनातीत शूरसेनानी म्हणून नोकरीस राहिलेल्या सरदारांना जे आतां दाबण्याच्या प्रयत्नांत होते त्यानाच दाबून ते ते मराठे सरदार स्वपराक्रमाने स्वतःचे स्वतंत्र राज्य उभारण्याच्या मार्गाने तयारी करीत होते. तोच तो काळ होता की, ज्या काळाच्या उदरातून भोसले, माने, शिर्के, घाडगे, सावंत, निंबाळकर, डफरे अशी एकापेक्षा एक मराठी घराणी महाराष्ट्राच्या सेवाचाकरीचा ध्यास घेऊन पुढे आली. रणी भगवा ध्वज घेऊन एकीकडे आपले मराठे सरदार स्वातंत्र्याची सीमा योजित असतानाच दुसरीकडे धर्म संस्कृती, साहित्य क्षेत्रात आपला राष्ट्र झेंडा मानाने फडकत रहावा या ईर्षेने जी एक व्यक्ति पैठणातून आपला प्रभाव पाडूं लागली होती, ती म्हणजे एकनाथ नाथांनी त्याकाळात लोकजागृतीचे लोक वाङमय प्रसवून जनसागरात इतके प्रचंड वादळ निर्माण केले की, त्या सागराच्या उंच उडणाऱ्या लाटा पाहूनच उत्तरेकडील मक्तेदारी पंडीतानी तजेदार दक्षिण भागापुढे, आपोआपच आपली मान झुकवावी.

इ. स. १५३३ ते १५९९ या काळात एकनाथानी सांस्कृतिक पुनर्जीवनाचे महान कार्य केले. त्या कार्यामुळेच नाथाना संत साहित्याच्या पुनर्जीवनाचे प्रमुख आणि पहिले प्रतिनिधी मानतात.

### ● अवतार कार्य

नाथांची मूर्ति ही त्रिरंगी पंथानी घडविली गेली होती. त्यांचे गुरु जनार्दन स्वामी. ते होते दत्तोपासक. त्यामुळे दत्त सांप्रदायी

तत्त्वाची संपूर्ण ओळख करून घेणे हे नाथाचे आद्य कर्तव्यच ठरले. गुरुच्या उपदेशामुळे ते ज्ञानेश्वरीला पुढ्यात ठेवून बसले आणि त्याच बैठकीत त्यांनी ज्ञानेश्वरीच्या वारकरी पंथाला आपलेसे केले. शिवाय घराण्याचे कर्तव्य म्हणून त्यांचे पणजोबा भानुदास याच्यापासून चालत आलेल्या भागवत धर्माचा पंथदिवा त्यांनी हातातून सोडलेला नव्हता. तशात पैठणची परंपरा त्यांच्या पाठी होती ती वेगळीच ! त्यामुळे नाथ म्हणजे त्याकाळातील महत्त्वपूर्ण प्रमुख पंथाचे एक प्रतिमात्मक असे तेजस्वी रूपच बनले होते.

महाराष्ट्रातील एका विशिष्ठ साहित्याच्या निर्मितीचे मूळ पुरुष नाथ हेच ! त्यांनी विपुल ग्रंथरचना केली. त्या ग्रंथाचे महत्त्वाचे कार्य हेच की त्यांनी सांस्कृतिक जीवनाच्या विविध छटा संसारी माणसाच्या घरापर्यंत सुलभरितीने पोहचविल्या. ‘ रुक्मिणी स्वयंवर,’ ‘ भावार्थ रामायण ’ या ग्रंथाद्वारे एकनाथांनी महाराष्ट्राच्या साहित्य कोठाराचे वजन तर वाढविलेच परंतु त्याचबरोबर महार, गोंधळी, गारुडी, वासुदेव, कोल्हाटीण, मुरळी इत्यादि फिरत्या जमातीच्या भाषेत त्याना धर्मबोध देणारी ३०० हून अधिक बहुरूपी बहुढंगी अशी भारुडे रचून, लोकवाङ्मयाचा एक उत्कृष्ट आदर्शच साकार स्वरूपात महाराष्ट्रात कायम करून ठेवला.

नाथांचे सर्व साहित्य म्हणजे एका विशिष्ट काळातील महाराष्ट्राच्या समाजिक स्थितीतील बारीकसारीक जीवनाचे चितारलेले प्रभावी असे चित्र आहे ! नाथ आणि ज्ञानेश्वर यांत कार्याची बैठक एकच ! परंतु विचाराच्या परिपक्वतेत फरक !

ज्ञानेश्वर जन्मजात संत. तेव्हा त्याचे सर्व साहित्य उत्स्फूर्त

रसातून बुडवून काढलेले. म्हणूनच त्यांच्या वाक्यावाक्यातून परिस्थितीची सुचकता होते. त्यांच्या काव्य पंक्तीतल्या शब्दनशब्दांत विषय सुचविण्याची रित काही आगळीच !

एकनाथ संत खरे, पण ते प्रथम गाढे विद्वान होते. व्यासंगाची पक्की बैठक हेच त्यांच्या कार्याचे ध्येय ! सिद्धांत सिद्धीद्वारे मांडले जावेत हा त्यांचा दृष्टीकोन ! अशुद्ध साहित्याचे शुद्धीकरण करण्यासाठीच जणू नाथांचा अवतार अवतीर्ण झालेला. ज्ञानेश्वरीत जे जे तत्व अपुरे सोडले गेले त्यातले पूर्णत्व नाथानी पूर्ण करून ज्ञानेश्वरीला एक आगळे तेज प्राप्त केले. ज्ञानेश्वरीच्या मूळ प्रतीचे शुद्धीकरण हे एकनाथाचे सर्वात महान कार्य होय !

### ● पैठणचे मोहक दर्शन

पैठण हे नगरहून ४० मैलांवर. औरंगाबादहून ३० मैलांवर. सम्राट अशोकाच्या निधनानंतर गुजराथ, काठेवाड, माळवा, आंध्र, कर्नाटक इत्यादि ठिकाणी आपले राज्यशकट चालविणाऱ्या सातवहान या राजकूळाच्या काळी पैठणचे वैभव फार मोठे ! इथली बाजार पेठ विशेषतः गाजली ती तलम कपड्यांमुळे आणि रेशमी साड्यांमुळे ! राजदरबारी कपडा जायचा तो इथलाच ! इथे लोक हत्तीवर येत आणि हत्तीवरून खरेदी करीत. सध्या जी इथे पडकी घरे दिसतात त्या जुन्या काळांच्या गाजलेल्या घरांच्या स्मृति. हे अवशेष आढळतात जागोजागी पण मोडक्या तोडक्या स्थितीत ! या पडक्या अवशेषाचा आधार देऊन इथले मठ मंदिरे उभी आहेत. त्यातच मशीदीनाही कमी नाही ! या मशिदी तरी कशा ? तर जुन्या मंदिर शिलपाच्या मानेवर बसून उभा राहिलेल्या अशा !

पैठणीत प्रथम दर्शन घ्यावयाचे नाथांच्या घराचे. की ज्या घराचे रूपांतरच पुढे नाथ मंदिरात झाले. नाथ पुजेसाठी ज्या गाभाऱ्यात बसत तेथे सध्या मोठा देव्हारा आहे. तेथल्या आसनावर अनेक मूर्ति आहेत त्यात बाळकृष्णाची मूर्ति महत्वाची. तिला 'विजयी विठ्ठल' म्हणतात. मूर्ति वितभर उंचीची--पण नाथांचे दैवत म्हणून ती-केवढी तरी महत्वाची! इथेच नाथांचा गाजलेला प्रसिद्ध रांजण आहे की ज्यासंबंधी तीत कृष्ण कावडीने पाणी ओतीत अशी आख्यायिका आहे. नाथांचा जन्म याच वाड्यात इ. स. १५३२ ला झाला. भक्तीपंथाच्या ओढीने बाराव्या वर्षी ते घराबाहेर पडले. त्यांनी देवगिरी गाठली आणि तेथे जनार्दन स्वामींकडून गुरुदीक्षा घेतली पैठणीत. ते पुनरपि वयाच्या पंचविसाव्या वर्षी आले आणि पुढले कार्य त्यांनी सूर्य किरणांच्या गतीने पार पाडले.

इथल्या गाभाऱ्यात दोन खांब दिसतात त्यातील एका खांबाला टेकून नाथ प्रवचनास बसत. चाळीस वर्षे त्यानी याच जागी आपला साहित्य संसार स्वपत्नीसह केला. शके १५२१ मध्ये जगापासून देह त्यांनी अलिप्त केला. नाथाचे समाधी स्थळ नदीकाठी आहे. समाधी स्थळी मंदीर आहे. आजूबाजूला ओवाऱ्या आहेत. वृक्षाची छाया आहे. हे स्थळ मोठे रम्य आहे. नाथांच्या या प्रमुख दोन स्थानांव्यतिरिक्त पैठणात असलेली अन्य स्थानेही अवलोकनीय आहेत. त्यात ज्ञानेश्वरानी रेड्याच्या मुखातून वेद वदविले ती एक जागा. हे स्थळ गोदावरी काठी इथल्या नाग घाटावर 'नागतीर्थ' म्हणून प्रसिध्द आहे. त्या जागी आहे फक्त एका रेड्याची कोरीव प्रतिमा! या सात वाहनांच्या वाड्यात जी एक विहीर आहे तिला 'शालीवाहनाची विहीर' म्हणतात. ऐतिहासिक दृष्टया या विहिरीचे महत्व फार मोठे!

प्रवास
२५/१२/६८

महानुभाव पंथाच्या संतचक्रधारींनी इथे फार मोठी क्रांती केली. त्यांचे स्मारक म्हणून या जागी त्याचा जो एक मठ आहे त्याचे महत्व असे की, त्या स्थळी अनेक ऐतिहासिक टिपणे जपून ठेवण्यात आली आहेत. या मठश्रद्धास्थानाला भोग नारायणाचें मंदिर म्हणतात. कुणी दत्तात्रयांचे देऊळ असेही म्हणतात.

चक्रधाराने ज्या कृष्णमूर्तिपासून आपली आत्मीयता वाढविली ती जुनी मूर्ति अजूनही येथे दृष्टीस पडते. या महात्म्याने अनेक ग्रंथ लिहिले. त्यांच्या विपुल लिखाणातील काही ग्रंथाच्या हस्तलिखित प्रति एका पडक्या खोलीत सध्या कुजत पडलेल्या पाहिल्या की मात्र दुःख होते. ज्ञानेश्वरापूर्वी होऊन गेलेला हा सत्पुरुष भडोचमधील एका प्रधानाचा मुलगा. त्यानी इ. स. १२६७ मध्ये पैठणात पाऊल टाकले व याच भोग नारयणाच्या मंदीरात दहा महिने राहून संन्यास दिक्षा घेतली. पूर्वी पैठणाला प्रतिष्ठानचे चांगदेव राऊळ म्हणत ते याच महात्म्यामुळे.

नदी काठी कृष्णदयार्ण यांचा एक मठ आहे. या संताचे मूळ ठिकाण कोपर्डे. त्याचे नाव नरहरी नारायण दिवाडकर. गुरुपदेशाने त्यानी नाव बदलले व वयाच्या चोपन्नाव्या वर्षी नाथांच्या स्वप्न दृष्टान्ताच्या आज्ञेवरून त्यानी मठात सतत सोळा वर्षे ग्रन्थ लेखन करून ' हरीवरदा ' या प्रसिद्ध ग्रंथाला जन्म दिला. ज्या कृष्ण मूर्तिसमोर हे ग्रंथलेखन त्यानी केले, ती मूर्ति अद्याप तिथे आहे. गोदावरीच्या वळणावर जो किल्लेवजा मठ आहे; तो शिवदीन केसरी यांचा. हे नाथपंथीय संत. नाथांच्या पालखी प्रसंगी या मठाचा झेंडा अग्रभागी असतो. या संताने त्या काळी पैठणीतल्या एक महत्वाचे कार्य केले

ते हेच की महाराष्ट्रात आक्रमण करू पहाणाऱ्या मुस्लीम धर्मप्रचाराला जागच्या जागी गारद केले.

प्रसिद्धी शिखरावर पुरातन काळापासून विराजमान झालेल्या पैठण या स्थानाचे बुद्धकालीन काळातले नाव पोतण नगर ! शिला लेखातून ' पोतनिक ' असा उल्लेख आढळतो. फार पूर्वीचे पैठणचे नाव ' प्रतिष्ठान .' विद्या, व्यासंग राजधन .आणि व्यापार यास्तव या स्थळाची ख्याती पुरातन ! एके काळी येथून गोमेद या रत्नाची निर्यात व्हावयाची. पुढे तलम सुंदर कापडाच्या निर्मितीसाठी या स्थळाची ख्याती झाली.

जिथे विद्येला मान आहे. विद्येचा सन्मान होतो आहे तेथे लक्ष्मी स्थिरसावर रहात नाही असा अलिकडचा अनुभव. परंतु पैठण हे असे नगर की तेथे लक्ष्मीही सन्माना वावरली आणि विद्या.

पैठणीच्या विद्या उद्यमांत कला कौशल्याची सुद्धा फळे फलाली. व्यापार उद्योगाला सुद्धा उत्तम संधी मिळाली. साधू-संत, युगप्रवर्तक, योगिष्ट, योगसाधन, आक्रमक आणि संरक्षक या सर्वांना सारख्याच मानसन्मानाचे स्थान मिळाले

पैठण प्रथम पासून अनाथ केव्हाच राहिले नाही त्यानी अनाथाना आधार दिला. अनाथांना स्थान देण्याची पैठणाची ही परंपरा फार जुनी. राजेरजवाड्याच्या आणि सरकाराच्या वैभवी पापधूळीने तर पैठणच्या मोतीचे सोने झाले. तिथल्या कित्येक जागा आश्रितांना परिसा प्रमाणे भासल्या. ज्याचा ज्याचा त्या जागेला स्पर्श झाला, त्यांच्या त्यांच्या कांतीला सूवर्णचा रंग चढला. तोही नुसताच नव्हे तर त्यांच्या रुपात, स्वरूपात, सौंदर्यात आगळ्या प्रकाशाची झाक झळकली. ते वैभवानेच नव्हे तर लौकिकानेही न्हावून निघाले.

पैठणीचा विद्वान म्हणजे खरा विद्वान! पैठणीचा व्यापारी म्हणजे खरा व्यापारी! पैठणीचा कलाकार म्हणजे खरा कलाकार असा या पैठण नगराचा पूर्वीचा नाम निर्देश परकियानी सुद्धा परदेशात पसरवलेला भारतात येणाऱ्या प्रत्येक परकीय प्रवाशाच्या रोजनिशीत माहितीपूर्ण पृष्टे पूर्वी लिहीली जात ती पैठणचीच! इतकी ही पैठण महत्वाची तसेंच भाग्याची!

पैठणीच्या साड्या गाजल्या, ग्रंथ गाजले, इथले चमत्कारही चत्कारीक ठरले, पैठणीचे हे सारे वैभव कित्येक काळ नुसते वाढत राहिले तसेंच चढत गेले.

यादव कालापर्यंत पैठण सुव्यस्थित होते. नंतर त्याला उतरती कळा लागली. नाथानी ती सावरली. महाराष्ट्राच्या भालप्रदेशावर पैठणचा कायम स्वरूपाचा अखेरचा वेगळा नांवलौकिक करून ठेवला आहे तो नाथांनीच.

• •

# १

संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीला जन्म देण्यासाठी जी जागा निवडली तिचेच नाव नेवासे! एक हजार तिनशे सदतीस गावे खांद्यावर घेऊन कार्य करीत असलेल्या नगर जिल्ह्यातील नेवासे हे एक तालुक्याचे ठिकाण! एकशे चाळीस गावांचा हा छोटासाच भाग. परंतु महाराष्ट्राच्या इतिहासात ज्ञानेश्वराच्या कृपेमुळे त्याची जी नोंद आहे ती अती मोठी!

नेवासे ही ज्ञानेश्वराची कर्म भूमी! ते तेथेच उगवले व त्यांच्या प्रभा पसरली ती ही तेथूनच! ज्ञानेश्वर उदयाला आले ते नेवासे मधून, परंतु मावळण्यासाठी त्यानी क्षेत्र कुठले निवडले? तर ते आळंदी!

ज्ञानेश्वराच्या जीवन कार्यात आळंदी आणि नेवासे हे दोन महत्वाचे भाग! क्षेत्र नेवासे हे मस्तकाच्या जागी, तर आळंदीचे चरणाशी! म्हणूनच ज्ञानरायाची चरण पूजा बांधतांना ज्ञानोबाभक्त प्रथम धांवतात ते आळंदीस, नंतर मस्तकावर पुष्प वाहण्यासाठी परततात ते क्षेत्र नेवासे स्थळी

## ● देव दैत्यांचे युद्ध

क्षेत्र नेवासे हे सुप्रसिद्ध असे शिवस्थान! पुराणांत समुद्रमंथनाची जी कथा आहे त्याचा या भागाशी निकटचा संबंध! देवादिकांनी समुद्रमंथनातून अमृत रत्नाचा ठेवा हस्तगत केला. तेव्हा त्या रत्नातील अमृताचा लाभ देवादिकांना झाला तो याच जागी.

त्या अमृतातून पुढे कलह माजला. देव व दैत्य यात घनघोर युद्ध झाले. आपली हार की विजय या संबंधी देवातही शंका निर्माण झाली.

तेव्हा त्या कठीण प्रसंगी विष्णूने घेतले मोहिनीचे रुप. आणि त्यांनी दैत्यांना भूलवून त्या अमृताची वाटणी केली. ती वाटणी मोहिनी रुपात असणारे विष्णूच करणारे ! अर्थात असुरांच्या वाटणीला आली सुरा आणि देवाच्या वाटणीला अमृत ! ! अशी आहे ही कथा ! ती पुरातन आहे. ती इथे घडली. म्हणूनच त्या कथा स्मरणास्तव इथे एक मोहिनी रुपातली विष्णू मूर्ति वसविण्यात आली आहे. ती कथा जिथे घडली असे हे जुने स्थळ ! म्हणून या क्षेत्राचे एक आगळेच महत्व. त्या मूर्तिचे नाव आहे मोहिनीराज ! खर म्हणजे ती आहे म्हाळसा मातेची मूर्ति ! तशी ती पूर्वीपासून विख्यात आहे. ते आहे इथले ग्रामदैवत ! तसा या मूर्तिचा मान मोठा ! म्हणून तर केवळ या मूर्ति-साठी इथे भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. नेवासे क्षेत्रातील तेच हे सुप्रसिद्ध मोहिनी राज मंदीर.

### ● ज्ञानोबाची मूर्ति

संत ज्ञानेश्वराचा जन्म शके ११९३ मधला. माता पित्याने प्रयाग क्षेत्री देहत्यागाचे प्रायश्चित घेतल्यामुळे, ज्ञानदेवांनी पैठणीला पंडिताकडून शुद्ध पत्रक मिळविण्याचा यत्न केला. पण पंडितानी प्रारंभीलाच त्यांना नकार दिला. नंतर मात्र ते चमकते ते ज्ञानोबाचे तेज आकलन होऊन ! म्हणून तर नकार देणारे हेच पंडित पुढे शांत मनाने त्याना शुद्धी पत्रक देण्यास तयार झाले ते केवळ आपल्या अशांत मनाला शांत करण्यासाठीच. तरीही त्या पंडितानी एक मेख मारलीच. त्यानी शुद्धीपत्रक दिले. परंतु यौनिबंधनाचा अधिकार मात्र दिला नाही. ज्ञानेश्वर त्या निर्णयानी दुःखी झाले. आणि मग खिन्न मनानेच त्यांनी पुढला प्रवास आरंभिला.

जेव्हा ज्ञानेश्वर नेवासे स्थळी आले तेव्हा त्यांच्या मनात नव्या कार्याची दिशा मूळ धरू लागली. करवीरेश्वराच्या मंदिरात ते रहात. प्रारंभापासून लोकांचा ज्ञानेश्वरांकडे ओढा! परंतु पुढे पुढे त्यांच्याकडून होणाऱ्या चमत्कारामुळे त्यांच्या भोवती अधिकच लोक जमू लागले. जमणाऱ्या लोकांचे दुःख पाहून ज्ञानेश्वर कष्टी होत. या दुःखाने त्यांच्या मनात मोठीच चिंता निर्माण केली ती हे दुःख कसे निवारण होणार या संबंधीची. दुःख या विषयांवर मग ज्ञानोबांनी चिंतन सुरू केले आणि एका प्रभात समयी त्यांच्या चित्ताने आदेश दिला. त्या आदेशानुसार ते इथल्या एका खांबाला टेकून बसले. तेथे बसल्या बसल्याच दुःखी जिवाला सुखाविणारी अशी एक अमृतवाणी त्यांच्या मुखातून बाहेर पडू लागली. दुःखी, कष्टी, निराश जीवांना आधार देणारी गीताच ती! तिचेच नाव ज्ञानेश्वरी! शुद्ध मराठीतला ज्ञानेश्वर हा अमर ग्रंथ ज्ञानेश्वराच्या मुखातून या जागी या स्तंभाजवळ जन्मला. मराठी साहित्यातल्या या अग्रगण्य ग्रंथाने वाङ्मयीन इतिहासात नेवासे क्षेत्राचे नाव अजरामर करून ठेवले ते कायमचेच!

### ● विविध उत्सव

नेवासे क्षेत्रातली देवी मोहिनी ही महाराष्ट्रातील कैक घराण्यांची कुल देवता. म्हणूनच इथे स्त्रियांची खूपदा गर्दी दिसते ती नवस फेडण्यास्तव. माघी पौर्णिमा हा इथला प्रमुख उत्सव. पेशव्यांचे कारभारी कृष्णाजीपंत यांनी या उत्सवाचे महत्व वाढविले. पेशवे या उत्सवाकरता १४०० रुपयांची देगणी देत. आता मिळतात फक्त १४० रुपये.

भाविक वृत्तीला चेतविण्याकडे येथल्या उत्सवात दुर्लक्ष केले जाते! अधिक लक्ष दिले जाते ते बौद्धीकाकडे. म्हणूनच इथल्या उत्सवाची सांस्कृतिक पातळी अति उच्च!

माघ शुद्ध अष्टमी व पौर्णिमेला इथला भागवत सप्ताहाचा सोहळा मोठा पहाण्याजोगा! याच सुमारास येथले भक्त देवीपुढे गोंधळ घालतात, हातात जळते कुंड घेऊन नाचतात. मग होतो पालखी सोहळा आणि त्यानंतर भोजन.

माघी पौर्णिमेला हा म्हाळचाचा जन्मदिन उत्सव. माघ वद्यला फुटते दहिहंडी; तेव्हा तर भक्त मुक्कामालाच असतात.तोही सोहळा महत्वाचा. त्या रात्रीच्या पालखी--मिरवणूकीत प्रमुख सोहळा असतो दारूकामाचा. पालखी पूर्वी होते. ज्ञानेश्वराची पूजा आणि तिची समाप्ती होते ती इथल्या नारदमुनी श्रद्धास्थानाकडे. मानकऱ्यास या समयी मान मिळतो म्हणून तर या पालखीचे नाव आहे मानाची पालखी.

ज्ञानेश्वर स्तंभाची यात्रा हा देखील इथला एक आगळा उत्सव. वद्य ११ व १३ ला भरणाऱ्या या यात्रेला गाजते ते कीर्तन आणि भजन.

इथल्या पूजेला प्रारंभ होतो सनईवादनाने. काकड आरती रूद्राभिषेक, विविध पूजा, नैवेद्य हा इथला पूजा थाट भक्तांचे मन भारून टाकतो.

● **प्रवरा नदीचा प्रवाह**

अहमदनगरातून वाहणाऱ्या प्रवरा या प्रसिद्ध नदीच्या काठावर आहे हे स्थान. प्रवरा नदी विख्यात! ती मिळते गोदावरीला आणि अढळा, महाकुगी, फळा या नद्या मिळतात प्रवरेला.

अमृतमंथनाच्या वेळी देवादैत्यांच्या झगड्यात राहुदैत्याच्या मुखात भूलचूकीने पडलेले अमृत बाहेर काढण्यासाठी, मोहिनीने त्या दैत्याचा शिरच्छेद केला. त्याच्या मुखातील अमृत त्यावेळी प्रवरेत पडले. तेव्हा

पासून प्रवरेस अमृतवाहिनी म्हणतात. गोदा व प्रवरा यांनी अहमदनगरला समृद्ध केले आहे. प्रवरा हे तर नेवासे क्षेत्राचे मुख्य भूषण ! मोहिनी मंदिर हे तिच्याच काठी आहे.

नेवासे तसे इतिहासकालीन असेच प्रसिद्ध स्थळ. त्याचा उल्लेख पुराणातही आहेच. रामायणात या स्थानाचा एक महत्वाचे शिवस्थान असा उल्लेख आहे. इथली भूमि विद्याभ्यासंगास युक्त. म्हणूनच पूर्व काळा-तले ऋषी मुनी या स्थळी मुद्दाम येत; इथल्याच मातीचे एखादे शिवलिंग स्थापित व त्याच्या पुढ्यातच ग्रंथरचनेला प्रारंभ करीत. म्हणूनच पूर्वी इथला भागानभाग शिवलिंगाने व्यापला गेला व शिवलिंगभूमि म्हणून या स्थानाचे एक आगळेच नाव झाले. या क्षेत्रांत पाऊल टाकतांच भक्त अनवाणी चालतो. बरोबर आहे. चपलानी चालावयाचे म्हणजे पायाखाली एखादे शिवलिंग येण्याचा संभव.

## ● अल्प इतिहास

१४९० मध्ये अहमदनगर वसविले गेले. विजयनगरच्या बहीरबाचा पुत्र वारल्यानंतर महमूद बहमनीचा सरदार बनला. त्याचा मुलगा मलीक महमद हा जुन्नर प्रांताचा सुभेदार ! त्याने खास म्हणजे लष्कराच्या छावणीसाठी हे शहर बसविले. मग ही पुढे राजधानी झाली. १४९९ मध्ये देवगिरी हस्तगत केल्यावर या भागाचे महत्व वाढले. पुढे येथे अनेक युद्धे घडली, मलिक अंबर व शहाजी राजे यांनी इथला सारा कारभार संभाळला. बराच काळ इथली सत्ता शहाजी राजे यांच्याच हाती होती. महानुभाव पंथाचे काहीं प्रवर्तक नेवासें येथें प्रचार कार्य करीत. नाथ पंथही येथे वावरला आणि ज्ञानेश्वरांच्या कार्यामुळें पुढे नेवासे अजरामर झाले ते कायमचेच.

नेवासे हे औरंगाबादला जाणाऱ्या मार्गावर ३४ मैलांवर आहे. हा भाग अहमदनगरच्या उत्तरेकडला. म्हणून प्रथम उतरावे लागते ते मध्य रेल्वेच्या श्रीरामपूर स्टेशनावर. मध्ये प्रवरा अडवते. त्यातून आपण पलिकडे जातो नावांनी. या क्षेत्राचे अंतर २४ मैल.

इथे मोहिनीराजाचे मंदिर अति आकर्षक ! त्याचा उंच मनोरा पण अति मोहक, फारच सुंदर ! शिल्प साधेच, छोट्या छोट्या नक्षीदार कलाकृतीने युक्त असे ! त्यावर अनेक चित्र आहेत. या शिखराची उंची पाच फूट आहे. आणि त्याचा आकार कमलाकृति व कांहीसा चक्राकृति आहे. दुसऱ्या भागांत २५ फूट व्यासाचा घुमट आहे. तोही बाहेरून आकर्षक आहे. त्याखालीच सभामंडप आहे. प्रवरेच्या उत्तरेला मुख्य दरवाजांत जयविजयाच्या उंच मूर्ति आहेत. दक्षिण दरवाजा हा पुजाऱ्यांचा. इथल्या सभामंडपाची पोकळी मोठी मजेदार आहे. देवीच्या नावाचा इथे एकदा जयघोष करावा आणि आपले ते शब्द सातदा पुन्हा पुन्हा ऐकावेत अशी आहे या घुमटाच्या पोकळीतली मजा. श्री मोहिनीराजाची मूर्ति १५ फूट उंचीची आहे. तिला हस्त आहेत चार. हातांत शंख, चक्र, गदा आदी शस्त्रें ! मूर्ति असते स्त्रीलंकारानें शृंगारलेली. तिच्या बाजूलाच आहे श्री लक्ष्मी.

नवस फेडण्याचा दृष्टांत पडल्या कारणानें इथले हे आकर्षक मंदिर श्रीमंत सरदार चंद्रचूड जहागिरदार यानी इ.स. १७७३ बांधले. चंद्रचूड हे राणी अहिल्याबाईचे दिवाण ! नेवासे हीं त्यांना मिळालेली जहागिर ! हे मंदिर उभारण्यासाठी चार हजार कामगार चार वर्षे घाम गाळीत होते. या शिल्पाचे तसे महत्व मोठे. कारण त्याचा पाया हा प्रवरा नदीच्या पाण्यांत आहे. इथली मूर्ति सुद्धां तेथल्याच वाळूतली.

इथला प्रवरेचा घाट सुद्धां प्रेक्षणीय आहे. त्यांवर, धनेश्वर, शनेश्वर, कपिलेश्वर, त्रिश्रेश्वर असे कैक श्रद्धालकांर आहेत. त्यातल्या कांहीं मंदिराची पडझड झाली आहे. परंतु बुरुज मजबूत आहेत.

नेवासे हें यादव कालांत विख्यात होते लाडमोर या नांवानें. तेव्हांची बरीच संपत्ती याही भूमागांत अजून शाबूत असावी असा संशोधकांचा तर्क. पण त्याकरतां भूभागाच्या पोटांत शिरायला हवे. हे वैभव नजरेंत भरल्यामुळे तर औरंगजेबाने इथे वारंवार हल्ले केले. त्यानेच इथले जुने शिल्प जमिनदोस्त केले. त्या हल्ल्यात इथली पूर्वीचे मंदिर गाडले गेलें, म्हणून तर चंद्रचूडने हे मंदिर नवे उभारले. औरंगजेबाच्या काळांत इथल्या खूपशा मूर्ति पळविल्या गेल्या परंतु मोहिनीराजाची मूर्ति व ज्ञानेश्वराचा स्मृतिस्तंभ पुण्याईने वाचला तो बडव्यांनी वाळूत कौशल्याने पुरून ठेवल्यामुळेंच. इथल्या घाटावरची पाऊलवाट लाडमोर टेकडीकडे जाते. तेथे प्रवरा दक्षिण वाहिनी होते. हा जुना नेवासे भाग. यादव काळातले हे एक गाजलेले व्यापार केंद्र. खरा नेवासेचा जुना भाग हाच.

**● ज्ञानेश्वरांचे प्रसिद्ध स्थान**

तेराव्या शतकांतील करवीरेश्वराचें याच भागात सिद्धीस्थान आहे. त्याच ठिकाणीं ज्ञानोबा रहात असत. या मंदिराचा दक्षिण भाग महत्त्वाचा. कारण तेथे ज्ञानेश्वर लेखन कार्य करीत. शुद्ध मराठीतला पाहला ग्रंथ ज्ञानेश्वरी हा ज्ञानेश्वराने या मंदिराच्या ज्या स्तंभाचा आधार घेऊन लिहीला, तेथे आतां ज्ञानेश्वराचे स्मृति मंदिर बांधण्यात आले आहे. तो स्मृति स्तंभहि अजून तेथे आहे की ज्यावर एक महत्त्वाचा शिलालेख कोरला आहे. हे ज्ञानेश्वर मंदिर इ. स. १८५४

मध्यें लाला छटराम यांनी बांधले. त्याचा जीर्णोद्धार बापूसाहेब जोशी यांनी केला. आपण सर्वत्र मूर्तिला मुकुट घातलेला पहातो; पण हे एक असे क्षेत्र आहे की, येथे स्तंभाला मुकुट घातला जातो. हा स्तंभ उंचीला ४॥ फूट आहे. स्तंभा शेजारीच निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई व सच्चिदानंदबाबा यांच्या सुबक मुर्ति आहेत डाव्या बाजूस ज्ञानेश्वरांची मूर्ति आहे. फाल्गुन वद्य १२ हा इथला उत्सव दीन. येथे गणपती मंदीर आहे. त्यामागें लक्ष्मण तीर्थ, तेथेच एक लक्ष्मीची मूर्ति आहे. या मूर्तीचे एक वैशिष्ठ्य आहे. तिच्यापुढें चिठी लिहून टाकली की लिहिलेल्या वृत्ताप्रमाणे आपली कामना तृप्त होते अशी इथली एक दंतकथाच आहे. उत्तरेकडे एक ऐतिहासिक वाडा आहे. तेथे आहे न्यायालय. हा वाडा पेशव्यांचे सुभेदार नारो आबाजी नगरकर यांचा. या वाड्यातले स्वतंत्र वैशिष्ठ्य असे की, उत्सव प्रसंगी इथल्या मोहिनी मंदिरातील मोहिनी मूर्ति पांच दिवसासाठीं इथे वस्तीला असते. घाटावर नवे गणेशाचे मंदिर आहे. तेथे दहा दिवस गणेशाचा उत्सव असतो. गांवच्या पूर्वेस त्रिवेणी संगमावर मधुमहेश्वर महादेवाचे एक भव्य मंदिर आहे. तेथे शिवरात्रीस यात्रा भरते. हे मंदिर अहिल्याबाई होळकर यांनी बांधले. तेथे जवळच खंडोबाच्या जेजुरीची सासुरवाडी आहे. त्या भागाला म्हणतात खंडोबाचे नेवासे. येथला निमगांव धावडीची भाग प्रसिद्धी आहे तो चंद्रचुडामुळें. चंद्रचुडाचा हा इथला राजवैभवी भाग. अहिल्याबाई होळकर यांचे तर हे अति प्रिय क्षेत्र. इथली होळकरांची 'हत्ती विहीर' ही तर फार सिद्ध आहे. नेवासे हे एके काळीं केवढे मोठे आकर्षक नगर! पण आज इथे दृष्टीस पडते फक्त पडझड! ● ●

क्षेत्र

देहू



क्षेत्र देहू येथील संत तुकोबाची पाषण मूर्ति

५०० ३.०.
४०९
मृ.पवार
२०/१२/६८

# १०

सर्व सामान्य जनतेला समतेचा संदेश देणारी देहू–आळंदी ही दोन श्रद्धास्थाने, जुळ्या भावंडासारखी इतकी एक जीव आणि एक रूप झाली आहेत की, एकाचे नांव घेतां दुसरे आठवावे आणि दुसऱ्याचा उच्चार करताच पहिल्याचे स्मरण व्हावे ! ज्ञानेश्वराच्या शब्दनादांत जसे नामदेव; भानुदासाच्या वीणा झंकारांत जसे एकनाथ, आणि तुकारामाच्या टाळ गर्जनेत जसें निळोबा एकरूप झाले आहेत, तसेंच आळंदीत देहू एक झाली आहे. देहू म्हणजे इंद्रायणीच्या कुशींत दुग्धपान करीत असलेले असे विठ्ठल बालक की ज्यावर उभ्या महाराष्ट्राचे अतोनात प्रेम !

या बालकांत आळंदी मूलतःच मोठी ! कीर्तनांत श्रेष्ठ आणि सौंदर्यात सुवर्ण मोलाची ! तसें मात्र देहूचे नाही. आळंदी प्रारंभापासूनच सांस्कृतिक शिल्प अलंकाराने नटलेली, तर देहू प्रथमपासून दारिद्र्याच्या व्रणानी विद्रुप झालेली. देहूचे भाग्य खुलले ते तुकारामामुळे ! तुकोबाच्याच प्रभावी वाणीनें देहू तेजस्वी बनली ! त्यांच्याच तपश्चर्येनें ज्ञानसंपन्न ठरली, आणि पुढे मोठी झाली, लौकिकास चढली तीही त्यांच्याच सान्निध्यामुळे ! देहूचे आळंदीशी नाते जुळले तेहि तुकोबामुळेच ! महाराष्ट्राच्या तीर्थ देहाचे देहू–आळंदी हे जणू दोन तेजस्वी डोळेच ! एकात तळपते आहे ज्ञानाचे प्रखर तेज; तर दुसऱ्यांत वर्तनाचे !

### ● श्रद्धांचा सागर व किर्तनाचा मिठागर !

पुण्यापासून देहू आहे अठरा एकोणीस मैलावर. आळंदीपासून देहू तीन चार मैलावर ! आणि आळंदी पुण्याहून सोळा मैलावर ! येथे येणारा यात्रेकरू प्रथम अंग ओले करतो इंद्रायणीच्या डोहांत ! आणि मग पूर्णस्नान करतो चंद्रभागेच्या जलतीर्थात ! विठ्ठलाच्या वारकऱ्यांची ज्ञानेश्वरावर मोठी भक्ति ! परंतु त्याच्या अंतःकरणावर चितारलेली असते तुकारामाची मूर्ति ! म्हणूनच पंढरपूरा इतकेच देहूला महत्त्व !

वारकरीपंथाच्या संकीर्तनांत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम हीं तीन दैवते अति श्रेष्ठ ! इतकी की त्यांची प्रतिमा आणि साहित्य नजरेसमोर ठेवल्याशिवाय किंवा त्याला मनःपूर्वक वंदन केल्याशिवाय वारकरी कथाकारांची वाणी तल्लीनतेचा रसरंग चाखूच शकू नये.

ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी उशाला असल्याशिवाय झोंप न येणारे जसे अनेक भक्त, तसेच तुकोबाची गाथा पाहिल्याशिवाय पाऊल न उचलणारे किती तरी श्रद्धावंत ! या दोहोंचे देहू हे नित्यवारीचे स्थान !

देहूला कांहीं श्रद्धेचा सागर म्हणतात, परंतु ते खरे आहे किर्तनाचे मिठागर ! श्रद्धेच्या सागरांतून इथल्या आगरांत पिकते हरिभक्तीचे मीठ ! की ज्याने संसार सुखातला रुची तर वाढतेच पण शुद्धताही निर्माण होते ! चित्तशुद्धीसाठी तर हरीभक्तीचे मीठ अति उपयुक्त !

देहूत किर्तनाची मोठी परवणी ! त्यातील रंगत मोठी ! संगत सुखाची ! गोडी रसाळ उसाची ! म्हणून देहूत प्रसाद ग्रहण करावयाचा तो हरीनाम किर्तनाचा !

## ● यात्रेचें स्वरूप आणि नित्य कार्यक्रम

आषाढी यात्रेला आळंदीची पालखी नाचत बागडत पंढरपूरच्या दिशेला धांव घेऊं लागली की देहू अस्थिर होतें. ती स्थिर होते देहूची पालखी आळंदीच्या गळयांत गळा घालून 'ज्ञानबा तुकाराम' गर्जत चंद्रभागेच्या दिशेला धावूं लागते तेव्हां! देहूची ही पालखी निघते जेष्ठ वद्य अष्टमीला. लहान थोर यांच्या मुखातील हरीनामाचे भक्तिबिंदू टिपत टिपत ती पंढरपूरांत प्रवेश करते आषाढी एकादशीला.

विविध कार्यक्रमाचा नगारा तर देहूत नेहमीच निनादत असतो. पुण्यातल्या बहुतांशी उत्सवाचे देहू हे तर अग्रगण्य स्थान. इथे वीणानाद ऐकावा अहोरात्र! आरत्या गरजतात दिनरात्र! गुरुवारी आणि एकादशीला असते फक्त कीर्तन! वद्य एकादशी हा देहूच्या पालखीचा आळंदीला वारी करण्याचा वार! माघ शुद्ध दशमी हा तुकोबाचा गुरुपदेश दिन. हा दिन तर सर्व दृष्टीने सर्वश्रेष्ठ! किर्तनाचे महात्म्य तर अवर्णनीय! देहूत सर्वात गर्दी दिसते ती याच दिनी. फाल्गुन वद्य द्वितीयेपासून पंचमीपर्यंत येथे स्वतंत्र यात्रा भरते तीही प्रचंड!

## ● तुकारामकालीन स्थिती

तुकारामाचे संपूर्ण नांव तुकाराम बोल्होबा मोरे. ते जातीने वैश्य गोसावी. तुकाराम मूळांत कंगाल असे सर्वांचे मत ; पण ते खरे नव्हे. त्यांची पूर्वस्थिती राजथाटाची. परंतु दुष्काळाची वीज त्यांच्या संपत्तीवर न पडती तर ती स्थिती टिकती! मग तुकाराम हे तुकाराम म्हणून प्रसिद्ध न होते हेही खरे. पण काळाने त्यांच्या विचाराची गती बदलली.

दुष्काळात तुकारामाचे सारे घर धुवून निघाले पण पुढे तुकारामांच्याच एका दिव्य दृष्टीने हे घराणे कायमचे वैभवाला चढले. त्यांतून ईश्वराचा ध्यास हेच तुकोबाचे ध्येय बनले. त्यानी जीवनाचा अर्थ वेगळा लावला व व्यर्थ वेळ न दवडता स्ववाणीला व स्वशद्बाला वेगळी वाचा फोडली. त्यासाठी त्यानी स्वतःचे तन, मन, धन वेचून पुरातन साहित्याच्या आणि ज्ञानेश्वरीच्या ज्वलंत भट्टीत स्वतःला भाजून पक्के केले.

तुकारामाचा काळ म्हणजे इ. स. १६०० च्या पुढचा, की ज्या साली महाराष्ट्र मुसलमानाच्या टाचेखाली होता. तुकारामाच्या जन्मापूर्वीहि महाराष्ट्रांत मुसलमनांचे वर्चस्व होते. पण त्या आणि तुकारामाच्या ह्यातीतील काळांत असामान्य अंतर होते. तो महाराष्ट्रातील राजकारणातला उलथापालथीचा काळ ! मराठे सरदारांचे नांव गाजविणारा ! तितकाच क्षणाक्षणाला हिंदुधर्मावर संकटे कोसळविणारा ! ! हिंदु धर्म प्रचार म्हणजे त्याकाळी मोठे संकट ! अशा या बिकटकाळी महाराष्ट्राला सहाय्यकर्ता हवा होता. धर्मनिष्ठा जाणणारा आणि त्याच्या रक्षणाची ज्वलंतपणे जाणीव करून देणारा ! पण त्यासाठी कुणीच पुढे सरकत नव्हते ! जे धर्मरक्षक होते ते तर पळण्याच्या मार्गावर होते. अशा वेळी तुकाराम पुढे सरकले. भागवत धर्माच्या प्रचाराचा बोजा शिरावर घेऊनच ते मैदानांत उतरले; निधड्या छातीनें व एका निर्धारानें ! धर्माची भगवी निशाणी शाबूत ठेवावी या तयारीनेच त्यानी पुढे पाऊल टाकले.

ज्ञानेश्वर—नामदेवांनी महाराष्ट्रांत यशस्वी धर्मक्रांती केली त्यावेळी त्यांना जी सहाय्यतेची अनुकूलता लाभली; तो किंवा तशा

प्रकारचा आधार मिळणे हे तर तुकारामांच्या काळी अशक्य होते. तशांत तुकाराम स्वतः निराधार ! जातीने शुद्र, परिस्थितीनें गांजलेले ! यातच भोंवताली मुसलमानी साम्राज्यांत सुरू असलेले आपसांतले तंटे; चौफेर बेबंदशाही, त्यातूनच घसरत जाऊन तळ गाठत असलेली आदिलशाही व त्यांचे आपसांतले तंटे, शिया व सुनीपंथांचे एकमेकांवर होत असलेले हल्ले; दिल्लीहून होणारे जोरदार आक्रमण आणि दाक्षिण राज्यांत आपसांत सुरू झालेली भांडणे ! असा हा त्यावेळेचा भयंकर काळ ! अशा काळांत मराठेशाहीचा स्वातंत्र्यासाठी यत्नही सुरू होता. पण त्यांत आड येत होती देशाची दैना ! मराठा खूप शूर होता परंतु निराशेनें निकामी झाला होता.

### ● स्वराज्याचा पाया रचण्याचे कार्य

तुकाराम हे जन्मले ते अशा बिकट परिस्थितीत. त्यांचा जन्म झाला इ. स. १५९८ किंवा १६०८ साली. अंदाजे सतरा वर्षे त्यानी आपला देह संसारांत राबविला. अठराव्या वर्षी आजूबाजूच्या दैन्यावस्थेमुळे त्याना जाग आली. मग मात्र ते संसाराला वैतागले. त्यांची पाऊले वळूं लागली भक्तिपंथाकडे. इ. स. १६३२ मध्यें त्यांना साक्षात्कार झाला. नंतर मात्र ते देहाने संपूर्ण देहूचे झाले.

किर्तन हेच प्रभावी प्रचाराचे साधन हे त्याच सुमारास त्यांच्या मनावर बिंबले. तेव्हां त्यानी किर्तनाच्या साधनेकरतां आपल्या देऊळवाड्यातील पूर्वपारंपारीक विठ्ठल मंदिराचा जीर्णोद्धार केला. तीच जागा त्यानी स्वकिर्तनासाठी जागविली. तुकोबाच्या किर्तनांतील एक वैशिष्ठ्य असे की एकी आणि दुहीतले अंतर त्यानी आपल्या शुद्ध वाणीने एकजीव केले. मेणाच्या मनांत त्यांनी वज्राची शक्ति आणली.

सकस मराठी भाषेतून सत्यतेचे चित्र जसेच्या तसे चितारून ढळलेले चित्त अढळ करणारे तुकाराम हे पहिले क्रान्तीकारक किर्तनकार ! सत्याचा प्रकाश प्रचाराच्या पणतीतून प्रज्वलितकरण्या-साठी त्यांनी किर्तनातून विविध तऱ्हेचे प्रयोग केले. तुकोबांनी आपल्या किर्तनातून साधलेले महान कार्य हेच की देशातल्या क्षुद्र भावनेचा नायनाट तर त्यांनी केलाच, परंतु क्षत्रियांचा हात ब्राह्मणाच्या हाती घेऊन स्वातंत्र्याच्या कार्यासाठी पुढील संघटनेचा मजबूत पाया धार्मिक भावनेच्या शुद्ध विचारसरणीने पक्का बनविला.

तुकारामाच्या पूर्वीही समतेच्या शिक्षणाने इथला राज्यव्यवहार सुरळीत चालला होता, परंतु पुढच्या काळांत हीच व्यावहारीक वागणूक देशाभिमानांतून स्थिर करण्यासाठीं शस्त्रक्रांतीची आवश्यकता होती. शस्त्र हाती पेलविण्यासाठी ज्या बळकट मनाची महाराष्ट्राला आवश्यकता होती त्याची तयारी तुकोबानीच केली. शिवबांचे स्वराज्याचे स्वप्न जे पुढे साकार झाले, त्याला प्रथम आकार देण्याचे खरे कार्य तुकाराम महाराजांचेच होते. म्हणून तर शिवाजीमहाराज तुकारामाना गुरुसमान लेखित !

देहूच्या विठ्ठल मंदिराची उभारणी तुकारामाचे धाकटे चिरंजीव नारायणबाबा यांनी इ. स. १७१३ च्या सुमारास केली. त्यांत तुकारामांचे सातवे पूर्वज विश्वंभरबाबा यांनी देवता बसविल्या.

या देऊळवाड्याची ही जागा तुकाराम स्वतःच स्वहस्ते साफसूफ करीत आणि मग किर्तनाला प्रारंभ होई. सुरवातीला त्यांच्या किर्तनाला मोजकेंच भक्त जमत ! परंतु तुकारामाची वाणीच मोठी

खणखणीत की तिने पुढे सारे देहूनगर दणदणून सोडले. मग मात्र देऊळवाड्यातील ती प्रशस्त जागा देखील त्यांच्या किर्तनाला अपुरी पडू लागली.

● देहूचे वाढतें वभव

किर्तनासाठी जनतेला एकत्र जमवितांना तुकाराम एक मागणे मागीत, त्यांचे हे मागणे मोठे नव्हते. प्रत्येकाने देवाला आपले अंतःकरण दान करावे म्हणजेच स्वच्छ अंतःकरणाने वागावे व संकटाला तोंड देण्यास सज्ज असावे; हे त्यांचे मागणे. लोक ते मान्य करीत आणि कीर्तन संपल्यावर त्याना काहीना काही दान करण्याची इच्छा प्रगट करीत. एकदां एका किर्तनात खुद्द शिवाजी महाराजानी त्यांना अलंकाराचे महावस्त्र दिले. पण तुकोबानी वैभव वाढविणाऱ्या अशा अलंकाराला संसारा बाहेर ठेवले आणि अहंकारासारख्या अलंकाराना तर इंद्रायणीच्या डोहांत बुडविले.

तुकारामाच्या पश्चात देहूचा मोठा लौकिक वाढविला तो त्याचे पुत्र नारायणबाबा यानीं! नारायणबाबा स्वेच्छेने आपल्या पित्याच्या गादीवर चढले नाहींत, तर तुकाराम शिष्य संताजी पवार यांनी ती जागा घेण्याची त्यांना आज्ञा केली.

नारायणबाबानी आपल्या चारित्र्यशुद्ध वागणूकीने अनेक थोरांचे लक्ष देहूकडे वेधविले. शिवबांनी देहूला देणगी दिलीच होती. त्याच्या जोडीला इ. स. १६८० मध्ये छत्रपती संभाजीमहाराजांनी देहूसाठी स्वतंत्र वार्षिक नेमणूक केली. इ. स. १६९५ सालीं श्री राजारामानी इथल्या यात्रेकरूंना प्रसाद वाटण्याची सोय केली. इ. स. १७०० मध्यें बाळाजी विश्वनाथ पेशव्यानी आपले लक्ष या स्थानी

जातीनें केंद्रीत केले ! इ. स. १७०२ च्या सुमारास नारायणबावांना अर्धा देहूगांव इनाम मिळाला आणि इ. स. १७०८ च्या सुमारास ताराबाईचे द्वितीय पुत्र शिवछत्रपति यांनी स्वतःहून तुकोबा मंदिर बांधणीचा खर्च मंजूर करून, देहू हे संपूर्णपणे तुकाराम घराण्याच्या हवाली केले.

● देहूचें प्रथम दर्शन

देहू रोड स्टेशनपासून तुकोबाचे देहू हे सुमारें साडे तीन मैलावर आहे. साडे तीनशे घरे आणि अंदाजे अडींच हजार लोकवस्ती इतका या नगरीचा छोटा संसार ! देहू नगरीचे मुख्य स्थान तटबन्दीने बन्द आहे. ही तटबंदी म्हणजे तुकोबांच्या स्थानाच्या संरक्षणार्थ उभारलेली एक रक्षण चौकट म्हणा ना ! ही चौकट सुमारे अडीचशे वर्षांपूर्वी महालुंग्याचे इंगळे पाटील यांनी बांधली. या चौकटीला लागूनच एक कट्टा आहे. तो लांबीला नव्वद फूट व रुंदीला सतरा फूट इतका मोठा आहे. तटाची मुख्य द्वारे दोन, एक पूर्वेला, दुसरे उत्तरेला. ही दोन्हीही मुख्यच द्वारे, त्यामुळे त्यांना महाद्वार म्हणतात. पूर्वेकडील द्वार हे प्रवेशद्वार. तेथून आंत गेल्यावर आपणांस पश्चिम–दक्षिण द्वारे दिसतात. यांतील एका द्वाराकडून नदीकडे जाता येते व दुसऱ्या दरवाज्यातून बाहेर पडले की तुकारामाच्या पूर्वजांच्या इनामदार वाड्यांत आपण येतो. यांतील तीन दरवाज्यावर नगारखाने आहेत. देवळाच्या भिंतीला लागून जो प्रचंड घाट दृष्टीस पडतो, त्याचे नांव देऊळ घाट. उत्तर महाद्वाराजवळ मारुति, गणपति अशी श्रद्धास्थाने आहेत. तेथे जे रामाचे मंदिर आहे, त्या बाजूनेच विठ्ठल मंदिराच्या सभामंडपाकडे जाण्याचा रस्ता आहे.

विठ्ठल मंदिराच्या बाजूलाच जे शेजाघर आहे. तेथेच पादुका आहेत. त्यामुळे हा इथला भाग तसा महत्वाचा. येथें वद्य प्रतिपदेला रात्री जे कीर्तन होते त्यावेळी खूप गर्दी जमते. हे कीर्तन अति रंगते. मध्यप्रसंगी जर आपण तेथे गेलो, तर जमलेला साराच भक्तजन किर्तनात दंग झालेला दृष्टीस पडतो.

संत तुकोबानी फाल्गुन पंचमी शके १५७१ मध्ये आपला देह देहू पार केला, तेंव्हां तेथेच मोठाच हाहाःकार उडाला. देहत्यागाचे हे त्यांचे वृत्त तुकाराम महाराजांच्या कन्येस कळताच, ती त्या तेथें धांवत आली. पितृप्रमात बुडून तिने या जागी आकांत केला. ही तिची प्रेमाची ओढ मोठी प्रभावी होती. म्हणतात की, कन्या प्रेमास्तव तुकोबांना क्षणभर कां होईना परंतु पुनः देह धारण करणे भाग पडले होते. या जागी जिथें भगीरथाची मूर्ति आहे, त्या मूर्तीच्या शेजारीच तुकाराम भजनास बसत. त्याच बाजूला परंतु बाहेरच्या अंगाला एक वृक्ष दृष्टीस पडतो. तेथे तुकारामाच्या पादुका व त्यांची वीणाधारी मूर्ति आहे. इथेच पुढे विठ्ठल मंदिर, तुलशी वृंदावन, बाजूला मुरलीधराचे मंदिर आहे.

तुकारामांनी आपली ग्रंथरचना ज्या इंद्रायणीच्या डोहांत बुडविली ती जागा गोपाळपूरपासून साडेतीन फर्लांगावर आहे. ज्या स्थळी तुकारामानी या प्रसंगात उपोषण केले ती़ही जागा इथे दाखविली जाते.

क्षेत्र देहूत दोन डोंगर प्रसिद्ध आहेत. एक भीमचंद्र व दुसरा भंडारा. भंडारा चार मैलावर आहे. हे स्थान निवांत—शांत आहे. इथें पूर्वकाळांत नाथपंथीयांची वस्ती असावी. हे स्थान इ. स. ११०२ पासून प्रसिद्ध आहे. इथले दोन जलकुंड प्रख्यात आहेत.

बाजूला दरी आहे. चिंचोळा मार्गाने तेथे आपण गेलो की आपण विठ्ठल रुक्मिणी मंदिर पाहातो हे अलिकडेच बांधण्यांत आले आहे.

या स्थळी असलेले भामानाथाचे मंदिर म्हणजे एकांतवासासाठी उपयुक्त स्थळ. म्हणूनच नाथांनी हे स्थळ तपश्चर्येसाठी निवडले होते. तुकारामानीही विद्याव्यासंगाच्या यज्ञासाठी हीच जागा योजली होती. ते इथल्या वनश्रीवर आणि वनचरावर लुब्ध होते म्हणूनच तेथल्या निसर्गसौंदर्यातून त्यानी सुंदरसे अभंग लेणे कोरून ते मराठी मनाला कायमचें बहाल केले.

देहूत तुकारामाचे कट्टर विरोधक जे मंबाजीबुवा यांचेही स्थान आपणास पाहावयास मिळते. इथे जो एक इनामदारांचा वाडा आहे, त्या पाठी संध्या शंकराचे मंदिर आहे; तेथेच पूर्वी मठ होता व त्या मठाचेच मंबाजीबुवा मठाधिपती होते.

देहूत कैक सुंदर स्थाने आहेत. श्रद्धास्थानांचे हे एक अपूर्व आगर आहे. तुकाराममहाराजांची इथल्या ज्या ज्या स्थळी दृष्टी वळली ती ती स्थळे त्या त्यां वेळी पवित्र बनली आणि आज लौकिकास पात्र ठरली आहेत. देहूला तुकारामानी जन्म दिला व त्यानी आपला देह जन्मभर देहूतच बांधून ठेवला. त्यामुळे त्यांची सारी जीवन-तपश्चर्या देहूतच पुरी झाली. देहाने ते देहूशी इतके एकरूप झाले की पुढे लोकांच्या अंतःकरणात देहू नगर हे तुकारामाचे नगर म्हणून अमर झाले. आपले कार्य पुरे होताच या नगरीचा हा अपूर्व पुरुष वैकूंठाला गेला. तुकाराम गेले परंतु त्यानी आपल्या पाठी फार मोठा आदर्श ठेवला. या आदर्शाचे आकर्षक स्वरूप ज्यांना जवळून पहावयाचे असेल, त्यांनी एकदां तरी इंद्रायणाच्या आरशांत देहूचें संपूर्ण स्वरूप न्याहाळावे !

● ●

● क्षेत्र
आळंदी



क्षेत्र आळंदी, येथील संत ज्ञानेश्वरांचे समाधिस्थान

# ११

महाराष्ट्राच्या माथी झळकणाऱ्या रत्नजडीत किरटांतलें ज्ञानोबा हे एक माणिक ! असें माणिक, कीं ज्याच्या ज्ञानतेजांत न्हाऊन अज्ञानांनी ज्ञानी बनावे आणि ज्ञानी म्हणविणारांनीं आपल्यातलें ज्ञान पारखून घ्यावें ! ज्ञानेश्वर ही प्रभावी शक्ति महाराष्ट्रांत निर्माण झाली तीं मराठी मायबोलीचा विस्तार आणि विकास करण्यासाठींच ! ज्ञानेशानें ज्ञानेश्वरीच्या रुपानें महाराष्ट्रांत असें एक अघटित अमृत निर्माण केलें कीं, तें मुखीं लावतांच, महाराष्ट्राचें मुग्ध मुख साक्षात परमेश्वर वाणी वदू लागले. स्वतःच्या अहंकारांत सदा गर्विष्ठपणें गर्जत असलेल्या संस्कृत भाषेचा सागर तर ज्ञानेश्वरांच्या जन्मानंतर मराठी भाषेला शरण आला. संस्कृत शब्दशृंखलांनी पंडितांकडून मुद्दाम बांधून ठेवली गेलेली मराठी भाषेची भाष्यनगरी ज्ञानेश्वर महाराजांच्या उदयानंतर आपोआप बंधमुक्त झाली आणि मोठ्या उत्साहानें फुलूं फळूं लागली.

निराश जीवनाचे अल्प अवधींत कायाकल्प करण्याचे अलौकिक सामर्थ्य अंगी असलेला हा ज्ञान–रवि, सन १२७१ मध्यें म्हणजे सहाशे सत्याऐंशी वर्षांपूर्वी यादव कालांत उदयास आला. सतत पंचवीस वर्षे महाराष्ट्रभूमींवर त्यांनी भ्रमण केलें. त्यांच्या वारकरी पंथाच्या संतसेवक सेवा किरणांनी इथल्य अज्ञानअंधःकाराला कायमचे नष्ट केले आणि जेव्हां मातृभूमीच्या मुखावर सौख्याचे तेज विलसित होऊं लागलेले त्यांनी

आपल्या इच्छीत कार्यात विजयी होत. नाथ सांप्रदायाचे पहिले प्रभावी प्रचारक मत्स्येंद्रनाथ. त्यांचे गुरूबन्धु पंजाबचे जालंदरनाथ, त्यांचे शिष्य गोरक्षनाथ आणि पुढील नाथ म्हणजे गहीनीनाथ, निवृत्तिनाथ इत्यादि.

सर्व हिंदुस्थानांत आपल्या विचारसरणीने धर्मजागृतीचे जाळे झपाट्याने विणत जाणाऱ्या नाथपंथाने, बाराव्या शतकांत महाराष्ट्रातही धार्मिक चळवळीत यशस्वी जाळे विणले होते. नाथपंथीय हे प्रभावी प्रचारक, योगसाधनेने प्रबळ, स्पष्ट विचारसरणीने जुन्या तत्वाचे खंडन करणारे असे, त्यामुळे आपल्या कारकिर्दीत त्यानी जनता जागृतिची मोठीच कामगिरी केली हे नियसंशय! नाथपंथीय हे प्रांतिकवादी होते. प्रत्येक प्रांताच्या भाषेला त्या त्या प्रांतात स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, आणि त्याच भाषेचे प्रभुत्व तेथे टिकले पाहिजे. यासाठी त्याकाळी त्यानी मोठी चळवळ केली. बंगाल, बिहार, पंजाब आणि महाराष्ट्र यांना त्यांच्या त्यांच्या मातृभाषेंत धर्मप्रचाराचे साहित्य निर्माण करण्यास प्रोत्साहित केले. या कार्यासाठी त्यांनी खूप श्रम घेतले. चोहोंकडे पदयात्रा केल्या. विविध भाषेत ग्रंथ लिहिले. नाना प्रकारच्या चमत्कारानी अनेकांना आपलेसे केले. प्रत्येक प्रांतात त्यांचा स्वतःचा विपूल शिष्यगण. त्याच्या कार्याची सारी बैठक योगिक बळावरची. याच योगिक बळावर द्वैत-अद्वैत वादांत या नाथपंथीयानी विजय संपादन केला व त्यात सुंदरसा समेटही घडवून आणला.

नवव्या शतकांत सुरू झालेला हा नाथपंथ तीन ते चार शतकें उच्च शिखरावर राहिला. परंतु पुढे तो समूळ नष्ट झाला. उरले काय ते त्याचे बहुमोल साहित्य आणि त्यांच्या कार्याची निशाणी दाखविणारे

मच्छिन्द्रगड, गहीनी नाथांचा मठ, चौरीबाचा डोंगर इत्यादी स्थळां-सारखी पवित्र स्थळें !

ज्ञानेश्वरांचे ज्ञानबीज हे याच नाथपंथाच्या जमिनीतून उगवले, परंतु ज्ञानोबाने पुढे स्वतंत्र दिशा योजली म्हणून त्यांची पूर्णतया नाथपंथीयात गणना करणे थोडे अवघडच ! फार तर असे म्हणता येईल, ज्ञानेश्वर महाराज म्हणजे नाथपंथाचा शेवटचा दुवा ! ज्ञानोबांचा वारकरीपन्थ ही नाथपंथातून उगवलेली एक शलाका, पण स्वतंत्र अशी ! वारकरीपंथ जन्माला आला आणि नाथपंथ अस्ताला गेला.

## आळंदीची पूर्वपरंपरा

ज्ञानेश्वरमहाराज ज्या आळंदीस जन्मले त्या भागाची पूर्व ख्याती ' सिद्ध पुरुष निर्माण करणारें बेट ' अशीं. पुण्याचा फार मोठा संच ज्या पुण्यांत संचीत केला गेला आहे, त्याच पुण्यांतील एका कुशीत हें आळंदी तीर्थक्षेत्र इन्द्रायणीच्या चरणापाशींच मोठ्या उल्हासाने विराजमान झालेलें आहे. पहातांना भान हरपावें इतकें हे क्षेत्र आकर्षक आणि तसेच रमणीय आहे. चंद्रभागेच्या तटावरील विविधता आणि इंद्रायणीच्या तटीची सौंदर्यता, यांतील रमणीयता कुठल्या रंगानें निसर्गदेवतेनें येथें साकार केली आहे कुणास ठाऊक ! इंद्रायणीच्या काठची ही आळंदी ज्ञानेश्वराच्या कार्यांमुळें अधिक उजळून निघाली आहे. तेजःपूंज बनली आहे.

आळंदी ही पूर्वी वारुण, अलका, कपिल आणि सिद्धक्षेत्र या पंचनाम्यानें परिचित होती. ' सिद्धक्षेत्र ' हें तिचे पूर्वीचे गाजलेलें

नांव. कांही ग्रंथांत अलका, आनंद भवन, अलकावती, अशीहि नाममालीकेचा उल्लेख आहे. यांतील कांही नांवे अलंकारीक आहेत.

'सिद्धक्षेत्र' हेच आळंदीचे पूर्वीचे खरे प्रमुख नांव ! पूर्वी सिद्धी प्राप्त करणाऱ्या नाथपंथीयांचा मेळावा भरायचा तो याच भूमीवर. तपसिद्धता करण्यास हे स्थळ एकेकाळी अति युक्त! येथील सिद्धेश्वर दैवत हे अति जागृत! तप साधनाने या दैवतास कैकजण अंकीत करीत. 'अलन्दिप' या नांवाचा एक उल्लेख येथील ताम्रपटावर आहे. त्याचाच अपभ्रंश आळंदी असा असावा. आळंदी आणि इंद्रायणी या दोन्ही क्षेत्राचे सख्य फार जुने. आळंदीला इंद्रायणीमुळे जसे महत्त्व आले, तसेच आळंदीमुळे इंद्रायणीची ख्याती झाली.

इंद्रायणीला पूर्वी 'कौपेराख्य महानदी' असें म्हणत. पुढे या शब्दाचा अपभ्रंश कुबेरगंगा असा झाला. या गंगेत सिद्धसरोवर, चक्रतीर्थ, शालीतीर्थ, वायुतीर्थ, चंडीकातीर्थ अशी बरीच तीर्थें होती. आळंदी व इंद्रायणी यांच्या संगम-दर्शनाचे महात्म्य फार मोठे !

### ● पहाण्याजोगी महत्त्वाची स्थळे

आळंदी पुण्यापासून सुमारे तेरा मैलावर! तेथून दोन दोन तासानी मोटारी येतात व यात्रेकरूना घेऊन जातात. जाताना प्रथम जो पूल लागतो त्याचे नांव 'इंद्रायणी पूल!' तो सन १८२० साली बांधला. मंदिराभोवती जो तट आहे त्याला महाद्वार, गणेश आणि नदीकडे जाणारे द्वार अशी तीन द्वारें आहेत. समाधी स्थळी प्रारंभी हैबतरावाची पायरी आहे. ती पहाताना आठवण होते विठ्ठलाच्या नामदेव पायरीची. रस्त्यात लुट्न गेल्यावर दरवडेखोरांच्याच्या तावडीत असताना ज्यांनी ज्ञानेश्वर धावा केला व त्यानंतर ज्यांची तेथून

अचानक सुटका झाली. तेच हे हैबतराव पवार. ते पुढे ज्ञानेश्वरांच्याच सेवेत राहिले. त्यांनी आपला देह शके १८३६ मध्ये ज्ञानेश्वरांच्या चरणी ठेवला, पण तो ठेवीपर्यंत आळंदी क्षेत्राचा मोठाच लौकिक वाढविला.

**● पालखीचें दिव्य दर्शन**

ज्ञानदेव हें महाराष्ट्राचें बौद्धिक दैवत आहे आणि आळंदी हें या दैवताचें जन्मस्थान आहे. तेव्हा ज्ञान सरोवरांतील तीर्थ प्राशन करणारा प्रत्येक सेवक संधी मिळेल तेव्हा या पुण्य नगरींत येऊन ज्ञानरायापुढें लीनतेनें आपलें मस्तक नमवितो. पंढरपुराला जाणारा भाविक वर्ग हा तर मार्गे वळतांना आळंदीस आलिंगन देण्यास कधीच विसरत नाहीं. पंढरपूरची " चंद्रभागा " ही सुद्धां भीमाशंकराहून निघतांना आळंदीचे चरणाला स्पर्श करून मगच पुढें सरकते. भिमेचा विठ्ठलाकडे जितका ओढा आहे तितकेंच तिचें विठ्ठलभक्त ज्ञानदेवाबरहि अगणित प्रेम; म्हणूनच तिनें आपलें एक मुख चंद्रभागेच्या रुपानें पंढरपुराकडे वळविलें आहे; दुसरे इंद्रायणीच्या रुपानें आळंदीकडे फिरविलें आहे.

पंढरपुरचा विठोबा हें वारकरी पंथाचे उपास्य दैवत; तर आळंदीचे ज्ञानोबा हे त्यांचे स्फूर्ति दैवत ! म्हणून तर पंढरपूराच्या यात्रागमनात आळंदीच्या पालखीचे एवढे महत्त्व ! आषाढातील आळंदीची पालखी संतसमागमाच्या सेवेची एक अपूर्वच संधी ! त्या पालखीची अपूर्वाई सर्वच दृष्टीने अपूर्व !

आषाढी यात्रेला पंढरपूरास जो असंख्य पालख्यांचा मेळावा भरतो, त्याचे श्रेय याच आळंदीच्या पालखीला आहे. हीच पालखी पाहिली ! या पालखीने पंढरपूरच्या पालखी यात्रेला गति दिली.

र्ती या प्रथेची मूळ प्रवर्तक ! पंढरपूरात पाऊल टाकण्यापूर्वी नेवारी मुक्कामी या सर्व पालख्यांचा संगम ज्ञानोबाच्या पालखीसभोवती होतो तो याचमुळे ! वारकरी पंथाचे हे सेवक ज्यावेळी या स्थानी एकत्रित येतात, तेंव्हा नभाच्या छताला छेद करणारी 'पुंडलीकवरदे हारी विठ्ठल' अशी एकच एक हरीनामाची आरोळी नभांत निनादते !

खांद्याखांद्यावरून उडणाऱ्या त्या भगव्या ध्वज पताका, शब्द अलंकारात गाणाऱ्या वाणीचे ते मधूर गायन, प्रभू सेवेत धडपडणारी ती सेवा, संत सेवेला साथ देत देत पुढे पाऊल टाकीत जाणारी ती श्रद्धा, या सर्वांचा सुंदर संगम म्हणजे ही आळंदीची आषाढी पालखी !

या पालखीची श्रेष्ठता कशी काय वर्णन करायची ? असंख्य पताकांचे आकर्षक नृत्य, शब्द अलंकाराच्या साथीत गाणाऱ्या वाणीचे मधूर गायन, प्रभूसेवेत विलीन होण्यासाठी धडपडणारी सेवा, अंतःकरणाचे चक्षू बंद करून धिम्म्या गतीने पुढे सरकणारी श्रद्धा, यांच्या स्वर्गीय मिलनाने पुनीत झालेली अशी ही पालखी विठ्ठलापाशी मोठ्या थाटाने मिरवित जाते.

### ● महत्वाची स्थानें

ज्ञानोबांच्या समाधिस्थानीं प्रथमतः मारुती व गरुड ही दैवते आढतात. मंदीरे छोटी आहेत. पटांगण ओलांडताच त्याचा मुख्य सभा मंडप दिसतो. त्याचे नांव भजनी मंडप. त्याच्या दोन बाजूला आणखीन दोन मंडप आहेत. भजनी मंडपापुढे जो कासव मंडप आहे तेथेच समाधीचा गाभारा आहे. ज्ञानोबानी समाधी घेतली ती हीच जागा !

सभामंडपाच्या पूर्वेस एक गणेश मंदीर आहे. आणि पश्चिमेस जुने सिद्धेश्वर मंदीर आहे. येथल्या हेमाडपन्थी सोळा खांबी मंडपाच्या वरील

गणपतीचे शिल्प अवलोकनिय आहे. गाभाऱ्यातील शिवस्थानाची पिण्डी स्वयंभू आहे. इथले जुने शिवस्थान ते हेच ! याच शिवपिण्डीच्या पुढ्यांत असलेल्या नन्दीमार्गानें ज्ञानेश्वरांच्या समाधिस्थळी जाण्याचा मार्ग आहे.

समाधीच्या आसपास गणपति, मुक्ताबाई व सिद्धेश्वर अशी मंदीरे लागतात. वास्तविक मुक्तबाईनें जी समाधी घेतली ती तापी नदीकाठच्या एदलाबाद गांवी. मग तिची समाधी ही इथें कशी ? पण प्रश्न विचारता कळते की, ज्ञानेश्वराच्या शेजारी मुक्ताबाईचें स्थान असावे म्हणून ती बांधण्यात आली आहे.

कासव मंडपाच्या उजव्या बाजूस एक वृक्ष दाखविला जातो, त्यास 'अज्ञान वृक्ष' म्हणतात. सांगतात कीं, ज्ञानेश्वरानीं समाधी घेतल्यानंतर निवृत्तिनाथांनी समधीच्या रक्षणार्थ जो कोरडा दंड रोवला, त्याचा पुढे वृक्ष बनला तोच हा वृक्ष ! या वृक्षाबद्दल दुसऱ्याही कैक आख्यायिका आहेत. आळंदीला दुसरा एक प्रसिद्ध वृक्ष पहावयाला मिळतो. त्याचें नाव 'सुवर्ण वृक्ष.' हा वृक्ष सोन्यासारखा नाही, पण त्याची कामगिरी मात्र सुवर्ण अक्षरांत लिहून ठेवण्या सारखी आहे. ज्ञानश्वराचे पिता विठ्ठलपंत यांनी संन्यास घेतला. तेव्हां त्यांची पत्नी रुक्मिणी हिनें याच पिंपळवृक्षाखाली उपोषण आरंभलें. तेव्हां विठ्ठलपन्ताचे गुरू यात्रेच्या निमित्तानें येथें आले होते. तिला त्यांनी 'पुत्रवती भव' असा आशिर्वाद दिला. त्यामुळे विठ्ठलपंत पुन्हा गृहास्थाश्रमास आले आणि मूल न झालेल्या या द्वयांना जी पुढे दोन पुत्ररत्ने लाभली, तीच निवृत्ति ज्ञानदेव.

येथील एका पाराला चिरकालीन महत्व प्राप्त झाले आहे. नाथांचा पार म्हणूनच हा पार प्रसिद्ध आहे. नाथ परंपरेतील केसरीनाथ यांची या जागी समाधी आहे. तेथेच दुसरी एक समाधी आहे, ती त्याचे शिष्य लक्ष्मीनाथ यांची. या स्थानावर थोरामोठ्याचे अपूर्व-अपार प्रेम. सन १५७० साली पुरंदरचे आंबेकर यांनी येथील समाध्यांचे प्रारंभी बांधकाम केले. इ. स. १५७५ साली त्यात सुधारणा करण्यांत आली. सन १५९३ मध्यें शिवछत्रपतींनी या स्थळास सनद देऊन टाकली. सन १६६५ मध्ये सरतांडेल कान्होजी आंग्रे यांच्या पत्नि लक्ष्मीबाई यांनी येथे एक दीपमाळ उभारली. सन १६८२ मध्ये शिंद्याचे दिवाण शेणवी यांनी भजनी मंडप उभारला. येथला 'कासव मंडप' सन १६९९ मध्यें बाजीरावाचे कारभारी अंबाजी मांडकेश्वर यांनी बांधला. तो ज्ञानेश्वर कमेटिने इ. स. १७९५ ला सुधारला. कळसाचे काम इ. स. १८७३ साली केले गेले. मुक्तबाई मंदिर इ. स. १८८१ साली बांधण्यांत आले. आणि दरवाज्यातला नगारखाना हा सयाजीराव गायकवाड यांनी बांधला.

इंद्रायणीच्या काठी पहाण्यासारखी अनेक स्थळे आहेत. त्यांत दत्त मंदिर, विष्णुपद, पुंडलीकाचे देऊळ, चक्रतीर्थ आणि येथल्या कांही समाध्या याच्याकडे नजर खिळवितांना जे समाधान लाभते. ते अलौकिक असे; येथून जातांना आपण भक्तिपूर्ण मनानेच एक एक पाऊल पुढे टाकीत असतो. आणि मग अचानक पुढ्यातच चांगदेवाचे गर्वहरण करण्यासाठी ज्ञानोबानी चालविलेली भिंत दृष्टीस पडते. मग मात्र मुखातून अचानक उद्गार बाहेर पडतात. धन्य ते ज्ञानेश्वर! धन्य त्यांची ती आळंदी!!

● ●

● तीर्थ

चंद्रभागा



सुरम्य व सौंदर्यवती चंद्रभागा !

# १२

प्राणीमात्राच्या रक्षणार्थ प्रथम पृथ्वीवर तीन महान शक्ति अवतीर्ण झाल्या. त्या म्हणजे वायु, अग्नि आणि जल! याच शक्तीच्या सहाय्याने मानवाने सारे संशोधन पार पाडले. स्वरक्षण साधले; आणि स्वातंत्र्यही मिळविले. दैवी शक्तींना प्रसन्न ठेवण्यासाठी त्यांची पूजाअर्चा करण्याची प्रथा प्रथम रूढ झाली तीसुद्धा याच तीन शक्तीच्या पूजन प्रारंभाने. या तीन देवतात अग्नि हे उग्र दैवत! यातले वायु गती देणारे! जल शांततेचा पुरस्कार करणारे! सागर आणि नद्या ही जलदेवतेची मुख्य रूपे! आणि त्यांचा किनारा म्हणजे प्राण्याना लाभणारा शांततेचा एक महान निवारा.

महाराष्ट्रातील जलदेवता ही पंचमुखी! 'भीमा' हे त्यातलेच एक मुख! भीमेचे हे मुख कमल पंढरपूर क्षेत्रांत चंद्राकार धारण करते म्हणूनच भीमेच्या पंढरपूरातील प्रवाहाला चंद्रभागा हे नांव!

## ● चंद्राला लाजवणारी चंद्रभागा

चंद्रभागेची निसर्गनिर्मित घडण ही खरोखरच एक आश्चर्ययुक्त चमत्कृति आहे. विठ्ठलाच्या चरणापाशीच 'भीमा' नदीने नेमके आपले अंग चंद्राकृती करून पांडुरंगाचे चरण घट्ट पकडून ठेवावेत, हे एक आश्चर्य आहे. सह्याद्री पर्वतातील तपोवनात ध्यानस्थ बसलेल्या भीमाशंकर या स्थानातून थयथय नाचत येणाऱ्या 'भीमे'ने नेमके पंढरपुरात प्रवेश करताच, कटीवर हात देऊन तटस्थ उभ्या असलेल्या विठ्ठलाचे ध्यान अशांत न व्हावे या काळजीने हळु पावले टाकीत टाकीत शांततेने जावे,

आणि पंढरपूर पार केल्यानंतरच तिचा खळखळाट सुरू व्हावा हीसुद्धा एक नवलाची गोष्ट होय. आषाढी-कार्तिकीच्या यात्रेप्रसंगीच नेमकें चंद्रभागेनें आपले अंग आकुंचित करून विठ्ठलाच्या भेटीस येणाऱ्या लाखों भाविकांना, भजन-कीर्तनाला वाळवंट मोकळे करून द्यावे आणि यात्रा संपतांच याच नदीचें पात्र पाण्यानें फुलून जावें; हींसुद्धां एक अजबच घटना !

खरोखर, चंद्रभागा हा पंढरपुरच्या गळ्यांतला एक असा अलंकार आहे की ज्याचे तेज पहाणारांच्या नजरेत अहोरात्र तळपत रहावे. तिचे दर्शन मोठेच सुखदायक चंद्रभागा म्हणजे मूळ भीमा नदी. ती पंढरपुरात चंद्राकृति धारण करते म्हणून तिचे इथले नांव चंद्रभागा ! नांव चंद्रभागा आणि विठ्ठल चरणापाशी होत असलेली तिची सेवा, या दोन कारणास्तव ती अधिक तेजस्वी बनली आहे हेच खरे ! चंद्रभागाचे हे चंद्रमुख इतके सतेज आहे कीं, ते पहाताना प्रत्यक्ष चंद्राने लाजावे !

**● भाविकांची अढळ निष्ठा**

प्रत्येक यात्रेकरू पंढरपुरांत पाऊल टाकताच चंद्रभागेचे दर्शन घेता घेतां तिला आलिंगन देतो. आलिंगन देता देतांच आपल्या पापाच्या प्रायश्चित्ताची याचना करतो. याचना करता कर-तांच पदरांत पुण्याई पडावी म्हणून पदर पसरतो आणि पदर पसरता पसरतांच मोठ्या भक्तिभावाने चंद्रभागेच्या चरणाचे तीनतीनदां तीर्थ सेवन करतो आणि मग विठ्ठल मंदिराकडे वळतो.

मानवी मनाला सत्याचे अस्सल रूप सत्यस्वरूप दर्शविणारा, चंद्रभागा म्हणजे एक निसर्गनिर्मित स्वच्छ असा आरसाच होय !

त्यांत निरखून पहाणाऱ्याला आपल्या अंतःकरणाची यथायोग्य-कल्पना येते. त्याला प्रथम दिसतात त्या त्याच्या मनमुखावरील वासनांच्या रेषा आणि नंतर आढळतात त्या त्याच्या पापकृत्याच्या जखमा !

'चंद्रभागे'च्या किनारी शांत चित्ताने उभे राहिलें कीं, आयुष्यांतील कित्येक प्रसंग स्मरतात, जुन्या नव्या कित्येक आठवणी आठवू लागतात. व्यथित मन कसे कुणास ठाऊक प्रसन्न होते. समोर दिसू लागते प्रगति! उल्हास दाखविणारी आणि जीवनातील दारूणा नष्ट करणारी गती ! खरोखर चंद्रभागेच्या जलस्पर्शात एक वेगळेच सामर्थ्य आहे !

कुणी चंद्रभागेच्या स्नानांत निमग्न होताच मीपणाला विसरून जातो, तर कुणी चंद्रभागेकडे टक लावून पहात पहातां, आपल्या कृतकर्माच्या खपल्या फोडून दुःखाश्रू ढाळीत असतो, कुणी कुळाच्या संरक्षणाची मागणी करीत असतो, तर कुणी संसाराची बांधणी सुव्यवस्थित व्हावी म्हणून तासन तास हात जोडून उभा असतो. येथे उपकार न करणारे उपकारी व्हावेत यासाठी शक्तीची याचना करीत असतात, तर ऋणाचा भार जन्मभर शिरावर घेऊन थकलेले; ऋणमुक्त होण्याचें सामर्थ्य यावें म्हणून निष्ठेनें नमन करीत असतात.

### ● भीमेस मिळणाऱ्या तिच्या मैत्रिणी

सह्याद्री आणि सातपुडा हें महाराष्ट्राचे दोन बळकट खांदे ! या खांद्यावर खेळत असलेल्या कैक नद्यांनी केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर दक्षिण भारताला देखील पोषक बनवले आहे ! महाराष्ट्र देश तर नद्यांच्या खोऱ्यानीच सुपीक बनला आहे. पावसानें पृथ्वीवर यावे आणि त्याला आपल्या कडेवर घेऊन देशाच्या सर्व भागांत वर्षभर

खळखोव, हेच तर नद्यांचे मुख्य कार्य! नर्मदा, तापी गोदावरी, वैनगंगा, भीमा आणि कृष्णा या महाराष्ट्रांतील महान नद्या तर ही आपली कामगिरी आज कित्येक काळ करीत आहेत.

या सर्वच नद्या आपापल्या दृष्टीनें श्रेष्ठ आहेत खऱ्या, परंतु त्यांतही भीमेचें वैशिष्टय कांहीं वेगळेंच! 'भीमा' नदी पुण्यामधील सह्याद्रीच्या माथ्यावर विराजमान झालेल्या भीमाशंकर या महान श्रद्धास्थानी उगम पावते हे तिचें पहिलें वैशिष्टय. आणि नंतर ती ज्या भागांतून जाते त्या सर्वच भागांत तिच्या भोवती भाविकांचा अपूर्व मेळावा जमावा व त्यासाठीं सृष्टीने पूर्वयोजनाच योजून ठेवावी हे दुसरें वैशिष्टय! भीमा शंकर हे स्थान आहे ४३०० फूट उंचीवर. तेथेंच भीमा तीर्थ आहे. भीमेच्या तीन मैलावर स्वागत करते भामा. भामाची लांबी आहे ३५ मैल. जिच्या काठी देहू आळंदी आहे त्या इंद्रायणीची लांबी ५० मैल. ती भीमेला आलिंगन देते तुळजापुरांत.' इंद्रायणी'च्या संगमानंतर 'कुकडी' भीमेला भेटते. तिची लांबी ३५ मैल. रांजण गांवी भीमाला मुळा-मुठा भेटतात. त्यांची लांबी आहे १३५ मैल. मुळा मुठा भीमेला मिळण्यासाठीं धांवत असतां, त्यांच्या हातांत हात घालून 'पवन'ला मिळते. या तीन नद्या महाराष्ट्रांत मोठ्या प्रसिद्ध, तशाच क्रियाशील! यांच्या श्रमाचे फळ म्हणजे मुळशीचें खडकवासला आणि लोणावळयाजवळचे लाईट हाऊस ही दोन धरणे. खोपोलीच्या वीज साठ्यालासुद्धा आधार मिळाला आहे तो यांचाच!

घोडनदी भीमेच्या दर्शनांस येण्यापूर्वी तिच्यात 'कुकडी,' 'पुष्पवती', 'मीना', या नद्या समाविष्ट होतात– 'मुळा-मुठा' नंतर १५

मैलावर गाणेगांव येथे मिळणाऱ्या या नद्याची लांबी २०० मैल. पुणें जिल्ह्यातील भीमेची यात्रा मोठी आल्हाददायक! तेथे तिच्या जोडीला नीरा प्रवास करते. तिचा संगम होतो नरसिंहपूर श्रद्धास्थानी की जिथे नरसिंहाचे देऊळ आहे.

सातारा जिल्ह्यात भीमेचें स्वागत होतें 'माण' नदीच्या मीलनाने. 'माण'ची लांबी १२५ मैल. नंतर 'सीता' मिळते. भीमेचा पुढला जलयात्रेचा प्रदेश म्हणजे निजाम हद्दीपलिकडचा. निजाम हद्दीत प्रवेश केल्यानंतर तिची चाल शंभर मैलाची. पुढे ती भारत भूमीच्या अतिप्रिय अशा कृष्णेच्या उदार अंतःकरणांत रायपूरांत अंतर्धान पावते.

● खोरे आणि चढउतार

भीमेच्या कर्तृत्वावर खूष होऊन महाराष्ट्राने तिच्या भागाला भीमेचे खोरे अशी पदवी बहाल केली आहे. या पदवीस पात्र ठरलेल्या भागांतच भारतातले गाजते संरक्षण मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या सातारचा कांही भाग आहे. मोर आणि नाईक निंबाळकरांचें फलटण संस्थान मात्र या खोऱ्यांत संपूर्णपणें समाविष्ट आहे.

बाळासाहेब भारदे यांच्या नगर जिल्हांतील श्रीगोंदे, कर्जत व जामखेड या तालुक्यांना या खोऱ्याचा चांगला आश्रय लाभला आहे. सोलापूरला मात्र भीमेने स्वखुशीने मांडीवर बसविले आहे. त्यामुळें तेथला सर्वच भाग या खोऱ्यांत समाविष्ट होतो. अक्कलकोट, जत, मिरजेचा कांहीं भाग आणि विजापूर जिल्हांतील विजापूर, इंडी, जिंदगी हे तालुके यांनी हें भीमेचें खोरे पूर्ण होते.

पुण्यांत 'भीमे' ची लांबी २०० मैल आहे. सोलापुरांतून जातांना ती कैक वळणें घेते. तिथली लांबी १५० मैल आहे. विजापुरांत मात्र ती

फक्त ५० मैलच जाते. भीमेचा मूळ उगम ४३०० फुटांवरून झाला आहे. तो प्रवास करीत करीत रायचूर येथें ११०० फुटापर्यंत खाली आला आहे. तिच्या ४५० मैल लांबीच्या या प्रवासांत हा सारा ३२०० फूटाचा उतार. हा उतार सरळ नाही. वांकडा तिकडा व टप्प्या-टप्प्यांनी खालीं घसरणारा ! या टप्प्याचें प्रमाण दर मैलास अंदाजे ७ फूट. टप्प्याच्या साधारण पायऱ्या पडतात तीन. पहिली पायरी २० ते २५ मैलांवर; दुसरी २५ मैलांनंतर आणि तिसरी ५० मैलांवर. या नदीचें पात्र वाढते ते पुढील १०० मैलांवर. तिचा हा वाढता घेर अधिकाधिक ३ हजारापर्यंत रुंदावतो तो चढउताराप्रमाणेंच! भीमा नदीच्या पाऊसपाण्याचें चार भाग कल्पितां येतील. पहिल्या २५ मैलाच्या भागांत पावसाचा अधिक जोर ! तेथील सरासरी १०० ते १२५ इंच इतकी. दुसऱ्या भागांत २५ मैलांत हें प्रमाण एकदम घसरते ते येते ५० इंचावर! तिसऱ्यांत २५ ते ५० इंच हे प्रमाण आणि पुढें पावसाचें हे प्रमाण एकदम घटत जाते म्हणून त्या भागांत असतो सदा दुष्काळ !

### ● चंद्रभागेचे अलौकिक दर्शन

सन १९१५ पर्यंत पंढरपूरला यावयाचे म्हणजे चंद्रभागेच्याच काठी उतरावे लागे. पूर्वी तेथे जे रेल्वे स्टेशन होते तो अलिकडे गणला जातो जुना पंढरपुरचा भाग! यात्रेकरू या स्टेशनावर उतरले की त्यावेळी नावेत बसत आणि चंद्रभागेच्या प्रवाहांतून प्रवास करीत करीत पुंडलिकाच्या मंदिरापाशी उतरत.

लॉर्ड वेलग्नर यांनी येथे सुधारणा केली, ती चंद्रभागेवर एक प्रचंड पूल बांधून रेल्वे लाईन वाढविण्याची. त्यामुळेच सद्याचे पंढरपूर स्टेशन अस्तित्वात आले व जुन्या पंढरपूर स्टेशनाचे अस्तित्व लयास

गेले. या सुधारणेपायी चंद्रभागेने एका कल्पक उद्योगी माणसाला हात दिला. त्या इसमाचे नाव शेठ हिराचंद. या पूलाच्या कामात भारताला हा साधारण इसम भारतातला एक श्रेष्ठ उद्योगपती बनला. या पुलामुळे प्रवासात सुधारणा झाली, पण हानी झाली ती इथल्या कोळी समाजाची. ते इथले नावाडी. नावेवर त्यांचे पोट. त्यांची कायमचीच रोजंदारी बंद झाली. पण ब्रिटीश आमदानीतली एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी; त्यानी इथे सुधारणा करतानाच कोळी समाजाला देखील एक वेगळ्या सुधारणेचा मार्ग दर्शविला. बुडालेल्या उत्पन्नाची भरपाई म्हणून त्यानी या कोळ्यांना भरपूर जमिनी दान दिल्या व हेच कोळी मग शेतकरीही बनले. ते शेतकरी बनले तरी त्यांच्यातील आणि यात्रेकरूतील संबंध पांडुरंगाने कायम राखला तो म्हणजे चंद्रभागेच्या वाळवंटातले पुंडलीक मंदिर त्यांच्या स्वाधीन करून आणि त्या तेवढ्या भागात नाव चालविण्याचा त्यांचा हक्क शाबूत ठेवून ! यात्रेकरूंना विठ्ठलाचे दर्शन घडण्यापूर्वी प्रथम दर्शन घडते ते या चंद्रभागेचे ! पंढरपूर स्टेशनानजीक पुलावरून गाडी चालू लागली की प्रवासी बाहेर माना काढतात आणि खालून वहाणाऱ्या चंद्रभागेच्या पात्रात नाणे टाकतात. त्याच वेळी त्यांचा हात विठ्ठलाच्या वंदनासाठी विनम्र होतो.

चंद्रभागेचे खरे प्रशस्त दर्शन घडते ते आपण तिच्या वाळवंटात पाऊल टाकतो तेव्हां ! ती तेथली वाळू आणि ते पाणी; सारेच अपूर्व ! याच वाळवंटांत पुंडलिकाने इतिहास घडविला. पांडुरंगाला आगळ्या अशा पितृभक्तीचा नमुना दाखविणाऱ्या घटनेचे इथले स्मारक म्हणजे हे पुंडलिकाचे मंदिर. चंद्रभागेच्या वाळुवर शोभणारा असा हा सुंदरसा अलंकारच. हे मंदिर हेच इथले पहिले श्रद्धास्थान. इथे समाध्या आणि

व मंदिरांना कमतरता कशी ती नाहीच ! चंद्रभागेच्या वाळवंटांत समाधिष्ट झालेला प्रत्येक पुरुष हा येथले वैभव वाढविण्यास कारण झालेला. त्याचा इतिहासही स्वतंत्र आणि कार्यही स्वतंत्र !

## ● घाट व मंदिरे

चंद्रभागेवर असलेले चौदा घाट म्हणजे जणू चौदा रत्नेच ! ही रत्ने चंद्रभागेने मंदिराच्या कोंदणात बसविल्यामुळे तर इथली शोभा अधिक द्विगुणीत झाली आहे. या चौदा घाटाना चौदा नांवे आहेत. पहिला लखुबाई, की जिथे दिंडीवनांत रुक्मिणी रुसली ! लखुबाईचे मंदीर आहे हे तेथेच. [ जीर्णोद्धार सन १७८० ] दुसरा दिवटे. तिसरा खिस्ते उर्फ कृष्णाजी [ सन १८२५ ]; चौथा कबीर. येथेच नगरपालिकेची कचेरी आहे. पांचवा उद्धव [ सन १७८० ] येथे नगरपालिकेचे वाचनालय आहे. ( चंद्रभागेचे पाणी वाढून जेव्हा ते पुंडलिक मंदिरात शिरते तेव्हां तेथली मूर्ति या घाटावर आणली जाते. हें या घाटाचे स्वतंत्र महत्त्व ) सहावा दत्त घाट. [ सन १८२० ] येथे दत्ताचे मंदिर व चातुर्मास महाराजाचा मठ आहे. पंढरपुरांतला खाजगीवाल्याचा प्रसिद्ध असा वाडा याच स्थळी आहे. त्या वाड्याचे भाविकाना आकर्षण आहे ते अशाकरतां की तेथे एक मंदीर आहे. त्यातील विठ्ठल, राधा आणि रुक्मिणी या तीन मूर्ति संपूर्ण सोन्याच्या आहेत. पंढरपुरच्या यात्रेला निघणाऱ्या रथाचे दर्शन घेण्यास जी अलोट गर्दी जमते, ती त्या रथात याच मूर्ती असतात याचस्तव. सातव्या घाटाचे नांव अंबळनेरकर. [ सन १७७० ] तेथे आहे अंबळनेरकर महाराजांचा मठ. मठांत बुवांची समाधि आहे. नववा अहिल्याबाई होळकर घाट [सन १७२८]दानशूर अहिल्याबाईने पंढरपूरांत जे रामाचे मंदिर बांधले ते याच

घाटावर. या मंदिरातील राम हा अहिल्याबाईचा राम म्हणून प्रसिद्ध आहे. दहावा महाद्वार. (सन १७९८) हा घाट इथल्या सर्व घाटांत मुख्य आणि श्रेष्ठ! पुंडलिकाचे मंदीर आहे ते याच घाटासमोर. विठ्ठल मंदिराकडे जाण्यास रस्ता निघतो तोही येथूनच! येथे शिंदे सरकारची प्रचंड धर्मशाळा व त्यांचे मुरलीधराचे मंदीर आहे. अकरावा कासार घाट. (सन १७९८) येथे नागेश्वर व नामदेव मंदीर व कपोल धर्म-शाळा आहे. बारावा चंद्रभागा. (सन १८२०) हा घाट धाकटया बाजीरावाने बांधला. हेंच याचे महत्त्व! येथे चंद्रभागेचे देऊळ आहे. तेथेच एकमुखी दत्त व पंचमुखी मारुती आहे. आणि चौदावा खाका घाट. तेथे एक राक्षसिणीची भव्य मूर्ति आहे. तिचे नाव हिडिंबा. येथली सारी वस्ती बैरागी व गोसावड्यांची. येथल्या सर्व घाटांवर माणसापेक्षा मंदिरांचीच संख्या फार. त्यातही इथली पहाण्यासारखी स्थळे अशीः 'विष्णूपद अथवा वेणू नाद' आणि चंद्रभागेच्या पलिकडे असलेली 'महाप्रभूची बैठक.' 'विष्णूपद' हें श्रद्धास्थान चंद्रभागेच्या जलपृष्ठावरच आहे. हे स्थळ सुरम्य आहे. त्याची मूळ बांधणी सन १६४० मध्ये करण्यांत आली व जीर्णोद्धार सन १७८५ मध्ये केला गेला. अशा या स्थळी पाषाणावर विष्णूची पावले उमटलेली दाखविण्यात येतात हा इथला चमत्कार; हेच इथलें श्रेष्ठ आकर्षण!

**● महाराष्ट्राला उपकारी ठरणारी भीमा**

एरव्ही शांत असलेली ही चंद्रभागा कधी कधी इतकी संतप्त होते की त्याप्रसंगी तिच्या अंगी संचारत असलेले महापुराचे वारे शांत करणे मोठे अवघड होऊन बसतें. चंद्रभागेचें पाणी पुराच्या रुपानें १९६४ पर्यंत एकंदर चारदां वर चढलें आहे. प्रथम

सन १८९६ नंतर १९३३ पुढे १९५६, केव्हा केव्हा तर या पूरांत सबंध पंढरपूर पाण्याखाली जाते. सर्व पुरांत १९५६ सालाच्या महापुरानें पंढरपुराला खिळखिळें केले, आश्चर्य असे कीं, हे पुराचे पाणी नामदेवाच्या पायरीपर्यंत पोहचलें कीं, बहुधा पुर ओसरू लागतो.

हा पुराचा प्रश्न बाजूला सारला आणि भीमेवर कांहीं योजना योजल्या तर एकटी भीमाच महाराष्ट्राला धनधान्याच्या बाबतींत तारील. भीमेच्या खोऱ्यातील भूपृष्ठ आणि भूगर्भ भाग हा जवळ जवळ सारखाच आहे. त्यांची लांबी ८० मैल व रुंदी ५० मैल आहे. पावसाची सरासरी काढली तर ती साधारणतः ७५ इंच भरेल! कांहीं भागांत हा आंकडा ९० इंचापर्यंत जातो. या ९० इंचांतलें ५० इंच पाणी जमिनीत मुरते. १० इंचाची होते वाफ. ४० इंच वाहून जाते. वाहून जाणारे हें सर्व पाणी १८०० कोटी टन इतकें आहे. हे लक्षात घेता तें जर उपयोगांत आणले गेले, तर ते महाराष्ट्राच्या १ कोटी ६५ लक्ष एकर जमिनीला लागवडीसाठीं सहज पुरण्याजोगें आहे.

भीमेच्या खोऱ्याचें क्षेत्रफळ २३००० चौरस मैल आहे. एकरांतला हिशेब १ कोटी ४७ लक्ष इतका. ह्यातला बराचसा भाग डोंगराळ आहे हे खरें, परंतु भीमा खोऱ्याच्या आरंभाला सरासरी पडणाऱ्या ७५ इंच पावसाचे तसेंच इतर भागावर पडणाऱ्या पावसाचे सर्व पाणी जे १८०० कोटी टन होणार आहे; तें जर पाटबंधाऱ्याच्या योजनेने साठवून अडवून ठेवले गेले, तर महाराष्ट्रात साठ लक्ष टन धान्य जादा निर्माण होऊ शकेल व मुंबई प्रांताचे २ कोटी लोक महाराष्ट्राच्या भीमा आणि चंद्रभागेच्या संगमानें सुखाने सहज जगू शकतील. परंतु महाराष्ट्राच्या भाग्यांत काय आहे ते फक्त त्या पांडुरंगालाच माहीत!

REFBK 0017304

REFBK-0017304